

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित




सोलापूर | गुरुवार, १५ जानेवारी २०२६ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४२ वे अंक ५०| पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## मतमोजणीला अडचण आल्यासच 'पाडू'चा वापर

**मुंबई, १४ जानेवारी**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी होणाऱ्या मतमोजणी प्रक्रियेत तांत्रिक अडचण निर्माण झाल्यासच 'पाडू' (प्रिंटिंग ऑक्सिलिअरी डिस्प्ले युनिट) मशीनचा वापर केला जाणार असून, त्याचा सरसकट वापर होणार नाही, असे राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. मात्र, या नव्या यंत्राच्या वापराबाबत आधी पुरेशी माहिती न दिल्याचा आरोप करत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी तीव्र आक्षेप नोंदवला असून, पाडू मशीन उमेदवार पाडण्यासाठीच आणली आहे का? असा सवाल उपस्थित केल्याने वातावरण तापले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड निर्मित भारत निवडणूक आयोगाची 'एम३ए' प्रकारातील ईव्हीएम यंत्रे वापरण्यात येत आहेत. या यंत्रांमधील मतदानाची मतमोजणी ही नेहमीप्रमाणे कंट्रोल युनिट आणि बॅलेट युनिट जोडूनच करण्याचे स्पष्ट आदेश राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत. केवळ कंट्रोल युनिटमध्ये तांत्रिक बिघाड, डिस्प्ले बंद पडणे किंवा तत्सम अडचण निर्माण झाल्यासच अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत 'पाडू' मशीनचा वापर केला जाईल, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. ईव्हीएमवर आधीपासूनच विरोधकांकडून शंका व्यक्त केली जात असताना, कोणतीही व्यापक माहिती न देता नव्या 'पाडू' मशीनचा वापर करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने अविश्वासाचे वातावरण निर्माण झाल्याचा आरोप राज ठाकरे यांनी केला आहे.

# आज मतदार राजा कोणाला देणार कौल!



**• राज्यातील २९ महापालिकासाठी आज मतदान; निवडणूक यंत्रणा सज्ज**



**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २४ जानेवारी:**

निवडणूक प्रचारातील आरोप- प्रत्यारोप, ठिकठिकाणी झालेल्या राडेबाजी आणि मतदारांना पैसे वाटपाच्या घटनांमुळे चर्चेत राहिलेल्या मुंबईसह राज्यातील २९ महापालिका निवडणुकीसाठी गुरुवारी (दि.१५) मतदान होत आहे. 'रात्र वैऱ्याची' समजून सर्व राजकीय पक्ष व उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते जास्तीजास्त मतदारांपर्यत पोहचण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यासाठी प्रशासकीय सर्व यंत्रणा सज्ज झाली असून कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. बृहन्मुंबई वगळता अन्य सर्वठिकाणी बहुसदस्यीय पद्धतीने निवडणूक होत आहेत

राज्यातील २९ महापालिकामध्ये एकूण २ हजार ८६९ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. त्यासाठी एकूण ३ कोटी ४८ लाख ७९ हजार ३३७ मतदारांकरिता एकूण ३९ हजार ९२ मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे. निवडणूक रिंगणात एकूण १५ हजार ९०८ इतके उमेदवार आहेत; तसेच पुरेशा पोलिस बंदोबस्ताचीदेखील व्यवस्था करण्यात आली आहे. गेल्या १५ डिसेंबर पासून बृहन्मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई, वसई- विरार, कोल्हापूर, कल्याण- डोंबिवली, ठाणे, उल्हासनगर, नाशिक, पुणे, पिंपरी- चिंचवड, सोलापूर, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, लातूर, परभणी, भिवंडी- निजामपूर, मालेगाव, पनवेल, मीरा- भाईंदर, नांदेड- वाघाळा, सांगली- मीरज, कुपवाड, जळगाव, धुळे, अहिल्यानगर, इचलकरंजी आणि जालना महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात आचारसहिता लागू आहे. याठिकाणी उद्या सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होईल. मतमोजणीस संबंधीत ठिकाणी १६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता सुरवात होईल. एकूण मतदारांमध्ये १ कोटी ८१ लाख ९४ हजार २९२ पुरुष, १ कोटी ६६ लाख ८० हजार ४४९ महिला; तर ४ हजार ५९६ इतर मतदारांचा समावेश आहे. त्यांच्यासाठीच्या एकूण ३९ हजार ९२ मतदान केंद्रांपैकी एकूण ३ हजार १९६ संवेदनशील मतदान केंद्र घोषित करण्यात आली आहेत.

महानगरपालिका निवडणुकांसाठी पुरेशा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात ४३ हजार ९५८ कंट्रोल युनिट आणि ८७ हजार ९१६ बॅलेट युनिटची उपलब्धता केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी ११ हजार ३४९ कंट्रोल युनिट आणि २२ हजार ६९८ बॅलेट युनिटची व्यवस्था केली आहे. बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व २८ महानगरपालिकांच्या निवडणुका बहुसदस्यीय पद्धतीने होत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेत एका प्रभागातून एकच सदस्य निवडून द्यावयाचा असल्याने प्रत्येक मतदाराला केवळ एकच मत द्यावे लागेल. उर्वरित सर्व २८ महानगरपालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे प्रत्येक प्रभागात साधारणत: चार जागा असतील. काही महानगरपालिकांच्या काही प्रभागांत तीन अथवा पाच जागा असू शकतील.

(उर्वरित वृत्त पान २ वर)

### मतदान नक्की करा

महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये मोठ्या संख्येने मतदान करून आपणही आपल्या शहराच्या महानगराच्या जडणघडणीत योगदान द्यावे आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रीय सहभाग नोंदवावा.

**- दिनेश वाघमारे, आयुक्त, राज्य निवडणूक आयोग**

### असा आहे पोलीस बंदोबस्त

महानगरपालिका निवडणुकांसाठी पुरेशा पोलीस बंदोबस्ताची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात ३ अपर पोलिस अधीक्षक, ६३ पोलीस उप अधीक्षक, ५६ पोलीस निरीक्षक, ८५८ सहायक पोलीस निरीक्षक / पोलीस उपनिरीक्षक आणि ११ हजार ९३८ पोलीस अंमलदारांचा समावेश आहे. त्याचबरोबर एकूण ४२ हजार ७०३ होमगार्ड देखील तैनात करण्यात आले आहेत. मतमोजणी आणि कायदा व सुव्यवस्थेच्या बंदोबस्तासाठी राज्य राखीव पोलीस दलाच्या एकूण ५७ कंपन्या तैनात करण्यात आल्या आहेत.

### राजकीय पक्षांची बैठक

महानगरपालिका निवडणुकांसाठीचे मतदान आणि मतमोजणीची तयारी; तसेच १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गच्या १२५ पंचायत समितींच्या निवडणुकांची तयारी याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली आज (ता. १४) बैठक घेण्यात आली. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, पोलिस महानिरीक्षक मनोजकुमार शर्मा आणि विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मतदान, मतमोजणी; तसेच कायदा व सुव्यवस्था याबाबत उपस्थित प्रतिनिधींना अवगत करण्यात आले.

# मुंबईसह २६ महापालिकांमध्ये महायुती सत्ता मिळवेल : देवाभाऊ

## भाजपाच असेल सर्वात मोठा पक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई दि. १४ जानेवारी-**

मुंबईसह राज्यातील २६ महापालिकामध्ये महायुतीची सत्ता येईल, असे भाकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी केले. मतदानाच्या पूर्वसंध्येला त्यांनी राज्यातील महापालिका निकालांचे अंदाज, राज ठाकरेंच्या पक्षाचं भवितव्य, मुंबईतल्या मराठी मतदारांचे गणित, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यानंतरची भूमिका, अजित पवारांचा या निवडणुकीत सुटलेला संयम, याबाबत भाष्य केले. मात्र त्यांनी कोणत्या तीन महापालिकांमध्ये महायुती मागे पडेल, हे सांगण्याचे टाळले.

मराठीचा मुद्दा हा ठाकरेंसाठी या निवडणुकीत महत्त्वाचा ठरणार नाही, असे सांगून फडणवीस म्हणाले, ही ठाकरे बंधूंची चुकीची समजूत आहे की मराठीचा एकगठ्ठामतदार त्यांना मतदान करतो. कारण असं, २०१४ आणि २०२४ या दोन्ही निवडणुका भाजपा उद्धव ठाकरेंच्या विरोधात लढला. दोन्ही निवडणुकीत आम्हाला मुंबईत त्यांच्यापेक्षा जास्त जागा मिळाल्या. २०१४, २०१९ आणि २०२४ या तिन्ही निवडणुकीत भाजपाच्या जागा स्थिर आहेत. १५-१६ जागा आम्हाला विधानसभा निवडणुकीत मिळतात. बाकी सर्वांच्या जागा कमी-जास्त झाल्या. पण मुंबईत १५-१६ जागा घ्यायच्या असतील, तर त्या मराठी मतदाराशिवाय शक्य नाही. त्यामुळे भाजपाचा न हलणारा मराठी मतदार असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. 'फ्लोटींग मतदार' हा भाजपाच्या कधी बाजूनं असतो किंवा नसतो. त्याचा 'सेंटीमेट' भाजपाच्या बाजूनं असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राज ठाकरे हे उद्धव ठाकरेंच्या सोबत आले तर काही फरक पडणार नाही. या निवडणुकीत सर्वात मोठं अपयश हे राज ठाकरेंच्या पदरी पडेल. याउलट उद्धव ठाकरेंना राज यांचा फायदा होईल. त्याचबरोबर मुस्लीम मतदारांनी भाजपाला हरवण्यासाठी मतदान केल्याचं चित्र मागच्या काही निवडणुकांमध्ये पाहायला मिळालं आहे. त्यामुळे मुस्लीम मतदार असेल, असे सांगून ते म्हणाले, ठाकरे हा ब्रँड नाही. बाळासाहेब ठाकरे हे ब्रँड होते. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे काय ब्रँड नाही,



**बिनविरोध उमेदवार ताकदीनं करायचे असते तर...**

राज्यभरात अनेक बिनविरोध उमेदवार निवडून आले. त्याचबरोबर विविध उमेदवारांना धमक्या आणि ऑफर देऊन उमेदवारी अर्ज मागं घ्यायला लावले असे आरोप करण्यात आले.

(उर्वरित वृत्त पान २ वर)




CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## युवकांनी मनाची स्वच्छता राखावी : डॉ. महादेव डिसले

**बार्शी, दि. १४ जानेवारी-**

युवकांनी आपल्या परिसर स्वच्छते करण्याबरोबर मनाची स्वच्छता राखावी, असे आवाहन डॉ. महादेव डिसले यांनी केले. येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने मौजे उपळाई (ठोंगे) येथे विशेष श्रमसंस्कार शिबिरात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विजयश्री गवळी या होत्या. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. दामाजी भिसे, डॉ. मनोज चिकराम, प्रा. समाधान लोंढे, प्रा. दिव्या बनकर उपस्थित होते. अध्यक्षीय समारोप करताना डॉ. गवळी यांनी केले. प्रस्ताविक अशलेशा शिंदे हिने केले. सूत्रसंचलन जाहेद आत्तार आणि स्विटी बरबडे हिने तर आभार पायल बारसकर हिने मानले.



## स्वामी विवेकानंद हे महान शिल्पकार होते : कल्याणशेट्टी

**अक्कलकोट, दि. १४ जानेवारी-**

स्वामी विवेकानंद हे आधुनिक भारताच्या वैचारिक पुनर्जागरणाचे महान शिल्पकार होते, त्यांनी भारतीय तत्त्वज्ञान, वेदांत आणि अध्यात्माला जागतिक मान्यता मिळवून दिली, त्यामुळे हिंदू धर्म, तत्त्वज्ञान विकासास चालना मिळाली, म्हणून त्यांच्या कार्याचे सतत स्मरण व्हावे या उद्देशाने पंचप्पा कल्याणशेट्टी यांनी महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेची स्थापना केली, असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले. कल्याणशेट्टी शिक्षण संकुलातील मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालय, सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गिरीजामाता मराठी व सेमी इंग्लिश प्राथमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी विवेकानंद तसेच राजमाता जिजाबाई यांची जयंती आणि हुतात्मा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, सूर्यकांत रूगे उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाबाई यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अक्षता साठे हिने राजमाता जिजाबाईच्या वेशभूषामध्ये होय मी जिजाऊ बोलते यावर भाषण केले. अपेक्षा शिंदे, ऐश्वर्या माळी, प्रीती फुलारी, संस्कृती क्षीरसागर, स्नेहा देडे, अक्षता साठे व धानेश्वरी बगले यांनी पोवाडा सादरीकरण केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, सूत्रसंचालन कल्पना स्वामी यांनी केले तर आभार सूर्यकांत रूगे यांनी मानले.

## 'संवेद २०२६' या स्मार्ट गव्हर्नन्स हॅकाथॉनचे उद्घाटन

**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

शहरातील शहरी समस्यांवर तंत्रज्ञानाधारित, व्यवहार्य आणि नागरिक-केंद्रित अभिनव उपाय शोधण्यासाठी एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठामध्ये सोलापूर महानगरपालिकेच्या सहकार्याने 'संवेद २०२६' या स्मार्ट गव्हर्नन्स हॅकाथॉनचे उद्घाटन सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे आणि एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. वेगाने वाढणारे शहरीकरण, मर्यादित संसाधने आणि नागरिक-केंद्रित सेवांची वाढती गरज लक्षात घेता कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स, इंटरनेट ऑफ थिंग्स आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्मार्ट गव्हर्नन्ससाठी व्यवहार्य आणि प्रभावी उपाय विकसित करण्याचा या हॅकाथॉनचा उद्देश आहे. सोलापूर शहराला एक 'लिव्हिंग लॅब' मानून प्रत्यक्ष नागरी समस्यांवर तंत्रज्ञानाधारित, व्यवहार्य व अंमलात आणता येण्याजोगे उपाय आणि प्रोटोटाइप्स विकसित केले जाणार आहेत. 'संवेद २०२६' हॅकाथॉनसाठी नोंदणी प्रक्रिया ४ फेब्रुवारी २०२६ पर्यंत खुली राहणार आहे. या हॅकाथॉनमध्ये प्रत्येक आंतरशाखीय संघामध्ये पाच विद्यार्थी आणि एक संस्थात्मक मार्गदर्शक असणार आहे. हॅकाथॉनमधील विजेत्या संघाला दोन लाख तर उपविजेत्याला एक लाखांचे रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. याशिवाय रुपये पन्नास हजारांचे तीन उत्तेजनार्थ पारितोषिकेही देण्यात येणार आहेत. अधिक माहिती व नोंदणीसाठी www.smc-mitvpuhackathon.in या अधिकृत संकेतस्थळावर संपर्क साधण्याचे आवाहन यावेळी आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आनंद शिंपी आणि डॉ. दर्शन रूईकर कार्यरत आहेत.

## पान १ वरुन

### ...आज मतदार राजा कोणाला कौल देणार?

त्यानुसार बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व महानगरपालिका निवडणुकांमध्ये प्रत्येक मतदाराने साधारणतः ४ मते देणे अपेक्षित आहे. काही ठिकाणी ३ ते ५ मते देणे अपेक्षित असेल. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे २२७ प्रभाग असून यांसह सर्व महानगरपालिका मिळून ८९३ प्रभाग आहेत. एकूण २ हजार ८६९ जागांचा समावेश आहे. त्यासाठी एकूण १५ हजार ९०८ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

### ....२६ महापालिकांमध्ये महायुती सत्ता मिळवेल : देवाभाऊ

त्याचबरोबर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावरसुद्धा त्यांनी निवडणूक आयोगावर दबाब आणल्याचे आरोप झाले. याला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राहुल नार्वेकरांवर ज्यांनी आरोप लावला, त्यांच्यावर पुरावा नाही म्हणून एफआयआर दाखल झाला आहे. जर आम्हाला ताकदीनं बिनविरोध उमेदवार आणायचे असते, तर मुंबईत केले असते. मुंबईत एकही झाला नाही. कल्याण डोंबिवलीमध्ये सर्वात जास्त झाले. तिथं शिवसेनेची ताकद सर्वात जास्त आणि भाजपाची ताकदही वाढली आहे. त्यांना उमेदवार मिळाले नाही. याबाबत उदाहरण देताना किरीट सोमय्यांचं त्यांनी उदाहरण दिलं. ते म्हणाले, किरीट सोमय्या हे त्यांचे कट्टर शत्रू आहेत. पण त्यांच्या विरोधात उमेदवार मिळाला नाही. जर मिळाला असता, यांनी सोडलं असतं का? त्यामुळे आम्ही धमक्या दिल्या वगैरे हे आरोप खोटे आहेत.

# यंत्रणेचा गैरवापर होत असल्याचा अमोल शिंदेंकडून गंभीर आरोप

### ▸ यंत्रणेकडून अटकेची भीती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या माध्यमातून आमदार देवेंद्र कोठे यांना हाताशी धरून रात्रीबेरात्री शहरात फिरत आहेत. प्रभाग ७ चे मराठा समाजाचे नेतृत्व व शिवसेनेचे उमेदवार अमोल शिंदे, प्रभाग ५ चे दलित चळवळीचे नेते राष्ट्रवादीचे उमेदवार आनंद चंदनशिवे आणि प्रभाग १५ मधील काँग्रेसचे उमेदवार धनगर समाजाचे नेते चेतन नरोटे यांना संपविण्याचे षडयंत्र या नेत्यांकडून रचले जात असल्याचा आरोप शिवसेनेचे जिल्हाप्रमुख व प्रभाग ७ चे शिवसेनेचे पॅनल प्रमुख अमोल शिंदे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत केला आहे.



राजाभाऊ खराडे, अमोल शिंदे आणि आता पद्माकर काळे यांचा वापर करून भाजपाचे आमदार देवेंद्र कोठे यांनी मराठा समाजाचे नेतृत्व संपविण्याचा विडा उचलला असल्याचाही आरोप अमोल शिंदे यांनी पत्रकार परिषदेत जाहीरपणे केला आहे. महापालिकेत पालकमंत्री आणि आमदार कोठे यांना सभागृहात जी हुजूर करणारी माणसं हवी आहेत. यापूर्वी दडपशाही करून नगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपा अडचणीत आल्याचे सर्वश्रुत आहे. आता महानगरपालिका निवडणुकीत सुद्धा हिच परिस्थिती असून झेडपीत निवडणुकीतही भाजपा षडयंत्र रचत आहे. जाणकार सूज्ञ सोलापूरकरांनी हा डाव हाणून पाडला पाहिजे, असेही आवाहन अमोल शिंदे यांनी सोलापूरकरांना केले आहे.

जाणीवपूर्वक अडचणीत आणण्याचा डाव असून, आपणास यंत्रणेकडून अटकेची शक्यता नाकारता येत नसल्याचेही शक्यता अमोल शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केली आहे. यंदाच्या महापालिका निवडणुकीत अगोदरच खूनासारखी घटना घडली असल्याने सोलापुरात वातावरण गढूळ झाले आहे. त्यातच भर म्हणजे निवडणूक वेगळ्याच वळणावर जात असल्याने निकालानंतर शहरात कायदा व सुव्यवस्था सुरळीत राहणार ना अशी भिती आता सोलापूरकरांच्या मनात आहे.

# पराभव दिसत असल्याने सहानभुतीसाठी विरोधकांचे हास्यास्पद आरोप

## आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे शिंदेंना प्रत्युत्तर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेची निवडणूक भारतीय जनता पार्टी मोठ्या मतांनी जिंकून येणार हे कळाल्यामुळेच कदाचित शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या दोन्ही पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांनी सोलापूरकडे पाठ फिरवली आहे. पराभव दिसत असल्यामुळेच अमोल शिंदे आणि विरोधक सहानभूती मिळविण्यासाठी हास्यास्पद आरोप करत आहेत, अशी स्पष्टोक्ती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी आज (दि. १४) केली.



आ. कल्याणशेट्टी म्हणाले, आपण स्वतः म्हणजे समाज नाही; हे अमोल शिंदे यांनी लक्षात घेतले पाहिजे. सामाजिक नेतृत्व आणि राजकीय नेतृत्व हे दोन वेगळे विषय आहेत. राजकीय नेतृत्वात समाजाचा विषय नसतो. तो दोन पक्षांचा विषय असतो. अमोल शिंदे यांना स्वतःचा पराभव दिसत असल्याने समाजाचा पराभव होत असल्याची ओरड ते करत आहेत. निवडणूक जिंकण्यासाठी केविलवाणा प्रयत्न ते करत आहेत. सर्व समाजांचे नेते भाजप पक्षात आहेत. भाजपाने सर्वांना प्रतिनिधित्व दिले असून, भाजप हा सर्वांना सोबत घेऊन जाणारा पक्ष आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे हे मंत्री असण्याबरोबरच आमच्या पक्षाचे नेतेही आहेत. ते निवडणूक जिंकण्यासाठी सर्वाधिक परिश्रम घेत आहेत. प्रचाराची मुदत संपल्यानंतरही कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेणे ही सर्वसामान्य बाब आहे. पालकमंत्री गोरे आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्यावर आरोप करणे हास्यास्पद आहे. सहानुभूती मिळवून पदरात काहीतरी पडेल का याचा प्रयत्न विरोधक करत आहेत. परंतु भारतीय जनता पार्टीच मोठ्या मतांनी निवडून येईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. गेल्या दोन दिवसांपासून सर्व पक्षांचे अनेक जुने व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केले जात आहेत. विरोधकांकडून थेट पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यावर पैसे वाटल्याचा निरर्थक आरोप होत असेल तर उमेदवारांवर देखील असा आरोप होणे स्वाभाविक आहे. हा देश संविधानावर चालतो. आपल्याकडे न्यायालय, यंत्रणा आहे. निवडणूक आयोग अशा व्हिडिओंची चौकशी करेल. सहानुभूती मिळवून निवडणूक जिंकता येते का? असा प्रश्नही कल्याणशेट्टींनी उपस्थित केला.

### मुख्यमंत्री, पालकमंत्री आ. कोठे यांच्या पाठीशी

आमदार देवेंद्र कोठे हे सोलापूर शहराचे युवा नेतृत्व आहे. पक्ष कार्यासाठी, निवडणुकीसाठी युवक म्हणून सर्वाधिक धडपड त्यांनी करणे अपेक्षित असून, ते करत देखील आहेत. आमदार देवेंद्र कोठे हे आमच्या पक्षाचा चेहरा आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आम्ही सर्वजण आमदार देवेंद्र कोठे यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत, असे आ.सचिन कल्याणशेट्टी यांनी सांगितले.



## 'कालीया का अंजाम'चे उत्तम सादरीकरण

**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

बज्मे गालीब आयोजित आंतर शालेय उर्दू नाटय स्पर्धेत मजरेवाडी येथील शमा उर्दू प्राथमिक शाळने डॉ ए ए बिजापूरे लिखित व अबरार नल्लामंदू आणि शाहीन सदफ दिग्दर्शित ऊर्दू नाटक कालीया का अंजाम सादर करून रसिकांची वाह वाह मिळविली व याच नाटकातील बाल कलाकार सुमय्या मुल्ला याला उत्तम अभिनयचा पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आला. या नाटकात बागबान कहकशा, आएशा पटेल, खनसा सय्यद, तस्मीया तांबोळी, शेख सुबहान, शेख मुस्तफा, शरजील शेख, रेहान शेख यांनी भाग घेतला होता. या यशामुळे संस्थेच सचिव अबुबकर नल्लामंदू यांनी नाटका भाग घेत उत्तम रित्या अभिनय केल्याबदल अभिनंदन केले.

## नफा देण्याचे आमिष दाखवून दोन लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

हॉटेल व्यवसायातून नफा देण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीकडून २ लाख ११ हजारांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादी दत्तात्रय दगडु काटे वय ४१, रा. मंत्री चंडक पोलीस वसाहत, सोलापूर यांनी आरोपी अनिल शिवाजी शहापूरकर रा. तळे हिप्परगा, सोलापूर याने जून २०२३ ते १६ डिसेंबर २०२५ या कालावधीत हॉटेल अपुर्वा, तुळजापूर नाका, सोलापूर येथे हॉटेल व्यवसायात भागीदारी व नफा देण्याचे आश्वासन दिले. आरोपीने बांधकाम कामासाठी पैशांची गरज असल्याचे सांगून फिर्यादीकडून वेळोवेळी ऑनलाईन व रोख स्वरूपात ३ लाख ७४ हजार ८०० रुपये घेतले.यापैकी आरोपीने १ लाख ६३ हजार रुपये परत केले असून उर्वरित २ लाख ११ हजार ८०० रुपये देण्यास टाळाटाळ करत असल्याचे तक्रारीत म्हणाले आहे. उर्वरित रकमेबाबत विचारणा केली असता आरोपीने फिर्यादीस खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची व नोकरी घालवण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. तसेच फिर्यादीविरोधात खोट्या तक्रारी अर्ज सादर करण्यास सुरुवात केल्याने आपली फसवणूक झाल्याची खात्री फिर्यादीस झाली.या प्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.



## सरकारी सेवेतील उमेश पोरे यांचा सत्कार

**पंढरपूर, दि. १४ जानेवारी-**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यकारी सहाय्यकपदी निवड झाल्याबद्दल उमेश पोरे यांचा पंढरपूर मार्केट यार्ड येथील संपर्क कार्यालयात विशेष सत्कार करण्यात आला. नागेश फाटे यांच्या हस्ते हा सन्मान सोहळा संपन्न झाला. एका जबाबदार पदावर निवड झाल्याबद्दल उमेश पोरे यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या सत्कार समारंभाला विष्णू पवार, अरुण पाटील, दत्तात्रेय पोरे, नवनाथ बचूटे उपस्थित होते.



## माजी आमदार राऊत यांच्या हस्ते हिंदवी समाचार दिनदर्शिकेचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ जानेवारी-**

राजमाता माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून, डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना प्रणित, हिंदवी समाचार दिनदर्शिका २०२६ चे प्रकाशन माजी आमदार राजेंद्र राऊत व नगराध्यक्षा तेजस्विनी कथले यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बार्शी नगरपरिषदेसमोरील शिवसृष्टी येथे छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. ज्येष्ठ पत्रकार राजा माने यांच्या नेतृत्वाखाली डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेची स्थापना २०२१ मध्ये करण्यात आली. राजा माने यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेचे राज्य प्रसिद्ध प्रमुख व हिंदवी समाचारचे संपादक धिरज शेळके यांच्या हिंदवी समाचार दिनदर्शिका २०२६ चा प्रकाशन सोहळा मा. आ. राजेंद्र राऊत व नगराध्यक्षा तेजस्विनी कथले यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी उपनगराध्यक्ष रोहित पाटील, वैद्यकीय अधीक्षक डॉ. शितल बोपलकर, ॲड. राजश्री डमरे-तलवाड, अपर्णा मिठे, संतोष सूर्यवंशी, संजय बारबोले, बाबासाहेब कापसे, सिद्धार्थ बसवंत, नगरसेवक दास मस्के, मदन गव्हाणे, भैय्या बारंगुळे, विजय राऊत, अजय पाटील, ॲड. गणेश हांडे, उमेश काळे, राजाभाऊ पैकेकर उपस्थित होते. सूत्रसंचालन किरण कोकाटे यांनी केले. प्रस्ताविक विजय राऊत यांनी तर आभार ॲड. आकाश तावडे यांनी मानले.

## सोलापुरात थंडीचा जोर झाला कमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

गेल्या काही दिवसांपूर्वी सोलापूरच्या तापमानात कमालीची घट झाली होती. सोलापूरचे तापमान १२ अंशापर्यंत उतरले होते. मात्र गेल्या चार दिवसांपासून तापमानामध्ये सातत्याने वाढ होत चालली आहे. बुधवार दि.१४ जानेवारी रोजी २०.४ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली आहे. त्यामुळे सोलापूरची थंडी हळूहळू कमी होऊ लागली आहे.

तर दुसरीकडे तापमानामध्ये सातत्याने वाढ होऊ लागली आहे. यंदा सोलापूर जिल्ह्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडला होता. तसेच सीना नदीला महापूर आला होता. त्यामुळे यंदा कडाक्याची थंडी पडणार हे सर्वसामान्यांनी गृहितच धरले होते. मात्र आता उन्हाळ्याची चाहूल नागरिकांना लागली आहे.




## बार्शी एमआयटी कॉलेजमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१४ जानेवारी-**

एमआयटी आर्ट्स कॉमर्स सायन्स कॉलेज बार्शी येथे दि. ७ ते ९ जानेवारी दरम्यान क्रीडा सप्ताह आयोजित करण्यात आला होता.

या क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन चव्हाण यांच्या हस्ते व एम. आय. टी. विश्वशांती गुरुकुल स्कूलचे प्रिन्सिपल आनिष नाद यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या क्रीडा स्पर्धेत सांघिक प्रकारामध्ये क्रिकेट, खो खो, कबड्डी आणि लगोरी तर मैदानी स्पर्धेत १०० मी धावणे, गोळाफेक, थाळीफेक, या मैदानी खेळांचा समावेश होता. त्याचप्रमाणे बुद्धिबळ आणि कॅरम इत्यादी खेळांचा समावेश होता. खेळामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात अनेक प्रकारचे बदल घडून त्यांच्यात खिलाडूवृत्ती व नेतृत्व गुण विकसित होण्यात मदत होते, असे प्रतिपादन डॉ. सचिन चव्हाण यांनी उद्घाटनावेळी केले. सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी क्रीडा विभाग प्रमुख प्रा. अमोल मिरगणे तसेच महाविद्यालयातील इतर प्रा. जगनाडे व प्रा. बोंडगे आदींनी नियोजन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनिकेत कारंडे यांनी तर आभार प्रा. सोनवणे यांनी मानले.

# पंढरपूर, मंगळवेढ्यात अत्याधुनिक क्रीडा संकुल उभारण्याचा मार्ग मोकळा

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून आ.आवताडे यांच्या मागणीची दखल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ जानेवारी-**

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघातील पंढरपूर आणि मंगळवेढा शहरामध्ये अत्याधुनिक क्रीडा संकुल मंजूर करण्यात यावे अशी मागणी आमदार समाधाना अवताडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. या मागणीची तात्काळ दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रस्ताव सादर करण्याचे आदेश संबंधित विभागाला दिल्याने कार्यक्षम आमदार समाधान आवताडे यांच्या पाठपुराव्यामुळे पंढरपूर आणि मंगळवेढा येथील अत्याधुनिक क्रीडा संकुलन उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघातील पंढरपूर हे तिर्थक्षेत्र असल्यामुळे लाखो भाविक विठुरायाचे दर्शनासाठी येत असतात. पंढरपूर शहरामध्ये बरेच मैदान हे पार्किंग नावाखाली वापरले जातात. अनेक युवक-युवती स्पर्धा परीक्षा, पोलीस भरतीची तयारी करत असतात. शहरातील व तालुक्यातील मुलांसाठी एकही मैदान किंवा क्रीडांगण नाही. त्यामुळे सरावासाठी अनेक युवकांना बाहेर ठिकाणी जावे लागत आहे. तरी शहरामध्ये अत्याधुनिक क्रीडासंकुल होणे गरजेचे आहे. तसेच मंगळवेढा तालुक्यामध्ये दर्जेदार आणि गुणवंत खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय पातळीवर अतिशय चांगली कामगिरी केलेली आहे.



याबाबत पंढरपूर आणि मंगळवेढा या दोन्हीही शहरांमध्ये सर्व सोयी सुविधा युक्त अत्याधुनिक क्रीडा संकुल उभारण्यात यावे अशी मागणी पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे आमदार समाधान आवताडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली होती. या मागणीची दखल मुख्यमंत्र्यांकडून घेण्यात आली असून संबंधित विभागाला प्रस्ताव सादर करण्याचे आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्याने कार्यक्षम आमदार समाधान आवताडे यांच्या प्रयत्नांमुळे पंढरपूर आणि मंगळवेढा शहरात लवकरच अत्याधुनिक क्रीडा संकुलन उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



## राष्ट्ररत्न फाउंडेशनतर्फे तिळगुळ समारंभ; गरजूंना साडी वाटप करुन संक्रांत साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशनतर्फे कन्स्ट्रक्शनवर मोलमजुरी करून संसाराला हातभार लावणाऱ्या दिवसभर टोपलीवर विटा सिमेंटचे ओझे घेऊन राबणाऱ्या अशा काही सखींना फाउंडेशन तर्फे तिळगुळ वाटप केले. तसेच संक्रांतीचे वाण म्हणून सर्वांना साडी वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मीनाक्षी जोकारे या उपस्थित होत्या. फाउंडेशनच्या अध्यक्ष प्रांजली मोहीकर यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले की, राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशनचा महत्वाचा उद्देशच हाच आहे की, गरजूंपर्यंत पोहोचणे आणि त्यांच्यासाठी काहीतरी मदत करणे. सेवाभावी वृत्तीने या फाउंडेशनची टीम नेहमीच कार्यरत असते. या कार्यक्रमाची सुरुवात हीच आमुची प्रार्थना या गीताने करण्यात आली. हे गीत पल्लवी स्वामी आणि सर्व सदस्य यांनी सादर केले. सिद्धेश्वर जोकारे यांनी यांनी या कार्यक्रमासाठी सहकार्य केले. कार्यक्रमासाठी प्रा. प्रेमचंद मेने, ज्योती मेने, सारिका शेजाळ, अनुराधा निकम, चंचला खरात, पल्लवी स्वामी, भारती ढोबळे, अनिता रेळेकर, उमा मुंगड, सुनिता होनमोडे, संगीता महिंद्रकर, सुवर्णा कांबळे, प्रज्ञा अवदानी उपस्थित होते. सूत्रसंचालन अध्यक्ष प्रांजली मोहीकर, आभार प्रा. प्रेमचंद मेने यांनी मानले.

CMYK



भाजपा आणि शिंदे सेना पैसे वाटप केल्याशिवाय आणि हिंदू-मुसलमान केल्याशिवाय निवडणुकीत जिंकू शकत नाहीत. प्रचाराची मुदत संपूनही निवडणूक आयोगाने सत्ताधाऱ्यांना वेगळा तिळगुळ दिलाय का?
- **संजय राऊत**, उबाठा खासदार


# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

गुरुवार, १५ जानेवारी २०२६



आपल्या रोजच्या जीवनात नगरसेवक हे महत्वाची भूमिका बजावणारे असतात. त्यामुळे भ्रष्ट माणसांच्या हातात सत्ता देऊ नका. सतर्क राहा. योग्य आणि सुज्ञ उमेदवारांनाच निवडून द्या.
- **तेजस्विनी पंडित**, अभिनेत्री



## विचारपुष्प



धर्माच्या बाबतीत देखील मूलगामी चिंतन केले पाहिजे. 'धर्म' या शब्दाचा अर्थच जीवन धारणा असा आहे. लोकांचे जीवन वैयक्तिक व सामूहिकरीत्या, इहलोकी आणि परलोकी, दैहिक-बौद्धिक- मानसिक- आत्मिक अशा सर्व अंगांनी सुखमय करण्यासाठी आवश्यक अशा नीती, नियम, संहितेलाच धर्म हे नाव आहे.

- **हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# 'बिनविरोध'विरुद्धची याचिका फेटाळली

**• मुंबई उच्च न्यायालयाचा मनसेला झटका • विसंगत युक्तिवादामुळे न्यायालय संतप्त**

**मुंबई, १४ जानेवारी**
बिनविरोध निवडीला आव्हान देणाऱ्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला महापालिका मतदानाच्या एक दिवस आधी जबर धक्का बसला आहे. या मुद्द्यावर दाखल केलेली याचिका मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी फेटाळली. ही याचिका मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी दाखल केली होती. केवळ इतकेच नव्हे, तर चुकीची माहिती देऊन न्यायालयाची दिशाभूल केल्याबद्दल खंडपीठाने याचिकाकर्त्यांवर संताप व्यक्त केला.

ही याचिका आधीपासून प्रलंबित असलेल्या इतर याचिकांप्रमाणेच असल्याचे आज सकाळी तिचा उल्लेख झाला त्यावेळी न्यायालयाला सांगण्यात आले. मात्र, सुनावणी सुरू झाल्यावर ही याचिका इतर प्रलंबित प्रकरणांसारखी नसून थेट निवडणुकीशी संबंधित आहे, असा युक्तिवाद आभासी स्वरूपात उपस्थित असलेले वकील असीम सरोदे यांनी केला.



याचिकाकर्त्यांच्या या परस्परविरोधी विधानांमुळे मुख्य न्यायाधीश एस. चंद्रशेखर आणि न्या. गौतम ए. अखंड यांचे खंडपीठ कमालीचे संतप्त झाले.

तुमच्या वक्तव्यात साधर्म्य नाही सकाळी तुम्ही ही याचिका इतर याचिकांसारखीच असल्याचे वक्तव्य केले. मात्र, या दोन्ही वक्तव्यांत साधर्म्य नाही. एखाद्या पक्षकारासाठी अशी चुकीची माहिती देण्यामागे तुम्हाला घाई होती की भीती वाटत होती, असा जाब खंडपीठाने असीम सरोदे यांना विचारला. चुकीची माहिती दिल्याबद्दल न्यायालयाने सुरुवातीला याचिकाकर्त्यांना दंड ठोठावण्याचे संकेत दिले होते. (वृत्तसंस्था)

### दंडाची टांगती तलवार टळली, पण याचिका फेटाळली

न्यायालयाने सुरुवातीला दंडात्मक कारवाई करण्याची भूमिका घेतली होती. मात्र, दीर्घ युक्तिवादानंतर न्यायालयाने दंड न आकारण्याचा निर्णय घेतला. असे असले तरी, बिनविरोध निवडीच्या प्रक्रियेत हस्तक्षेप करण्यास नकार देत न्यायालयाने अविनाश जाधव यांची ही याचिका फेटाळून लावली आहे.

### भाजपाचे सर्वाधिक उमेदवार बिनविरोध

राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये मतदान होण्यापूर्वीच ६६ उमेदवार विजयी झाले आहेत. यामध्ये भाजपाचे सर्वाधिक ४४, शिंदेंच्या शिवसेनेचे १९ उमेदवार विजयी झाले आहेत. उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू होत्या. मनसेने या प्रक्रियेवर कायदेशीर आक्षेप घेतला होता. मात्र, आता उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळल्यामुळे या जागांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला असून मनसेसाठी हा मोठा कायदेशीर पराभव मानला जात आहे.





## धाराशिव शहरात फॉर्च्यूनरचा भीषण अपघात
# एकाचा जागीच मृत्यू, चार जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**धाराशिव, दि. १४ जानेवारी-**
शहरातील आयुर्वेदिक कॉलेज परिसरातील उड्डाणपुलावर भरधाव वेगात असलेल्या फॉर्च्यूनर कारने डिव्हायडरला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात एका प्रवाशाचा जागीच मृत्यू झाला असून चार जण गंभीर जखमी झाले आहेत.

अपघातग्रस्त फॉर्च्यूनर कारमध्ये एकूण पाच प्रवासी होते. हे सर्व प्रवासी वाशी तालुक्यातील तेरखेडा गावचे रहिवासी असल्याची माहिती मिळाली आहे. उड्डाणपुलावरून जात असताना वाहनाचा वेग अधिक असल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि कार थेट डिव्हायडरवर आदळली. धडकेचा आवाज इतका जोरदार होता की कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

जखमींना तात्काळ रुग्णवाहिकेद्वारे नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघातात मृत्युमुखी पडलेल्या प्रवाशाचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. या अपघातामुळे काही काळ उड्डाणपुलावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून वाहतूक सुरळीत केली. वेगावर नियंत्रण न राहिल्याने हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## महत्त्वाचे

### सलग दुसरे सत्रही घसरणीचे

**मुंबई** : वाढत्या भू-राजकीय तणावामुळे आयटी, उपभोग्य वस्तू आणि निवडक बँकिंग क्षेत्रातील ब्ल्यू-चिप शेअर्समधील घसरणीमुळे सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये बुधवारी



सलग दुसऱ्या सत्रात घसरण झाली. या व्यतिरिक्त बाजारातून बाहेर पडणाऱ्या विदेशी गुंतवणूक तसेच अमेरिकेच्या नवीन शुल्काच्या अनिश्चिततेमुळेही गुंतवणूकदार अस्वस्थ आहेत, असे व्यापाऱ्यांनी सांगितले. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक २४४ अंकांनी घसरून ८३,३८२ वर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ६६ अंकांनी घसरून २५,६६५ या पातळीवर बंद झाला. विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी १,४९९.८१ कोटी रुपयांचे शेअर्स मंगळवारी विकले. देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणुकदारांनी याच दिवशी १,१८१,७८ कोटी रुपयांचे शेअर्स खरेदी केले.

# नीट-पीजी : कट-ऑफमध्ये कपात

### जागा रिक्त राहिल्याने निर्णय

**नवी दिल्ली, १४ जानेवारी**
मोठ्या प्रमाणात जागा रिक्त राहिल्याने केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने नीट-पीजी २०२५च्या पात्रता कट-ऑफमध्ये कपात करण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यामुळे एससी, एसटी आणि ओबीसी प्रवर्गातील उमेदवारांना -४० पर्सेंटाईल मिळाले तरीही अभ्यासक्रमाला प्रवेश मिळणार आहे. सामान्य आर्थिक दुर्बल घटक प्रवर्गासाठीही कट-ऑफ कमी करण्यात आला आहे.

एनबीईएमएसने मंगळवारी प्रकाशित केलेल्या सूचनेनुसार, सामान्य प्रवर्गासाठी नीट-पीजी कटऑफ ५० वरून सात पर्सेंटाईलपर्यंत कमी करण्यात आला आहे. दुसऱ्या फेरीचे समुपदेशन पूर्ण झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

उपलब्ध जागांचा पुरेपूर वापर सुनिश्चित करणे हा या सुधारणेचा उद्देश आहे. ज्या भारताच्या प्रशिक्षित वैद्यकीय तज्ज्ञांची संख्या वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. अशा जागा रिक्त ठेवल्याने आरोग्यसेवा सुधारण्याच्या प्रयत्नांना बाधा येते आणि मौल्यवान शैक्षणिक संसाधनांचे नुकसान होते, असे सूत्रांनी सांगितले. नीट-पीजी ही एक क्रमवारी यंत्रणा असून, केंद्रीकृत समुपदेशनाद्वारे जागांचे पारदर्शक, गुणवत्तेवर आधारित वाटप सुलभ करते. जागा असूनही, पूर्वीच्या पर्सेंटाईल मर्यादांमुळे पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित राहिली होती. (वृत्तसंस्था)

### फुटीरतावादी आसिया अंद्राबी दोषी

**नवी दिल्ली** : नवी दिल्लीतील विशेष न्यायालयाने काश्मिरी फुटीरतावादी आसिया अंद्राबी आणि सोफी फहमीदा व नाहिदा नसरीन या दोन साथीदारांना एका दहशतवादी प्रकरणात दोषी ठरवले. त्यांच्या शिक्षेवरील सुनावणी १७ जानेवारी रोजी होईल. आसिया अंद्राबी ही महिला फुटीरतावादी संघटना दुख्तरान-ए-मिल्लतची प्रमुख आहे.

आसिया अंद्राबीला २०१८ मध्ये अटक करण्यात आली होती. एनआयएने तिच्यावर दहशतवादी कट रचल्याचा आरोप ठेवला होता.

# खाजगी शाळेत 'त्या' विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देणे देशसेवा

**सुप्रीम कोर्टाची टिप्पणी, राज्य सरकारांना अहवाल सादर करण्याचा आदेश**

**नवी दिल्ली, १४ जानेवारी**
समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना परिसरातील खासगी शाळांमध्ये प्रवेश नाकारला जाणार नाही, याची खात्री करणे ही राज्य सरकारे आणि स्थानिक प्रशासनांची जबाबदारी आहे.

खासगी विनाअनुदानित शाळांनी २५ टक्के कोट्यातून गरीब विद्यार्थ्यांना प्रवेश देणे हे केवळ कायदेशीर कर्तव्य नसून देशसेवा असल्याची टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली. खासगी शाळांमध्ये दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंदर्भात राज्य व केंद्रशासित प्रदेशांनी सविस्तर अहवाल सादर करावा, असा आदेश न्या. पी.एस. नरसिंहा आणि न्या. ए.एस. चांदूरकर यांच्या न्यायासनाने दिली.

मुलांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अर्थात् आरटीई कायदा, २००९ च्या कलम चा अर्थ स्पष्ट करताना न्यायासनाने उपरोक्त टिप्पणी केली. २०१६ मध्ये एका पालकाने आपल्या मुलास २५ टक्के कोट्यातून प्रवेश मिळावा म्हणून मुंबई उच्च न्यायालयात दाद मागितली होती. मात्र, ऑनलाइन प्रक्रियेत अर्ज केला नव्हता, असे सांगत न्यायमूर्तींनी पालकांनाच जबाबदार धरत याचिका फेटाळली. उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणारी याचिका दाखल केली होती. यावर सुनावणी घेताना न्यायासनाने म्हटले की, खासगी शाळांनी पहिल्या इयत्तेत किंवा पूर्व- प्राथमिक वर्गांमध्ये किमान २५ टक्के जागा वंचित गटातील मुलांसाठी आरक्षित ठेवणे अनिवार्य आहे. या बदल्यात सरकारकडून संबंधित शाळांना प्रति विद्यार्थी खर्चाची प्रतिपूर्ती करायला हवी.

### ट्रम्प टॅरिफवरील निर्णय पुढे ढकलला

**वॉशिंग्टन** : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या टॅरिफवरील निर्णय सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा समोर ढकलला आहे. अमेरिकी न्यायालयाने यापूर्वी ९ जानेवारी रोजी निर्णय पुढे ढकलला होता. या मुद्द्यावरील निर्णय कधी दिला जाईल, हे न्यायालयाने स्पष्ट केले नाही. सर्वोच्च न्यायालयाने तीन इतर प्रकरणांवर निर्णय दिले. मात्र, टॅरिफच्या मुद्द्यावर कोणताही युक्तिवाद झाला नाही तसेच यावर सुनावणी कधी होईल हेदेखील स्पष्ट करण्यात आले नाही. त्यामुळे हे प्रकरण अनिश्चिततेच्या मार्गाने गेले आहे. अमेरिकेच्या जवळपास सर्वच प्रमुख व्यापारी भागीदारांवर एकतर्फी दहा ते ५० टक्क्यांपर्यंतचे शुल्क लादून ट्रम्प यांनी संवैधानिक आणि कायदेशीर अधिकाराचा अतिरेक केला का, याचा तपास या प्रकरणात केला जात आहे.

# ४० हजार कोटींचे प्रकल्प रद्द

**देवेंद्र फडणवीस यांची माहिती**

**मुंबई, १४ जानेवारी**
खर्चाच मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने जवळपास ४० हजार कोटी रुपयांचे पायाभूत सुविधा प्रकल्प रद्द करण्यात आले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी दिली. मात्र, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील नगरविकास विभागाला लक्ष्य केले जात आहे, असा आरोप काँग्रेसने या मुद्द्यावर केला.



हा अंतर्गत मतभेदांचा किरकोळ प्रकार नसून, महायुती सरकारमधील एक मोठी फूट आहे, असा आरोप काँग्रेसने केला. पूर्वी मंजूर झालेले अनेक पायाभूत सुविधा प्रकल्प खर्चातील प्रचंड वाढ आणि परिस्थितीतील बदलांमुळे आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य झाले आहेत.

खर्च वाढल्यामुळे जवळपास ४० हजार कोटी रुपयांचे प्रकल्प रद्द करावे लागले. हे निर्णय योग्य विचारविनिमयानंतर घेण्यात आलेहोते आणि ते पूर्णपणे सद्भावनेने घेतलेले होते, असे फडणवीस म्हणाले. सरकारने मागील कार्यकाळात नगरविकास विभागाअंतर्गत मंजूर झालेल्या अनेक प्रस्तावांचा आढावा घेतला. सुधारित नियम आणि आर्थिक परिणामांच्या पृष्ठभूमीवर त्यापैकी अनेकांवर पुनर्विचार करणे आवश्यक असल्याचे आढळले, असे त्यांनी सांगितले. विसंगती दूर करण्यासाठी आणि नियोजित शहरी वाढ सुनिश्चित करण्यासाठी सुधारणा करणे आवश्यक आहे, असे फडणवीस यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# समुद्रमंथनाची भगवान विष्णूची प्राचीन दुर्लभ मूर्ती दर्शनासाठी खुली

**इतिहासप्रेमींच्या व महेश डोंगरे पाटील यांच्या मागणीला यश**

**सिंदखेडराजा, १४ जानेवारी**
येथील ऐतिहासिक श्रीमंत लखुजीराव जाधव यांच्या समाधी परिसरात नुकतीच सापडलेली समुद्रमंथनाची प्राचीन मूर्ती अखेर सर्वसामान्य नागरिकांच्या दर्शनासाठी खुली करण्यात आली आहे. १२ जानेवारीपासून या दुर्मिळ व ऐतिहासिक मूर्तीचे दर्शन खुले झाले असून पहिल्याच दिवशी हजारो भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. पुढील काळातही ही मूर्ती दर्शनासाठी खुली राहणार असल्याचे संबंधित विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

या मौल्यवान ऐतिहासिक ठेव्याच्या जतन व संवर्धनासाठी उभारण्यात आलेल्या मूर्ती संग्रहालयाचे उद्घाटन जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना जिल्हाधिकाऱ्यांनी सिंदखेडराजा हे शहर गौरवशाली इतिहासाचे साक्षीदार असल्याचे सांगितले. येथे सापडलेली समुद्रमंथनाची मूर्ती ही परिसराच्या सांस्कृतिक व पुरातत्त्वीय वारशात मोलाची भर घालणारी असल्याचे त्यांनी नमूद केले. या संग्रहालयाच्या माध्यमातून भावी पिढ्यांना इतिहासाशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य होणार असून सिंदखेडराजाच्या ऐतिहासिक ओळखीला नवी ऊर्जा मिळेल, असेही त्यांनी सांगितले.



श्रीमंत लखुजीराव जाधव यांच्या समाधी परिसरात नुकतीच सापडलेली समुद्रमंथनाची प्राचीन मूर्ती

दरम्यान, ही मूर्ती सर्वसामान्य नागरिकांसाठी दर्शनासाठी खुली करण्यात यावी, या मागणीसाठी छत्रपती मराठा सेना संस्थापक अध्यक्ष व मराठा क्रांती मोर्चा राज्य समन्वयक महेश डोंगरे पाटील यांनी कार्यकर्त्यांसह ९ जानेवारी रोजी शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषद घेतली होती.

यावेळी अशोक राजे जाधव, दीपक किंगरे, बाळासाहेब शेळके, गुलाबराव राठोड, अतिश राजे जाधव, शंकर शिंदे यांच्यासह मराठा क्रांती मोर्चाचे पदाधिकारी उपस्थित होते.

१२ जानेवारी रोजी झालेल्या उद्घाटनानंतर मोठ्या संख्येने जिजाऊ भक्त, इतिहासप्रेमी, देशभरातून आलेले भाविक तसेच स्थानिक नागरिकांनी या मूर्तीचे दर्शन घेतले. (तभा वृत्तसेवा)

### लाईफ जॅकेट नाकारल्याने झुबीन गर्ग यांचा मृत्यू

**सिंगापूर, १४ जानेवारी**
प्रसिद्ध भारतीय गायक आणि संगीतकार झुबीन गर्ग यांचा मृत्यू अतिमद्यपान आणि सुरक्षिततेचे नियम डावलल्यामुळे झाल्याची माहिती सिंगापूर पोलिसांनी बुधवारी कोरोनर न्यायालयात दिली. १९ सप्टेंबर २०२५ रोजी एका खाजगी नौकेवरील (यॉट) पार्टीदरम्यान सिंगापूरमधील लाझारस बेटाजवळ समुद्रात पोहताना झुबीन गर्ग यांचा बुडून मृत्यू झाला होता. दरम्यान, झुबीन यांच्या मृत्यूबाबत आसाममध्ये अनेक तर्कवितर्क लढवले जात होते. त्यांच्या व्यवस्थापकासह काही सहकाऱ्यांवर कट रचल्याचे आणि विषप्रयोगाचे आरोपही करण्यात आले होते. मात्र, सिंगापूर पोलिसांनी हे सर्व दावे फेटाळून लावले आहेत.

मुख्य तपास अधिकाऱ्यांनी सिंगापूरच्या न्यायालयात सांगितले की, सुरुवातीला पोहताना झुबीन यांनी लाईफ जॅकेट घातले होते, मात्र नंतर त्यांनी ते काढून ठेवले. पुन्हा समुद्रात उतरले असता त्यांना दुसरे लहान लाईफ जॅकेट देण्यात आले; परंतु त्यांनी ते घेण्यास नकार दिला. लाईफ जॅकेटशिवाय ते पाण्यात उतरले. (वृत्तसंस्था)

### दहशतवाद्यांचा भारतात हिंसेचा कट

**इस्लामाबाद, १४ जानेवारी**
बहावलपूर येथील एका मशिदीत दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबा आणि जैश ए मोहम्मदच्या नेत्यांची मंगळवारी गुप्त बैठक झाली. यावेळी शंभरपेक्षा अधिक दहशतवादी उपस्थित होते. भारतातील विविध भागात हल्ला करणे आणि काश्मिरात मोठ्या प्रमाणात घुसखोरी वाढविण्याच्या उद्देशाने ही बैठक असल्याची माहिती आहे.

जैशचे मुख्यालय मरकझ सुभानल्लाहपासून काही किलोमीटर अंतरावर झालेल्या बैठकीला हाफीझ सईदचा मुलगा तल्हा सईद, लष्करचा उपप्रमुख सैफुल्लाह कसुरी आणि हाफीझ अब्दुल रौफ यांच्यासह अनेक प्रमुख लष्करचे दहशतवादी उपस्थित होते. दहशतवाद्यांच्या बैठकीची एक चित्रफीत समाज माध्यमावर प्रसारित झाली आहे. गुप्तचर विभागाने माहिती देताना सांगितले की, ऑपरेशन सिंदूरनंतर लष्कर आणि जैशच्या दहशतवाद्यांची पहिल्यांदा एकत्र बैठक झाली. भारतात हल्ले वाढविणे आणि जम्मू-काश्मीरच्या सीमा भागातून घुसखोरी वाढविण्यावर यावेळी चर्चा झाली. आगामी काळात पाकिस्तानच्या कुरापती वाढण्याची शक्यता असून, गुप्तचर संस्था आणि भारतीय लष्कर अधिक सतर्क झाले आहेत

# निर्यात सज्जता निर्देशांकात महाराष्ट्र अव्वल



**तामिळनाडू, गुजरातही आघाडीवर**

**नवी दिल्ली, १४ जानेवारी**
**नीती आयोगाच्या चौथ्या निर्यात सज्जता निर्देशांकात २०२४ मध्ये महाराष्ट्र, तामिळनाडू आणि गुजरात ही राज्ये अव्वल तीन स्थानांवर आली आहेत. या निर्देशांकाचा उद्देश राज्यांची निर्यात क्षमता आणि कामगिरीच्या बाबतीत त्यांची सज्जता तपासण्याचा आहे.**

महाराष्ट्राच्या पाठोपाठ तामिळनाडू, गुजरात, उत्तरप्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि पंजाबचा क्रमांक लागतो, असे नीती आयोगाने बुधवारी प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटले आहे. लहान राज्यांमध्ये उत्तराखंडने अव्वल स्थान पटकावले आहे. त्यानंतर जम्मू-काश्मीर, नागालॅण्ड, दादरा-नगर-हवेली, दीव, गोवा आणि त्रिपुराचा क्रमांक लागतो.

अलिकडच्या वर्षांत अनेक राज्यांनी समर्पित धोरणे, संस्था आणि पायाभूत सुविधांच्या माध्यमातून आपली निर्यात दृष्टी मजबूत करण्यास सुरुवात केली आहे. या माध्यमातून सक्रिय आणि सुनियोजित दृष्टिकोनाकडे स्पष्ट बदलाचे संकेत मिळत आहेत, असे नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व्ही. आर. सुब्रमण्यम् यांनी हा अहवाल जारी करताना सांगितले.

जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था असलेल्या भारतासाठी आर्थिक लवचिकता सुधारण्यासाठी, व्यापार तूट कमी करण्यासाठी आणि सर्वसमावेशक वाढीला चालना देण्यासाठी निर्यात अत्यंत महत्वाची आहे.

निर्यात सज्जता निर्देशांक-२०२४ निर्यात धोरणे, व्यावसायिक वातावरण, पायाभूत सुविधांची गुणवत्ता आणि निर्यातीचे परिणाम यासह अनेक घटकांचे मूल्यांकन करण्यासाठी एक सुसंगत डेटा आधारित दृष्टिकोन वापरतो. राज्य आणि केंद्र सरकारच्या दोन्ही स्रोतांकडून डेटा गोळा केला जातो आणि प्रत्येक निर्देशकाला त्याच्या महत्त्वावर आधारित वजन दिले जाते. (वृत्तसंस्था)

### आर्थिक वाढीसाठी निर्यात महत्त्वाची

**निर्यात हा आर्थिक वाढीचा एक प्रमुख आधारस्तंभ आहे आणि देशांना जागतिक मूल्य साखळ्यांमध्ये आपले स्थान मजबूत करण्यास, परकीय चलन मिळवण्यास आणि जागतिक स्पर्धात्मकता वाढवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो.**

> भारत जसजसे आपले मुक्त व्यापार आणि आर्थिक भागीदारी करारांचे जाळे विस्तारत आहे, तसतसे देशांतर्गत मजबूत पायाचे महत्त्व वाढत आहे. नवीन संधींना प्रतिसाद देऊ शकतील, जागतिक मानकांशी जुळवून घेतील आणि जिल्ह्यांमध्ये स्पर्धात्मकता निर्माण करतील, असा परिसंस्थांना चालना देणे हा याचा राज्यासाठी अर्थ आहे.
>
> **व्ही. आर. सुब्रमण्यम्,**
> नीती आयोगाचे सीईओ

# इराणमधील परिस्थिती चिघळली

**आंदोलकाला फाशीची शिक्षा; ट्रम्प संतप्त**

**तेहरान, १४ जानेवारी**
इराणमध्ये मागील १९ दिवसांपासून सरकारविरोधात तीव्र निदर्शने सुरू असताना आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या २६ वर्षीय इरफान सोलतानीला सर्वोच्च न्यायालयाने मृत्युदंडाची शिक्षा सुनावली आणि शिक्षेच्या काही तासातच त्याला फाशी देण्यात आली. यामुळे इराणधील परिस्थिती आणखीनच चिघळली आहे.



इरफान

आंदोलनात सहभागी १० हजारांवर लोक अटकेत असून त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला दाखल करण्यात आला. सर्वोच्च न्यायालयात त्यांच्या आरोपावर सुनावणी सुरू आहे. अटकेतील लोकांना लवकरच मृत्युदंड देण्याची शक्यता असल्याने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी संताप व्यक्त करीत इराणवर लष्करी कारवाईचा इशारा दिला.

आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटनेने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांच्याविरोधात आंदोलन करणाऱ्यांना अटक करून कारागृहात डांबण्यात येत आहे. आतापर्यंत १० हजारांपेक्षा अधिक लोकांवर कारवाई करण्यात आली, तर सुरक्षा दलासोबत झालेल्या संघर्षात ८,५०० जणांना जीव गमवावा लागला. आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या २६ वर्षीय इरफान सोलतानी याला मंगळवारी सर्वोच्च न्यायालयाने देशद्रोहाच्या आरोपात मृत्युदंडाची शिक्षा सुनावली होती आणि काही तासातच त्याला फासावर चढविण्यात आले. अटक करण्यात आलेल्या हजारो लोकांवर खटले दाखल करण्यात आले. (वृत्तसंस्था)

### तातडीने इराण सोडा; परराष्ट्र खात्याचे भारतीयांना आदेश

**नवी दिल्ली** : इराणमधील बिघडलेली सुरक्षा व्यवस्था आणि सुरू असलेल्या हिंसक आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने आज एक महत्वाची अ‍ॅडव्हायझरी जारी केली आहे. परराष्ट्र मंत्रालयाने सर्व भारतीय नागरिकांना पुढील सूचना मिळेपर्यंत इराणचा प्रवास टाळण्याचा कडक इशारा दिला असून, जे नागरिक सध्या तिथे वास्तव्यास आहेत त्यांना तातडीने उपलब्ध साधनांनी देश सोडण्याचा सल्ला दिला आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# 'दहा मिनिटांना' चाप स्वागतार्हच...

दारावरची बेल वाजते... घड्याळात पाहताच दिसते की बरोबर ९ मिनिटे ५० सेकंद झालेली आहेत... बाहेर एक विशी-पंचविशीचा तरुण उभा असतो, ज्याला दम लागलेला आहे. कपाळावर घामाच्या धारा... आणि डोळ्यांत वेळेत पोहोचल्याचे समाधान नव्हे, तर वेळेत पोहोचलो नसतो तर काय घडले असते, याची एक अनामिक भीती आहे..! घरातून आलेली व्यक्ती कौतुकाने म्हणते, ''व्वा...किती फास्ट सर्व्हिस आहे रे..''!

पण त्याचवेळी शहराच्या दुसऱ्या कुठल्या तरी कोपऱ्यात याच वेगाच्या शर्यतीत एखादा तरुण ट्रकखाली चिरडला जात असतो किंवा कायमचा अपंग झालेला असतो. चहापत्ती, बिस्किट किंवा शॅम्पूच्या एका बाटलीसाठी कुण्या माउलीच्या या रक्तमांसाच्या गोळ्याला मृत्यूच्या दाढेत ढकलणारी ही '१० मिनिटांची डिलिव्हरी' खरंच प्रगतीचे सूचक आहे का? वेगाच्या या अनावश्यक, अमानवीय स्पर्धेला केंद्र सरकारने आता लगाम घातला, हे खूप चांगले झाले. तुमच्या त्या १० मिनिटांच्या 'युनिक सेलिंग पॉईंट'साठी कोणाच्या घराचा दिवा विझवायचा का? असा प्रश्न ब्लिंकिट, झेप्टो, स्विगी, इन्स्टामार्ट आणि झोमॅटो यासारख्या कंपन्यांना विचारून सरकारने सामाजिक बांधिलकी जपली आहे. त्याचे स्वागत केले पाहिजे. हल्ली वेगाची स्पर्धा जीवनाच्या साऱ्याच क्षेत्रात उतरली आहे. अवघा समाजच जणू स्पर्धेच्या 'मोड'मध्ये आहे. अनावश्यक वेग पकडायला तो ऊर फाटेस्तोवर धावत सुटला आहे. वायुवेगाने वस्तू पोहोचवण्याची मानसिकता हेही या स्पर्धेचेच प्रतिबिंब आहे. गेल्या काही वर्षांपासून भारताच्या महानगरांमध्ये आणि आता तर छोट्या नगरांमध्ये देखील एक विचित्र शर्यत सुरू झाली आहे. ही स्पर्धा प्रगतीची नव्हे, तर वेगाच्या अट्टहासाची आहे. आपण मागवलेले दूध, ब्रेड किंवा शॅम्पू आपल्या दारापर्यंत १० मिनिटांत पोहोचविण्यासाठी रस्त्यावर हजारो तरुण रक्ताचे पाणी करीत आहेत. २५ व ३१ डिसेंबरला देशभरातील या 'गिग वर्कर्स'नी त्यासाठी संप पुकारला होता. त्या आंदोलनानंतर 'डिलिव्हरी पार्टनर्स'च्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला. केंद्र सरकारनेही त्या जीवघेण्या दहा मिनिटांच्या पद्धतीवर बंदी घालण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यामुळे आता अशा साऱ्या कंपन्यांना त्यांच्या जाहिराती बदलाव्या लागणार आहेत. खरे तर, घरोघरी वस्तू पुरवण्याचा या कंपन्यांमध्ये सुरू असलेली स्पर्धा ही ग्राहकांच्या सोयीपेक्षाही 'कोण कोणाला मागे टाकतो' या अहंकाराची जास्त आहे. कुणी १५ मिनिटे म्हणतोय म्हणून दुसरा १० मिनिटांचा दावा करीत होता, तर तिसरा ९ मिनिटांतच वस्तू पोहोचविण्याची हमी घेत होता. पण त्यामागे दडलेले वेठबिगारी अत्यंत भयावह आहे. या कंपन्यांच्या 'अल्गोरिदम'मध्ये माणसाला माणूस नाही, तर केवळ एक 'डॉट' समजले जाते. कारण त्यात भावनेला अजिबात थारा नाही.

ज्या वयात हातात पुस्तके असायला हवीत किंवा डोळ्यात उज्ज्वल भविष्याची स्वप्ने असायला हवीत, ते कोवळ्या वयाचे तरुण हातात गाडीचे 'हॅण्डल' आणि पाठीवर वस्तूंची 'बॅग' घेऊन सुसाट सुटले होते. त्यांना भीती होती ती कंपनीची श्रेणी कमी होण्याची किंवा वेळेत न पोहोचल्यास त्यांना मिळणारे पैसे कापले जाण्याची. या दबावाखाली ते मग पथदिव्यांच्या नियमांना जुमानत नव्हते, स्वतःसोबत रस्त्यावरील निष्पाप नागरिकांचा जीवही धोक्यात घालत होते. कारण त्यांना कंपनीने रस्त्यावरील 'सुसाईड स्क्वॉड' बनवून सोडले होते. सरकारी आणि खाजगी सर्वेक्षणातून समोर आलेली याबाबतची आकडेवारी डोळ्यात अंजन घालणारी आहे. एका अहवालानुसार, भारतात गेल्या दोन वर्षात 'डिलिव्हरी'च्या कामात असलेल्या या 'गिग वर्कर्स'च्या अपघातांचे प्रमाण ३० ते ४० टक्क्यांनी वाढले आहे. रस्ते अपघातांत दरवर्षी शेकडो 'डिलिव्हरी पार्टनर्स' आपला जीव गमावत आहेत. दर १० पैकी ३ अशा तरुणांनी मान्य केले की, त्या दहा मिनिटांच्या दबावामुळे त्यांना किमान एकदा तरी गंभीर अपघाताला सामोरे जावे लागले आहे किंवा ते किरकोळ जखमी तरी झाले आहेत. केवळ अपघातच नाही तर सततचे मानसिक ताण, पाठीचे आजार आणि प्रदूषणाशी होणारा सामना यामुळे या तरुणांचे आरोग्यही कमालीचे खालावले आहे. वेगाने गाडी चालवल्यामुळे होणारा इंधनाचा अपव्यय आणि कार्बन उत्सर्जन हा पर्यावरणासमोरील धोका वेगळाच आहे. पण आता शासनाच्या निर्णयाने देशाच्या तरुणांना यातून काही प्रमाणात तरी दिलासा मिळणार असे गृहीत धरू या.

जीवनाच्या काही क्षेत्रांत वेग अनिवार्य असतो. जसे, जीव वाचवण्यासाठी रुग्णवाहिकेचा वेग समजण्यासारखा आहे. एखादी रुग्णवाहिका जेव्हा सायरन देत सुसाट जाते तेव्हा आपण तिला मार्ग देतो, कारण तिथे प्रश्न जीवन वाचवण्याचा असतो. तिथला प्रत्येक सेकंद मोलाचा असतो. पण घरात संपलेला किराणा १० मिनिटांत घरी आला नाही तर काहीच बिघडत नाही. तसे 'होम डिलिव्हरी'बद्दल आमचे काहीच म्हणणे नाही. पण ही सोय करणाऱ्या कंपन्यांनी आम्हाला अनावश्यक वेळेच्या वेगाचे आमिष तरी का दाखवे आणि आम्ही ते का स्वीकारावे, हा खरा प्रश्न आहे. कारण त्यामुळे अशा कंपन्या रस्त्यावर मृत्यूचे खेळ मांडतात. आपण परीक्षेला जाताना किंवा नोकरीच्या मुलाखतीला जाताना अर्धा तास आधीच घराबाहेर पडतो. मग वस्तूंची ऑर्डर आपण अर्धा तास आधी का देऊ शकत नाही? ग्राहकांनी याबाबतीत 'सेंडिंट' बनू नये आणि कंपन्यांनी आपल्या लाभासाठी गरीब तरुणांचा जीव धोक्यात घालू नये, एवढीच काय ती अपेक्षा आहे.

केंद्र सरकारने या १० मिनिटांच्या डिलिव्हरीवर बंदी घालताना अत्यंत परिपक्व विचार केला आहे. 'गिग इकॉनॉमी'च्या नावाखाली तरुणांकडून वेठबिगारी करवून घेतली जात आहे. त्यांच्या शोषणाचा आणि सार्वजनिक सुरक्षिततेचा असा खेळ आता खपवून घेतला जाणार नाही, असा स्पष्ट संदेशच सरकारने या निर्णयातून दिला आहे आणि तो अतिशय चांगला आहे. या सरकारी निर्देशामुळे केवळ तरुणांचे प्राण वाचणार नाहीत तर रस्त्यांवरील शिस्तही सुधारेल. कंपन्यांनी तंत्रज्ञानाचा वापर सुविधा देण्यासाठी नक्कीच करावा. पण मानवी जीवाला वेठीस धरू नये. सरकारने या निर्णयातून हेही स्पष्ट केले आहे की, मानवी जीवन हे कोणत्याही 'कॉर्पोरेट प्रॉफिट'पेक्षा आणि 'कस्टमर सॅटिस्फॅक्शन'पेक्षा श्रेष्ठ आहे.

सरकारने आपल्या वाट्याचा निर्णय घेतला आहे. 'ब्लिंकिट'ने त्या निर्देशांची अंमलबजावणी केली आहे. त्यांच्या जाहिरातीतील दहा मिनिटांत डिलिव्हरीचा उल्लेख तत्काळ हटवण्यात आला आहे. अन्य कंपन्याही तसा बदल करतील. अन्यथा त्यांच्यावर कारवाई होईल. पण यापुढे आता समाजाची जबाबदारी सुरू होते. आपणही '१० मिनिटांत डिलिव्हरी' व्हावी अशी अपेक्षा सोडली पाहिजे. १० मिनिटांऐवजी जर ३० मिनिटांत वस्तू आली तर आभाळ कोसळणार नाही. उलट एका तरुणाचा जीव धोक्यात न घातल्याचे समाधान नक्कीच मिळेल. ज्यावेळी एखादा 'डिलिव्हरी बॉय' धापा टाकत तुमच्या दारावर येतो, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरचा घाम पाहा. १० मिनिटांच्या आत पोहोचवण्यासाठी त्याने किती वेळा मृत्यूला हुलकावणी दिली असेल, याचा विचार करा. त्याला प्यालाभर पाणी विचारा तर आणखी चांगले. प्रगतीचा वेग हा मानवी मूल्यांना सोबत घेऊन जाणारा असावा. ज्या व्यवस्थेत वस्तूचा वेग माणसाच्या जीवापेक्षा महत्त्वाचा ठरतो, ती व्यवस्था समाजासाठी घातक असते. सरकारने या व्यवस्थेला वेळीच चाप लावून पुन्हा एकदा सिद्ध केले आहे, भारत केवळ बाजारपेठ नाही, तर तो संवेदनशील माणसांचा देश आहे. आपणही घड्याळाच्या काट्यांपेक्षा काळजाची धडधड जपली पाहिजे. आपल्या १० मिनिटांच्या अट्टहासात कोणाचे आयुष्यच 'डिलिव्हर' होऊ देऊ नका. असा प्रयत्न करू पाहणाऱ्या कंपन्यांनाही त्यांच्या घराचा रस्ता दाखवा. हे करताना मात्र वेगाची मर्यादा पाळली नाही तरी चालेल!

# उद्धव ठाकरेंच्या सेनेच्या काळातील अग्निशमन दलाच्या घोटाळ्यांमुळे मुंबईकरांच्या जीवाला धोका

उत्तर गोव्यातील अरपोरा गावात असलेल्या बर्च बाय रोमियो लेन नाईट क्लबमध्ये ६ डिसेंबर २०२५ च्या मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत २५ लोकांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर ६ जण जखमी झाले. या निमित्ताने मुंबईतील आग सुरक्षा नियमांची पायमल्ली आणि अग्निशमन दलांची कार्यक्षमता हा विषय पुन्हा चर्चेत आला आहे. यापूर्वी २९ डिसेंबर २०१७ च्या रात्री लोअर परळमधील कमला मिल्स कंपाऊंडमधील पब्जमधील आगीत १४ लोकांचा दुर्दैवी मृत्यू झाला आणि ५५ हून अधिक लोक जखमी झाले होते. परंतु, गेल्या काही वर्षांमध्ये उघडकीस आलेले मुंबई महानगरपालिकेच्या (BMC) अग्निशमन दलाशी संबंधित गंभीर घोटाळे पाहता उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या सत्ताकाळात मुंबईकर जनतेच्या जीवाशी खेळ झाला असेच म्हणावे लागते.

उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या ताब्यात मुंबई महानगरपालिका असताना अग्निशमन दलाशी संबंधित अनेक घोटाळे झाले. एनओसी (NOC) वाटप घोटाळ्यामुळे अनेक उंच इमारती व व्यावसायिक संकुलांना अपुऱ्या अग्निसुरक्षा व्यवस्थेसह मंजुरी मिळाली आहे. आगीचे बंब, टर्नटेबल शिड्या तसेच इतर उपकरणे खरेदीतील अनियमितता आणि नोकरभरतीतील भ्रष्टाचार यामुळे दलाची सज्जताही धोक्यात आली आहे. भ्रष्टाचाराच्या या प्रकरणांच्या साखळीमुळे हजारो मुंबईकरांच्या जीवितास धोका उत्पन्न झाला आहे. कोणत्याही शहरात अग्निशमन यंत्रणा सदैव सुसज्ज असणे आणि आग सुरक्षा नियमांचे कठोर पालन होणे अत्यावश्यक असते. तथापि, प्रदीर्घ काळ मुंबई महानगरपालिकेची धुरा सांभाळणाऱ्या उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या सत्ताकाळात अग्निशामक दलाला सुसज्ज बनवणे तर बाजूलाच राहिले परंतु विविध उपकरणांची खरेदी, अग्निशमन विभागाची ना हरकत प्रमाणपत्रे जरी करणे यासारख्या बाबीना सोन्याची खाण समजत तत्कालीन सत्ताधारी आणि प्रशासकीय यंत्रणेने मोठ्या प्रमाणात घोटाळे केल्याने मुंबईकरांची सुरक्षा धोक्यात येत राहिलेली आहे. लोअर परळ येथील कमला मिल्स कंपाऊंडमधील मोजोस बिस्ट्रो आणि वन अबव्ह या पब्जमध्ये २९ डिसेंबर २०१७ च्या मध्यरात्रीनंतर लागलेल्या भीषण आगीत १४ लोकांचा होरपळून मृत्यू झाला आणि ५५ हून अधिक लोक जखमी झाले. याप्रकरणी दाखल केलेल्या याचिकेवरील सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयाने ओढलेले ताशेरे या संदर्भात महत्वाचे आहेत. उच्च न्यायालयाने म्हटले होते, ही दुर्दैवी घटना नागरिक प्रशासनाने (BMC) नियमांचे आणि अटींचे काटेकोरपणे पालन करण्यात आलेल्या अपयशाचा परिणाम आहे या घटनेने आमच्या आत्म्याला धक्का दिला आहे आणि बीएमसीने आता आपले घर व्यवस्थित करण्याची (Sets its house in order) वेळ आली आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाशी संबंधित पुढील प्रमुख घोटाळे गेल्या काही वर्षात उघडकीस आले आहेत: नोकरभरती घोटाळा: २०२३ मध्ये अग्निशमन दलाच्या ९१० पदांसाठी भरती प्रक्रियेदरम्यान हा घोटाळा उघडकीस आला. यामध्ये ६१ उमेदवारांना बनावट नियुक्ती पत्रे (Fake ppointment Letters) देऊन आणि खोटी वैद्यकीय तपासणी दाखवून त्यांच्याकडून मोठी रक्कम उकळल्याचा आरोप आहे. या प्रकरणात अग्निशमन दलातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह काही खाजगी व्यक्तींना अटक करण्यात आली. पीडित उमेदवारांकडून सुमारे २.३ कोटी जमा करण्यात आल्याचे उघड झाले आहे. अग्निशमन सेवा शुल्क घोटाळा: मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात ५,००० कोटींचा घोटाळा झाल्याचा आरोप भाजप आमदार अमित साटम यांनी २०२१ मध्ये केला. बांधकाम परवानगी देताना विकासकांकडून अग्निशमन सेवा शुल्क न आकारता, नंतर हे शुल्क रहिवासी/सोसायटींकडून पूर्वलक्षी प्रभावाने वसूल करण्याचे परिपत्रक काढण्यात आले होते. विकासकांकडून डोळेझाक करून टक्केवारी वसूल केल्याचा आणि नंतर रहिवाशांकडून शुल्क आकारण्याचा हा प्रकार असल्याचा साटम यांचा आरोप होता. गणवेश खरेदी घोटाळा: अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांसाठी लागणाऱ्या गणवेशाच्या खरेदीत घोटाळा झाल्याचे २०१४ च्या सुमारास केलेल्या एका चौकशीत उघड झाले होते. युनिफॉर्म पुरवणाऱ्या ठेकेदारांकडून गणवेशाऐवजी पैसे स्वीकारले जात होते आणि कर्मचाऱ्यांना स्वतःच्या पैशाने गणवेश खरेदी करावे लागत होते. या घोटाळ्यामुळे बीएमसीला सुमारे १२ कोटींचे नुकसान झाले होते. टर्नटेबल शिडी खरेदी घोटाळा: मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलासाठी ६८ मीटर उंच टर्नटेबल शिडी खरेदीसाठी काढलेल्या निविदा प्रक्रियेत अनियमितता असल्याचा आणि एका विशिष्ट कंपनीला फायदा पोहोचवण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप भाजपने केला. भाजपच्या म्हणण्यानुसार या शिड्यांच्या खरेदीसाठी निविदांच्या अटी व शर्तींमध्ये हेतुपुरस्सर केलेल्या बदलांमुळे मॅजिरस जीएमबीएच या एकाच कंपनीला निविदा प्रक्रियेत सहभागी होता आले. यापूर्वी ६४ मीटर उंचीच्या शिडीची खरेदी सुमारे १० कोटींना झाली होती. मात्र, यावेळी फक्त ४ मीटर जास्त उंचीच्या (६८ मीटर) शिडीसाठी प्रति शिडीमागे १० कोटी अतिरिक्त खर्च केले गेले. याचाच अर्थ ४ शिड्यांसाठी सुमारे ४० कोटींची अतिरिक्त रक्कम देण्यात आली. एकाधिकारशाही निविदा काढून अन्य पात्र कंपन्यांना प्रक्रियेतून दूर ठेवले गेल्याचा हा परिणाम होता. निविदांच्या अटी व शर्तींमध्ये हेतुपुरस्सर बदल केल्यामुळे स्पर्धा नाहीशी होऊन पालिकेचे मोठे आर्थिक नुकसान झाले. अग्निशमन सेवा शुल्क घोटाळा: बीएमसीच्या अग्निशमन विभागात ५,००० कोटींचा घोटाळा झाल्याचा आरोप भाजपने २०२१ मध्ये केला. यामध्ये, बांधकाम परवानगी आणि भोगवटा प्रमाणपत्र देताना विकासकांकडून अग्निशमन सेवा शुल्क घेतले नव्हते. नियमानुसार सर्व थकबाकी भरल्याशिवाय आणि अग्निशमन दलाचे ना-देयता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र दिले जाऊ शकत नाही.

तरीही, हे शुल्क भरले नसतानाही ना-देयता प्रमाणपत्र आणि भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले. त्यानंतर हे शुल्क रहिवासी/सोसायट्यांकडून पूर्वलक्षी प्रभावाने वसूल करण्याचे परिपत्रक काढण्यात आले होते.विकासकांना सूट देण्यासाठी हा घोटाळा करण्यात आल्याचा आरोप होता. याशिवाय, अग्निशमन दलाच्या ना-हरकत प्रमाणपत्र वाटप प्रक्रियेच्या संदर्भात गंभीर अनियमितता आणि भ्रष्टाचाराचे आरोप अनेकदा झाले आहेत. या सर्व प्रकरणांमध्ये अग्निसुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष करून ना-हरकत प्रमाणपत्रे दिली गेली होती. हे सर्व घोटाळे नागरिकांच्या जीवित सुरक्षेशी थेट जोडलेले आहेत. त्यामुळे असे घोटाळे करून मुंबईकरांच्या जीविताशी खेळणाऱ्या लोकांना धडा शिकवण्याची संधी येऊ घातलेल्या महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने मुंबईकरांना उपलब्ध आहे. तातडीने कठोर कारवाई करून भ्रष्टाचाराची ही व्यवस्था सुधारण्यासाठी येऊ घातलेल्या निवडणुकांमध्ये जनहिताशी बांधील पक्षाला बहुमताने निवडून देणे अत्यावश्यक आहे.

**- प्रतिनिधी**

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# झगमगाटात हरविलेले लग्न

आज लग्न लावून घेताना कुणी विचारत नाही की मुलगा, माणूस म्हणून कसा आहे. तो संकटात उभा राहील का, जबाबदारी ओळखतो का, नात्यांना जपतो का- हे प्रश्न आता जुन्या वहीत बंद झाले आहेत. आजचा पहिला प्रश्न असतो, कुठली गाडी आहे? ब्रॅण्ड महत्त्वाचा असतो, माणूस नाही. चारचाकी जितकी मोठी, तितकी स्थळाची 'किंमत' जास्त! लग्न म्हणजे आयुष्यभराचा निर्णय राहिलेला नाही, तो केवळ एक व्यवहार झाला आहे. मुलीबाबतही परिस्थिती वेगळी नाही. तिचा स्वभाव, तिची सहनशीलता, समजूतदारपणा, आयुष्यातील चढ-उतार पेलण्याची क्षमता या गोष्टींची चौकशी फारशी कोणी करत नाही. उलट चर्चा होते ती लग्नात तिने कोणत्या डिझायनरचा ड्रेस घातला, रिसेप्शनसाठी बँक्वेट हॉल किती महाग होता, एन्ट्री किती 'ग्रॅण्ड' होती याची. मुलगी व्यक्ती म्हणून पाहिली जात नाही, ती पॅकेज म्हणून मांडली जाते. प्री-मॅरेज फोटोशूट हा तर विवाह व्यवस्थेचा आत्मा बनला आहे. दोन माणसं एकमेकांना खरंच ओळखण्याआधीच कॅमेऱ्यासमोर प्रेमाचा अभिनय करतात. डोंगर-दऱ्या, समुद्रकिनारे, किल्ले, रिसॉर्ट्स-पृष्ठभूमी भव्य असते, मात्र त्या फ्रेममध्ये भावनिक खोली मात्र नसते. फोटोमध्ये हास्य असतं, पण आयुष्यातील वास्तवाशी सामना करण्याची तयारी नसते. कॅमेऱ्यासाठी उभं राहणं सोपं असतं, संसारासाठी उभं राहणं कठीण असतं हे कुणी सांगत नाही. लग्न आता संस्कार राहिलेला नाही, तो एक इव्हेंट मॅनेजमेंट प्रोजेक्ट झाला आहे. किती पाहुणे, किती प्लेट्स, किती लाईट्स, किती ड्रोन शॉट्स-यावर लक्ष असतं. पण दोन कुटुंबे मानसिकदृष्ट्या जोडली जात आहेत का, दोन माणसं एकमेकांच्या त्रुटी स्वीकारायला तयार आहेत का, याचा विचारच होत नाही.



लग्नानंतर टिकणारा संसार महत्त्वाचा नसून, लग्नाच्या दिवशी सोशल मीडियावर किती लाईक मिळाले याला जास्त किंमत आहे. या सगळ्याची किंमत कोण चुकवतं? मध्यमवर्गीय आई-वडील. लोक काय म्हणतील या भीतिपोटी कर्ज काढलं जातं, बचत संपवली जाते. आयुष्यभर साठवलेली पुंजी दोन दिवसांच्या दिखाव्यासाठी उधळली जाते. आणि लोक? लोक दोन दिवस पाहतात, फोटो बघतात, टीका-तुलना करतात आणि तिसऱ्या दिवशी विसरून जातात. उरते ती कर्जाची पावती, ताणलेले नातेसंबंध आणि मानसिक थकवा. आज लग्नात आवाज इतका मोठा असतो की संवाद ऐकू येत नाही. संगीत कर्कश आहे, पण समजूतदारपणाचा सूर हरवलेला आहे. आणि मग काही महिन्यांतच तीच जोडपी वाद, गैरसमज आणि अपेक्षांच्या ओझ्याखाली दबली जातात. घटस्फोटाचे आकडे वाढतात, नात्यांवरचा विश्वास ढासळतो. कारण लग्नाआधी भूमिका शिकवली गेली होती, जबाबदारी नाही. शहरी लग्नांत दिखाव्याची चढाओढ आहे, तर ग्रामीण भागात त्याची नक्कल सुरू झाली आहे. शहरातील झगमगाट गावात उतरतोय, पण शहरात असलेली आर्थिक क्षमता मात्र गावाकडे आलेली नाही. तरीही गावातील शेतकरी, मजूर, लहान व्यावसायिक आपल्या ऐपतीपलीकडे जाऊन लग्न करतात. कारण शहरातल्या नातलगांनी, सोशल मीडियाने आणि 'स्टेटस'च्या कल्पनेने गावालाही संक्रमित केलं आहे. पूर्वी गावात लग्न म्हणजे साधेपणा, आपुलकी आणि सामूहिक जबाबदारी होती. आज तिथेही डीजे, आतषबाजी, महागडे ड्रेस आले आहेत. पण त्याबरोबर कर्ज, ताण आणि मतभेदही आले आहेत. ग्रामीण भागात एकेकाळी मुलगा शेतात कसा राबतो, समाजात कसा वागतो, व्यसनमुक्त आहे का, यावर लग्न ठरत असे. मुलगी घर सांभाळेल का, संकटात कुटुंब सोडणार नाही ना, याकडे पाहिलं जात असे. आज ते निकषही बदललेत. मुलगा बाहेरगावी नोकरीला आहे का?, लग्नात किती लोक येणार?, व्हिडीओ शूटिंग कोण करतो? हे प्रश्न पुढे आलेत. परिणामी शहरासारखेच ताण ग्रामीण संसारातही शिरले आहेत. विवाह व्यवस्था समाजाची कणा असते. तीच जर दिखाव्याच्या ओझ्याखाली मोडत असेल, तर परिणाम फक्त दोन व्यक्तींवर नाही, तर संपूर्ण समाजावर होतात. नाती तुटतात, कुटुंबव्यवस्था कमकुवत होते आणि माणूस एकटा पडतो-फोटो, अल्बममध्ये हसत असला तरी प्रत्यक्ष आयुष्यात तो आतून रिकामा असतो. आता तरी हे थांबायला हवं. लग्न पुन्हा माणसांसाठी व्हायला हवं, कॅमेऱ्यासाठी नाही. ड्रेस, हॉल, गाडीपेक्षा स्वभाव, संस्कार आणि समजूतदारपणाला महत्त्व मिळायला हवं. नाहीतर आपल्याकडे सुंदर फोटो असतील, भव्य व्हिडीओ असतील पण टिकणारा संसार मात्र नसेल. आणि तेच या काळाचं सर्वात मोठं अपयश असेल.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# ममता राजकीय हुतात्मा ठरणार का?

कोलकाता येथे आयपॅक कंपनीचे प्रतीक जैन यांचे कार्यालय आणि निवासस्थानी अंमलबजावणी संचालनालयाने घातलेल्या छाप्याचे आणि त्यानंतर त्याठिकाणी धाव घेत पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी कारवाईत आणलेल्या अडथळ्याचे येत्या काळात पश्चिम बंगालच्याच नाही तर देशाच्या राजकारणावर दूरगामी परिणाम होणार आहेत. याठिकाणी ईडी आणि पश्चिम बंगाल पोलिस एकमेकांसमोर दंड थोपटून उभे झाले होते, त्यामुळे अनुचित संघर्षाची स्थिती उद्भवण्याची शक्यता निर्माण झाली होती. सुदैवाने परिस्थितीने गंभीर वळण घेण्याआधीच तणावपूर्ण परिस्थिती तात्पुरत्या स्वरूपात का होईना नियंत्रणात आली, असे म्हणायला हरकत नाही.

या प्रकरणी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, राज्याचे पोलिस महासंचालक, पोलिस आयुक्त आणि अन्य वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांविरुद्ध एफआयआर दाखल करण्याची मागणी ईडीने सर्वोच्च न्यायालयात केली आहे. या प्रकरणात तृणमूल काँग्रेसनेही न्यायालयात कॅव्हेट दाखल केला आहे. त्यामुळे या प्रकरणात पुढील आदेश देण्याआधी न्यायालयाला मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची बाजू ऐकून घ्यावी लागणार आहे. त्यामुळे आता या प्रकरणी सर्वोच्च न्यायालय कोणता निर्णय देणार याकडे सगळ्यांचे लक्ष राहणार आहे. ममता बॅनर्जी या राजकारणी असल्या तरी त्याच्या आधी एक वकीलही आहेत. त्यामुळे आपल्या राजकीय आक्रमकतेचा परिणाम काय होणार, याचा अंदाज त्यांना नव्हता, असे म्हणता येणार नाही. काही ठोकताळे आपल्या मनाशी बांधूनच त्यांनी ईडीच्या पथकासमोर राजकीय तमाशा केला, असे दिसते. पश्चिम बंगालमध्ये येत्या काही महिन्यांत विधानसभा निवडणूक होणार आहे. ईडीच्या छाप्याचा पुरेपूर राजकीय फायदा उचलण्यासाठी ममता बॅनर्जी यांनी हा सगळा प्रकार केला, असा संशय घ्यायला जागा नाही. त्यांच्यासारखी कुशल राजकारणी अनवधानाने कोणतीही कृती करणार नाही, हे नक्की. ईडीच्या छाप्याचे निमित्त करत ममता बॅनर्जी यांनी केंद्र सरकारला जाणीवपूर्वक आपल्या शिंगावर घेतले आहे. यात त्यांचा 'चीत भी मेरी और पट भी मेरी' असा खेळ करण्याचा प्रयत्न आहे.

छाप्याची आमची कारवाई एका गुन्हेगारी घटनेसंदर्भात होती, ती कोणत्याही राजकीय नेत्याविरुद्ध आणि पक्षाविरुद्ध नव्हती, असा खुलासा ईडीने न्यायालयात केला. कारण नसताना ममता बॅनर्जी आणि तृणमूल काँग्रेस या प्रकरणात कुदली, असे दाखवण्याचा ईडीचा प्रयत्न आहे. ममता बॅनर्जी या अतिशय लढाऊ आणि आक्रमक नेत्या आहे. 'आली अंगावर तर घेतली शिंगावर' असा त्यांचा नेहमीच प्रयत्न असतो. या आक्रमकतेचा पश्चिम बंगालमधील सलग तीन विधानसभा



निवडणुकीत त्यांना राजकीय फायदा मिळाला, हे नाकारता येणार नाही. पण यावेळच्या अस्थानी आक्रमकतेचा ममता बॅनर्जी यांना फायदा मिळण्याची शक्यता कमी आणि त्यांचे राजकीय नुकसान होण्याची शक्यता जास्त दिसते. पाणी नसलेल्या अंधाऱ्या विहिरीत उडी मारल्यावर डोके फुटण्याशिवाय हाती काही लागत नाही, वेळप्रसंगी प्राणही गमवावे लागतात, तशी ममता बॅनर्जी यांची यावेळी स्थिती झाली आहे. ईडीचा छापा हा तृणमूल काँग्रेसच्या नेत्याच्या निवसस्थानी नव्हता, तर आयपॅक कंपनीच्या सहसंस्थापकाच्या निवासस्थानवर होता. प्रतीक जैन हे तृणमूल काँग्रेसच्या आयटी विभागाचे प्रमुख असले तरी राजकीय नेता म्हणून त्यांची प्रतिमा नाही. आयपॅक कंपनीचे म्हणूनच ते ओळखले जातात. त्यामुळे या प्रकरणात अनावश्यक हस्तक्षेप करत ममता बॅनर्जी यांनी 'आ बैल मुझे मार' करून घेतले आहे. ईडीच्या छाप्याच्या ठिकाणी आपण पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री म्हणून नाही, तर तृणमूल काँग्रेसच्या नेत्या म्हणून गेलो होतो, असा दावा ममता बॅनर्जी करत असल्या तरी तो पटण्यासारखा नाही. कारण त्या जर तृणमूल काँग्रेसच्या नेत्या म्हणून छाप्याच्या ठिकाणी गेल्या होत्या, तर त्याच्यासोबत राज्याचे पोलिस महासंचालक आणि कोलकाताचे पोलिस आयुक्त कसे होते, याचे उत्तर त्यांनी दिले पाहिजे. पोलिस महासंचालक आणि पोलिस आयुक्त असा फौजफाटा ममता बॅनर्जी यांच्यासोबत असल्यामुळे त्या छाप्याच्या ठिकाणी मुख्यमंत्री म्हणूनच गेल्या होत्या, असे स्पष्ट होते. मुख्यमंत्रिपद हा काही अंगरखा नाही, जो मनात आला तेव्हा घातला आणि मनात आला तेव्हा काढला, तो २४ तासही अंगावर ठेवावाच लागतो. त्यामुळे मी या क्षणी मुख्यमंत्री आहे आणि याक्षणी नाही असे म्हणता येत नाही. आपला भाचा अभिषेक बॅनर्जीच्या लग्नात जाताना मी मुख्यमंत्री म्हणून नाही तर त्याची आत्या म्हणून गेले होते, असे एकवेळ त्या म्हणू शकतात, पण याठिकाणी त्या तसे म्हणू शकत नाही. त्यामुळे मुख्यमंत्री म्हणून छाप्याच्या ठिकाणी जात ममता बॅनर्जी यांनी ईडीच्या पथकावर दबाव आणला, असा संशय घ्यायला पूर्ण जागा आहे. आणखी एक मुद्दा म्हणजे मुख्यमंत्री असल्या तरी ममता बॅनर्जी यांच्याजवळ गृहखातेही आहे, हे आपल्याला विसरता येणार नाही. तृणमूल काँग्रेसच्या नेत्या म्हणून त्या तेथे गेल्या असतील तर त्यांच्यासोबत पोलिसांचा फौजफाटा नाही तर तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्ते असायला हवे होते. महत्त्वाचे म्हणजे त्यांनी सरकारी गाडीने नाही तर खाजगी गाडीने त्याठिकाणी जायला हवे होते? आपण मुख्यमंत्री नाही तर तृणमूल काँग्रेसच्या नेत्या म्हणून छाप्याच्या ठिकाणी गेलो होतो, हे ममता बॅनर्जी यांना सर्वोच्च न्यायालयात सिद्ध करावे लागेल. तसे सिद्ध करण्यात कमी पडल्या तर त्या अडचणीत येऊ शकतात. मुख्यमंत्री म्हणून त्या छाप्याच्या ठिकाणी आल्या होत्या, हे सिद्ध झाले तर न्यायालय त्यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्याचा आदेश देऊ शकते. न्यायालयाच्या आदेशाने एफआयआर दाखल झाला तर ममता बॅनर्जी यांना अटकही होऊ शकते. आणि अटक झाली तर त्यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागू शकतो. अशा परिस्थितीत स्वतःला राजकीय हुतात्मा ठरवत या घटनेचा राजकीय फायदा उचलण्याचा प्रयत्न ममता बॅनर्जी करू शकतात.

या परिस्थितीत ममता बॅनर्जी यांच्यासमोर दिल्लीचे तत्कालीन मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि झारखंडचे तत्कालीन आणि विद्यमान मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचे उदाहरण असू शकते. अटक होण्याच्या आधी हेमंत सोरेन यांनी राजभवनात जाऊन मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. केजरीवाल यांनी मात्र अटक केल्यानंतरही राजीनामा देण्याचे टाळले होते. दिल्लीचे मुख्यमंत्री म्हणून ते सहा महिने तुरुंगात होते. तुरुंगातून त्यांना मुख्यमंत्री म्हणून कारभार करता आला नसला, तरी मुख्यमंत्री म्हणूनचे ते तुरुंगात होते. अटकेचा ममता बॅनर्जी यांना राजकीय फायदा आणि सहानुभूती मिळण्याची शक्यता असेल तर त्यांना अटक न करण्याचा राजकीय शहाणपणा मोदी सरकारला दाखवावा लागेल. मात्र या घटनाक्रमुळे त्यांची राजकीय ताकद कमी होत असेल तर त्यांच्या अटकेची शक्यता बळावू शकते. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने एफआयआर दाखल होऊन अटक झाली तर ममता बॅनर्जी यांची पुढील राजकीय भूमिका काय राहणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

९८८१७१७८१७

### मतदानासाठी हे लक्षात ठेवा

आज महाराष्ट्रात अनेक महानगर पालिकांसाठी निवडणूक होत आहे. प्रत्येक प्रभागामधून राखीव व अराखीव अशा तीन किंवा चार उमेदवारांना निवडून द्यायचे आहे. या पृष्ठभूमीवर माध्यमाद्वारे आणि अनेक वर्तमानपत्रांतून मतदानाविषयी जनजागृती करण्यात येत आहे आणि हे अत्यावश्यक आहे. अनेकांना विशेषकरून नवमतदारांना या प्रक्रियेची माहिती नसते. ''शेवटच्या उमेदवाराला मतदानानंतरच वाजेल बिप'' या मथळ्याच्या बातम्या प्रसिद्ध होत आहे. परंतु यातून योग्य अर्थ प्रेषित होत नाही, चुकीचा संदेश जाण्याची शक्यता जास्त आहे. मतदान कक्षात दोन ते चार बॅलेट युनिट असणार आहे आणि मतदान पूर्ण होण्यासाठी ''शेवटच्या'' उमेदवाराचे बटण दाबायला सांगणे सयुक्तिक नाही. याचा अर्थ बॅलेट युनिटवरील शेवटच्या उमेदवाराला किंवा नोटाला मतदान करा असा अनर्थ होतो. यात आक्षेपाची, भांडणाची परिस्थिती निर्माण होईल. यापेक्षा निष्पक्ष मतदानासाठी पांढरा, गुलाबी, निळा, पिवळा वगैरे रंगाच्या मतपत्रिकांवरील उमेदवाराचे नाव व चिन्ह बघून प्रत्येकी एक मत देण्याचे आवाहन केले पाहिजे. प्रत्येक रंगाच्या मतपत्रिकेवर आवडीनुसार किमान एक मत किंवा नोटाचे निळे बटण दाबण्याचे प्रशिक्षण अत्यंत गरजेचे आहे तेव्हाच मतदान प्रक्रिया वेळेत होईल आणि गोंधळाची परिस्थिती निर्माण होणार नाही. मतदाराद्वारे आवश्यक तेवढ्या उमेदवारांना मतदान न केल्याने बिप वाजत नाही त्यामुळे केंद्राध्यक्षाला अनेकदा मतदान कक्षात डोकावून पाहावे लागते ही बाब आक्षेपार्ह ठरते. यासाठी मतदान प्रक्रियेचे प्रशिक्षण अत्यावश्यक आहे. बहुतेक मतदान केंद्रे शासकीय इमारतीमध्ये असते. तिथे आवश्यक त्या सोयी सुविधा असल्याची खात्री प्रशासनाने केली पाहिजे.

**प्रा. विलास डोईफोडे**/सावनेर

## वाचक पत्रे

### अत्याधुनिक सुविधा आणि रोजगार यातील अदृश्य युद्ध

आजचा भारत वेगाने डिजिटल होत आहे. स्मार्ट सिटी, मेट्रो रेल्वे, ५ नेटवर्क, ऑनलाईन सेवा, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, स्वयंचलित यंत्रणा या सगळ्या अत्याधुनिक सुविधांनी देशाचा चेहरामोहरा बदलून टाकला आहे. मात्र या झगमगाटामागे एक गंभीर वास्तव दडलेले आहे रोजगाराच्या संधी मात्र त्या वेगाने वाढताना दिसत नाहीत. याच विसंगतीतून सुविधा विरुद्ध रोजगार असे एक अदृश्य युद्ध सुरू झाले आहे.

शहरांमध्ये मोठ्या इमारती, आयटी पार्क, मॉल्स, मेट्रो, फ्लायओव्हर उभे राहत आहेत. सरकार आणि खाजगी क्षेत्र कोट्यवधींची गुंतवणूक करत आहेत. पण या प्रकल्पांमुळे निर्माण होणारा रोजगार बहुतेक वेळा तात्पुरता, ठेकेदारीचा किंवा कौशल्याधारित मर्यादित स्वरूपाचा असतो. दुसरीकडे लाखो युवक शिक्षण पूर्ण करून स्थिर नोकरीच्या शोधात भटकत आहेत. आज यंत्र माणसाची जागा घेत आहेत. बँकेत कॅशियरऐवजी, कार्यालयात लिपिकाऐवजी सॉफ्टवेअर, कारखान्यात कामगाराऐवजी मशीन रोबोट ही प्रगती आहे, पण याच प्रगतीमुळे मानवी रोजगाराची दारे हळूहळू बंद होत आहेत. त्यामुळे सुविधा वाढतात, पण रोजगार कमी होतो हा विरोधाभास दिवसेंदिवस तीव्र होत आहे. ग्रामीण भागातील युवक शहरांकडे धाव घेत आहेत, कारण तिथे सुविधा आहेत. पण शहरांमध्ये स्पर्धा इतकी वाढली आहे की पदवीधर तरुणही डिलिव्हरी बॉय, कॅब ड्रायव्हर किंवा मजुरी अस्थायी कामांवर समाधान मानायला लागला आहे. यामुळे समाजात असंतोष, निराशा आणि असुरक्षिततेची भावना वाढते आहे. सरकार डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया, स्टार्टअप इंडिया अशा योजना आणत आहे. मात्र त्या योजनांचा प्रत्यक्ष फायदा सर्वसामान्य युवकांपर्यंत पोहोचतो का? हा खरा प्रश्न आहे. अत्याधुनिक सुविधा या जीवन सुलभ करतात, पण रोजगार नसेल तर त्या सुविधांचा उपभोग घेण्याची क्षमता लोकांकडे राहत नाही.

आज गरज आहे ती सुविधा आणि रोजगार यांचा समतोल साधण्याची. केवळ मोठे प्रकल्प नव्हे तर स्थानिक उद्योग, लघुउद्योग, शेतीपूरक व्यवसाय, कौशल्य विकास केंद्रे यावर भर दिला पाहिजे. यंत्रासोबत माणूसही आवश्यक आहे, हे धोरणकर्त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. जर सुविधा वाढल्या आणि रोजगार नाही, तर प्रगती केवळ आकड्यांपुरती राहील. पण जर रोजगार निर्माण झाले, तर सामान्य माणूसही त्या सुविधांचा खरा लाभ घेऊ शकेल. याच समतोलातच खऱ्या अर्थाने विकसित भारताचे स्वप्न साकार होऊ शकते.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

### हुडकेश्वरमधील भटक्या श्वानांचा बंदोबस्त करा

हुडकेश्वर (बु) येथे भटक्या श्वानांचा प्रचंड हैदोस सुरू असून त्यांच्यामुळे स्थानिक नागरिकांच्या जीविताला धोका उत्पन्न झाला आहे. परिसरातील गणेशधाम वसाहत, मेघदूत वसाहत, पिपळा फाटा आणि हुडकेश्वर गाव येथे किमान तीस ते चाळीस श्वानांची टोळी असून ते येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांवर भुंकत असतात. कधी कधी नागरिकांच्या मागे धाव घेऊन त्यांना सळो की पळो करून सोडतात. विशेषतः रात्री या श्वानांची फार मोठी भीती नागरिकांना असते. दिवसा शाळेत जाणाऱ्या मुलांवरही हे श्वान भुंकत असतात आणि त्यामुळे मुले घाबरतात. त्याचप्रमाणे हे श्वान रात्रभर भुंकत, रडत, ओरडत आणि किंचाळत असतात ज्यामुळे नागरिकांची झोपमोड होते. संध्याकाळी सहा-सात वाजतापासूनच या श्वानांचे भुंकणे सुरू होते ते रात्री बारा-एक वाजेपर्यंत सुरूच असते. भटक्या श्वानांचा ताबडतोब बंदोबस्त करून हुडकेश्वर परिसरातील नागरिकांना दिलासा द्यावा ही अपेक्षा.

**अतुल सोमेश्वर कावळे**/९७३०५३५१९६

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर
तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# काँग्रेसकडून जिल्हा परिषद पंचायत समितीसाठी इच्छुकांच्या मुलाखती सुरु

**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी काँग्रेसकडून खासदार प्रणितीताई शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

बुधवारी (दि. १४) अक्कलकोटला १२०, मंगळवेढा व पंढरपुरात १८०, मोहोळ तालुक्यात १३५ जाणांनी मुलाखती दिल्या. यावेळी



कागदपत्र व प्रमाणपत्राची तपासणी करीत सक्षम उमेदवाराला उम`दवारी देण्याचे निश्चित झाले. आगामी निवडणुकीत काँग्रेस पक्ष अक्कलकोट तालुक्यात संपूर्ण ताकदीने लढवणार असल्याचे संकेत खासदार शिंदे यांनी यावेळी दिले. यावेळी काँग्रेस कमिटी जिल्हा अध्यक्ष सातलिंग शटगार, महिला जिल्हा अध्यक्ष डॉ. सुवर्णा मलगोंडा, तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील हे उपस्थित होते. मंगळवेढा येथे तालुकाध्यक्ष प्रशांत साळे, वरिष्ठ उपाध्यक्ष ॲड. नंदकुमार पवार, प्रदेश सचिव सचिन कोळेकर, ॲड. अर्जुन पाटील, पंढरपुरचे तालुकाध्यक्ष संदीप पाटील, सुलमान तांबोळी, उपाध्यक्ष राजेश पवार, खजिनदार अप्पा शिवपुजे, संघटक सिताराम पवार, अल्पसंख्यांक उपाध्यक्ष जहांगीर शेख आदी उपस्थित होते. उमेदवार निवडीचे अधिकार माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे व खासदार प्रणिती शिंदे यांना असल्याचे जिल्हाध्यक्ष श्री. शटगार यांनी सांगितले.

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
बी.ए., एलएल.एम., ॲडव्होकेट,
कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर

**टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायलयात**

सुवर्णक्रांती मल्टिस्टेट अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी
लिमिटेड, पंढरपूर, जि. सोलापूर ... अर्जदार/वादी
विरुद्ध
भारत शंकर जाधव वगैरे ४ ... जाबदार/प्रतिवादी

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १४०/२०२५ | **१) भारत शंकर जाधव,** वय ५७, धंदा - बांगडी दुकान रा. वेणेगाव गावठाण, ता. माढा, जि. सोलापूर | १०,६८,६९९/- | २०/०२/२०२६ |
| २ | १४०/२०२५ | **२) रेखा भारत जाधव,** वय ४४, धंदा - बांगडी दुकान, रा. वेणेगाव गावठाण, ता. माढा, जि. सोलापूर | १०,६८,६९९/- | २०/०२/२०२६ |
| ३ | १४०/२०२५ | **४) विठ्ठल केरु काशिद,** वय ७३, धंदा - शेती, रा. परिते, ता. माढा, जि. सोलापूर | १०,६८,६९९/- | २०/०२/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १, २ व ४ यांना मे. कोर्टातून पाठवलेले नोटीस प्रवादी नं. १ व २ ची नोटीस बजावणीचा रिपोर्ट आला नाही व प्रवादी नं. ४ ची नोटीस नोटीस दिलेल्या पत्यावर राहत नाही या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दिष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वत: जातीने वर नमूद केलेल्या तारखेदिवशी वार - शुक्रवार, दिनांक २०/०२/२०२६ सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे. सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०४/११/२०२५ रोजीचे मा.लवाद अधिकारी साहेब यांच्या हूकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट को-ऑप**
**क्रेडिट सोसायटी लि., पंढरपूर**

शिक्का

ठिकाण : सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप. सोसायटी लि., पंढरपूर.
कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी, ता. माढा, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
बी.ए., एलएल.एम., ॲडव्होकेट,
कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर

**टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायलयात**

सुवर्णक्रांती मल्टिस्टेट अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी
लिमिटेड, पंढरपूर, जि. सोलापूर ... अर्जदार/वादी
विरुद्ध
अतुल पोपट चव्हाण वगैरे ३ ... जाबदार/प्रतिवादी

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १४२/२०२५ | **१) अतुल पोपट चव्हाण,** वय ४४, धंदा - इलेक्ट्रीक दुकान रा. चव्हाणवाडी (टें), ता. माढा, जि. सोलापूर | ५०,३७९/- | २०/०२/२०२६ |
| २ | १४२/२०२५ | **२) पोपट भानुदास चव्हाण,** वय ७०, धंदा - शेती व दुग्ध, रा. चव्हाणवाडी (टें) ता. माढा, जि. सोलापूर | ५०,३७९/- | २०/०२/२०२६ |
| ३ | १४२/२०२५ | **३) सोमनाथ केशव पवार,** वय ३४, धंदा - इलेक्ट्रीक दुकान, रा. चव्हाणवाडी (टें), ता. माढा, जि. सोलापूर | ५०,३७९/- | २०/०२/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १, ३ यांना मे. कोर्टातून पाठवलेले नोटीस प्रवादी नं. १ व २ ची नोटीस दिलेल्या पत्यावर नाहीत व प्रवादी नं. ३ ची नोटीस अपुर्ण पत्ता या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दिष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वत: जातीने वर नमूद केलेल्या तारखेदिवशी वार - शुक्रवार, दिनांक २०/०२/२०२६ सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे. सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०४/११/२०२५ रोजीचे मा.लवाद अधिकारी साहेब यांच्या हूकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट को-ऑप**
**क्रेडिट सोसायटी लि., पंढरपूर**

शिक्का

ठिकाण : सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप. सोसायटी लि., पंढरपूर.
कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी, ता. माढा, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
बी.ए., एलएल.एम., ॲडव्होकेट,
कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर

**टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायलयात**

सुवर्णक्रांती मल्टिस्टेट अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी
लिमिटेड, पंढरपूर, जि. सोलापूर ... अर्जदार/वादी
विरुद्ध
जयजयराम अर्जुन धांडे वगैरे ३ ... जाबदार/प्रतिवादी

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १५०/२०२५ | **१) जयजयराम अर्जुन धांडे,** वय ७०, धंदा - शेती, रा. निमगाव (माढा) ता. माढा, जि. सोलापूर | १,४६,८७५/- | २०/०२/२०२६ |
| २ | १५०/२०२५ | **२) सयाजी विठ्ठल लोखंडे,** वय ५६, धंदा - शेती, रा. गावठाण, भेंड ता. माढा, जि. सोलापूर | १,४६,८७५/- | २०/०२/२०२६ |
| ३ | १५०/२०२५ | **३) सचिन हनुमंत जगताप,** वय ३६, धंदा - शेती, रा. विठ्ठल बझार जवळ टेंभुर्णी ता. माढा, जि. सोलापूर | १,४६,८७५/- | २०/०२/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ ते ३ यांना मे. कोर्टातून पाठवलेले नोटीस प्रवादी नं. १ व २ ची नोटीस बजावणीचा रिपोर्ट आला नाही व ३ ची नोटीस अपूर्ण पत्ता या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दिष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वत: जातीने वर नमूद केलेल्या तारखेदिवशी वार - शुक्रवार, दिनांक २०/०२/२०२६ सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे. सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०४/११/२०२५ रोजीचे मा.लवाद अधिकारी साहेब यांच्या हूकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट को-ऑप**
**क्रेडिट सोसायटी लि., पंढरपूर**

शिक्का

ठिकाण : सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप. सोसायटी लि., पंढरपूर.
कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी, ता. माढा, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
बी.ए., एलएल.एम., ॲडव्होकेट,
कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर

**टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायलयात**

सुवर्णक्रांती मल्टिस्टेट अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी
लिमिटेड, पंढरपूर, जि. सोलापूर ... अर्जदार/वादी
विरुद्ध
सचिन धर्मराज सुरवसे वगैरे ३ ... जाबदार/प्रतिवादी

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १४९/२०२५ | **१) सचिन धर्मराज सुरवसे,** वय ४५, धंदा - शेती, रा. मोरया अपार्टमेंट शेजारी, बेंबळी रोड, टेंभुर्णी, ता. माढा जि. सोलापूर | १७,२४,६८९/- | २०/०२/२०२६ |
| २ | १४९/२०२५ | **२) महेंद्र अरुण माने,** वय ४२, धंदा - मंडप व केटरींग, रा. कन्हेरगाव, ता. माढा, जि. सोलापूर | १७,२४,६८९/- | २०/०२/२०२६ |
| ३ | १४९/२०२५ | **३) जमीर अहमद काजी,** वय ४०, धंदा - शेती, रा. जगदंबा नगर, टेंभुर्णी, ता. माढा, जि. सोलापूर | १७,२४,६८९/- | २०/०२/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १, ते ३ यांना मे. कोर्टातून पाठवलेले नोटीस प्रवादी नं. १ ची नोटीस पत्त्यावर नाही व ३ ची नोटीस अपूर्ण पत्ता व नं. २ चे नोटीस बजावणीचा रिपोर्ट आला नाही या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दिष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वत: जातीने वर नमूद केलेल्या तारखेदिवशी वार - शुक्रवार, दिनांक २०/०२/२०२६ सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे. सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०४/११/२०२५ रोजीचे मा.लवाद अधिकारी साहेब यांच्या हूकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट को-ऑप**
**क्रेडिट सोसायटी लि., पंढरपूर**

शिक्का

ठिकाण : सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप. सोसायटी लि., पंढरपूर.
कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी, ता. माढा, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
बी.ए., एलएल.एम., ॲडव्होकेट,
कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर

**टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायलयात**

सुवर्णक्रांती मल्टिस्टेट अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी
लिमिटेड, पंढरपूर, जि. सोलापूर ... अर्जदार/वादी
विरुद्ध
रविंद्र भैरु जाधव वगैरे ४ ... जाबदार/प्रतिवादी

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १३३/२०२५ | **१) रविंद्र भैरु जाधव,** वय ४०, धंदा - हॉटेल, रा. रांझणी (भीमानगर) ता, माढा, जि. सोलापूर | २,१३,४९७/- | २०/०२/२०२६ |
| २ | १३३/२०२५ | **१) भैरु राजू जाधव,** वय ६८, धंदा - शेती, रा. भवानी मंदिराजवळ, रांझणी (भीमानगर) ता, माढा, जि. सोलापूर | २,१३,४९७/- | २०/०२/२०२६ |
| ३ | १३३/२०२५ | **३) बाळासाहेब मच्छिंद्र उबाळे,** वय ४९, धंदा - बिअर शॉप, रा. उबाळे वस्ती, रांझणी (भीमानगर) ता. माढा, जि. सोलापूर | २,१३,४९७/- | २०/०२/२०२६ |
| ४ | १३३/२०२५ | **४) अतुल भिमराव वाघमारे,** वय ४३, धंदा - गॅरेज, रा. वाघमारे वस्ती, रुई, आढेगाव, ता. माढा, जि. सोलापूर | २,१३,४९७/- | २०/०२/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १, ते ४ यांना मे. कोर्टातून पाठवलेले नोटीस प्रवादी नं. १ व २ ची नोटीस बजावणीचा रिपोर्ट आला नाही व प्रवादी नं. ३ व ४ ची नोटीस घेण्यास नकार दिला या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दिष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वत: जातीने वर नमूद केलेल्या तारखेदिवशी वार - शुक्रवार, दिनांक २०/०२/२०२६ सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे. सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०४/११/२०२५ रोजीचे मा.लवाद अधिकारी साहेब यांच्या हूकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट को-ऑप**
**क्रेडिट सोसायटी लि., पंढरपूर**

शिक्का

ठिकाण : सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप. सोसायटी लि., पंढरपूर.
कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी, ता. माढा, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
बी.ए., एलएल.एम., ॲडव्होकेट,
कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर

**टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायलयात**

सुवर्णक्रांती मल्टिस्टेट अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी
लिमिटेड, पंढरपूर, जि. सोलापूर ... अर्जदार/वादी
विरुद्ध
सारिका गणेश कवटे वगैरे ... जाबदार/प्रतिवादी

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ५४/२०२५ | **१) सारिका गणेश कवटे,** वय - ३३, धंदा - ज्वेलर्स, रा. रुई ता. परांडा जि. धाराशिव (उस्मानाबाद) | ३,०३,६४२/- | २०/०२/२०२६ |
| २ | ५४/२०२५ | **२) सागर बाळू खोत,** वय -३१, धंदा - नोकरी, रा. बेंबळे गावठाण ता. माढा, जि. सोलापूर | ३,०३,६४२/- | २०/०२/२०२६ |
| ३ | ५४/२०२५ | **३) सोमनाथ भास्कर कवटे,** वय - २४, धंदा - ज्वेलर्स, रा. रुई ता. परांडा जि. धाराशिव (उस्मानाबाद) | ३,०३,६४२/- | २०/०२/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ ते ३ यांना मे. कोर्टातून पाठवलेले नोटीस प्रवादी नं. १ ची नोटीस पत्ता सोडून गेला, नं. २ ची नोटीस नोटीस सूचना देऊनही घेतली नाही व नं. ३ ची नोटीस घेण्यास नकार या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दिष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वत: जातीने वर नमूद केलेल्या तारखेदिवशी वार - शुक्रवार, दिनांक २०/०२/२०२६ सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे. सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०३/१०/२०२५ रोजीचे मा.लवाद अधिकारी साहेब यांच्या हूकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट को-ऑप**
**क्रेडिट सोसायटी लि., पंढरपूर**

शिक्का

ठिकाण : सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप. सोसायटी लि., पंढरपूर.
कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी, ता. माढा, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
बी.ए., एलएल.एम., ॲडव्होकेट,
कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर

**टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायलयात**

सुवर्णक्रांती मल्टिस्टेट अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी
लिमिटेड, पंढरपूर, जि. सोलापूर ... अर्जदार/वादी
विरुद्ध
सुरेश भिवा नाळे वगैरे ३ ... जाबदार/प्रतिवादी

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १३२/२०२५ | **१) सुरेश भिवा नाळे,** वय ७२, धंदा - शेती, रा. वेणेगाव, ता. माढा जि. सोलापूर | ५,७९,५२६/- | २०/०२/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. ४ यांना मे. कोर्टातून पाठवलेले नोटीस प्रवादी नं. १ ची नोटीस दिलेल्या पत्यावर राहत नाही या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दिष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वत: जातीने वर नमूद केलेल्या तारखेदिवशी वार - शुक्रवार, दिनांक २०/०२/२०२६ सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे. सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०४/११/२०२५ रोजीचे मा.लवाद अधिकारी साहेब यांच्या हूकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट को-ऑप**
**क्रेडिट सोसायटी लि., पंढरपूर**

शिक्का

ठिकाण : सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप. सोसायटी लि., पंढरपूर.
कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी, ता. माढा, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
बी.ए., एलएल.एम., ॲडव्होकेट,
कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर

**टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायलयात**

सुवर्णक्रांती मल्टिस्टेट अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी
लिमिटेड, पंढरपूर, जि. सोलापूर ... अर्जदार/वादी
विरुद्ध
जमीर पैगंबर मुलाणी वगैरे ४ ... जाबदार/प्रतिवादी

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १४५/२०२५ | **१) जमीर पैगंबर मुलाणी,** वय ४०, धंदा - किराणा दुकान, रा. बेंबळे रोड, टेंभुर्णी, ता. माढा जि. सोलापूर | २,०६,३७६/- | २०/०२/२०२६ |
| २ | १४५/२०२५ | **२) पैगंबर यासीन मुलाणी,** वय ७१, धंदा - पान शॉप, रा. बेंबळे रोड, टेंभुर्णी, ता. माढा, जि. सोलापूर | २,०६,३७६/- | २०/०२/२०२६ |
| ३ | १४५/२०२५ | **३) युसूफ मकबुल शेख,** वय ५०, धंदा - फुटवेअर शॉप, रा. कसबा पेठ, टेंभुर्णी, माढा, जि. सोलापूर | २,०६,३७६/- | २०/०२/२०२६ |
| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- उजनी कॉलनी**<br>**कर्जदार -**<br>**सौ.प्रियांका नितीन टिंगरे**<br>पत्ता : फ्लॅट नं. ३०३ राघवेंद्र रेसिडेन्सी तिसरा मजला, प्लॉट नं. १४ एसबी, प्लॉट नं. ४०, रविवर पेठ, गांधी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर- ४१३००६<br><br>**सह-कर्जदार:**<br>**श्री. नितीन सिद्धेश्वर टिंगरे**<br>पत्ता : फ्लॅट नं. ३०३, राघवेंद्र रेसिडेन्सी तिसरा मजला, प्लॉट नं. १४ एसबी, प्लॉट नं. ४०, रविवर पेठ, गांधी नगर, अक्कलकोट रोड सोलापूर- ४१३००६ | श्रीमती प्रियांका नितीन टिंगारे आणि श्री. नितीन सिध्देश्वर टिंगारे यांच्या नावावरील मालमत्तेचे गहाणखत.<br><br>सोलापूर जिल्ह्यातील रविवार पेठ येथे असलेल्या खालील सर्व जमिनीच्या तुकड्यांचे नोंदणीकृत गहाणखत:<br>**अ -** रविवार पेठ, सोलापूर महानगरपालिका हद्दीत, सोलापूर येथे स्थित, टी.पी. क्रमांक १, सीटीएस क्रमांक ९६९८, फायनल प्लॉट क्रमांक १४, सब-प्लॉट क्रमांक ४०, 'राघवेंद्र रीजन्सी अपार्टमेंट' मधील तिसऱ्या मजल्यावरील निवासी फ्लॅट क्रमांक ३०३, ज्याचे कार्पेट क्षेत्रफळ ४५.१३३ चौ.मी. आहे.<br>**चतु:सीमा खालीलप्रमाणे:**<br>पूर्वेस - मोकळी जागा, दक्षिणेस - फ्लॅट क्रमांक ३०४, पश्चिमेस - प्रवेशद्वार लॉबी, उत्तरेस - मोकळी जागा<br>**बी -** दुकान क्रमांक २, तळमजला, राघवेंद्र रीजन्सी अपार्टमेंट, टी. पी. क्रमांक १, सीटीएस क्रमांक ९६९८, अंतिम भूखंड क्रमांक १४, उप-भूखंड क्रमांक ४०, चटई क्षेत्र १७.०८७ चौरस मीटर, गांधी नगर, रविवार पेठ, सोलापूर महानगरपालिका हद्दीत, सोलापूर येथे स्थित, ज्याच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत:<br>**चतु:सीमा खालीलप्रमाणे: -**<br>पूर्व - प्रवेशद्वार, दक्षिण - दुकान क्रमांक ०३,<br>पश्चिम - जिना, उत्तर - दुकान क्रमांक ०२ ए<br>**सी -** दुकान क्रमांक ३, तळमजला, राघवेंद्र रीजन्सी अपार्टमेंट, टी. पी. क्रमांक १, सीटीएस क्रमांक ९६९८, अंतिम भूखंड क्रमांक १४, उप-भूखंड क्रमांक ४०, चटई क्षेत्र २४.०३८ चौ.मी., रविवार पेठ, सोलापूर महानगरपालिका हद्दीत, सोलापूर येथे स्थित, ज्याच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत:<br>**चतु:सीमा खालीलप्रमाणे: -**<br>पूर्व - प्रवेशद्वार, दक्षिण - मोकळी जागा,<br>पश्चिम: - पार्किंग, उत्तर: - दुकान क्रमांक ०२ बी<br>CERSI आयडी - मालमत्ता आयडी: २०००७८७०१९६२ | **मागणी सूचना:**<br>**दिनांक: ०३/११/२०२५.**<br><br>**खाते शिल्लक:** रु. २२,०५,९१४.०० + लागू न केलेले व्याज: रु. ९०२३९.००/- एकूण रु. २२,९६,१४३.००/-<br><br>**खाते शिल्लक:** रु. १९,३५,३२३.०० + लागू न केलेले व्याज: रु. १,१६,६५३.००/- एकूण रु. २०,५१,९७६.००/-<br><br>**एकूण:** रु. ४३,४८,११९.००/- (रुपये त्रेचाळीस लाख अठ्ठेचाळीस हजार एकशे एकोणीस फक्त)<br>**सांकेतिक ताबा दिनांक :** ०८/०१/२०२६ |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - 08/01/2026
सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.

**जाहिर प्रकटन**

**'क' प्रवर्गातील सहकारी संस्थांच्या संचालक मंडळ निवडणुकीचा कार्यक्रम**

क प्रवर्गातील खालील संस्थांचा सन २०२५ ते २०३०-२०३१ या कालावधीच्या संचालक मंडळ निवडणुकीसाठीचा निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

**संचालक मंडळ निवडणूक कार्यक्रमातील महत्त्वाचे टप्पे**

| अ. क्र. | संस्थेचे नाव | निवडणूक निर्णय अधिकारी | नामनिर्देशन पत्रांची विक्री व स्विकृती | नामनिर्देशन पत्राची छाननी | वैध नामनिर्देशन पत्राची प्रसिध्दीची तारीख | उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख | आवश्यक असल्यास मतदान |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या., सांगोला | ए.एस. पुजारी, सहकारी अधिकारी श्रेणी-२ | दि. १५/०१/२०२६ ते दि. २१/०१/२०२६ स. ११.०० ते दु. ३.०० वा. | दि. २२/०१/२०२६ सकाळी ११.०० ते दु. ३.०० वा. | दि. २३/०१/२०२६ सकाळी ११.०० | दि. २३/०१/२०२६ ते दि. ०६/०१/२०२६ स. ११.०० ते दु. ३.०० वा. | दि. १४/०२/२०२६ रोजी स.८.०० ते दु. ४.०० |
| २ | विजयालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सांगोला | ए.डी. गोसावी, सहाय्यक सहकारी अधिकारी | | | | | |
| ३ | श्री संत तुकाराम ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., हटकर मंगेवाडी | ए.एस. पुजारी, सहकारी अधिकारी श्रेणी-२ | | | | | |
| ४ | शिवबाराजे ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., वाटंबरे | ए.डी. गोसावी, सहाय्यक सहकारी अधिकारी | | | | | |
| ५ | रुद्रपशुपतीनाथ महिला सहकारी पतसंस्था मर्या., कोळा | ए.डी. गोसावी, सहाय्यक सहकारी अधिकारी | | | | | दि. १५/०२/२०२६ रोजी स.८.०० ते दु. ४.०० |
| ६ | जय महाराष्ट्र ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., कमलापूर | ए.एस. पुजारी, सहकारी अधिकारी श्रेणी-२ | | | | | |

**टिप :- सदर कार्यक्रम सुट्ट्यांचे दिवस वगळून आहे.**

संस्थांचा सविस्तर निवडणूक कार्यक्रम त्या संस्थेच्या नोटीस बोर्डावर, संबंधित संस्थेचे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयातील नोटीस बोर्डावर व तालुका सहकारी अधिकारी, तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सांगोला पत्ता :- क्षत्रिय माळी वि.का.से. इमारत १ ला मजला, कचेरी रोड, सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. तरी संबंधित संस्थांचे सभासदांनी सभासद यादी सविस्तर निवडणूक कार्यक्रम व अधिक माहितीसाठी या कार्यालयाशी संपर्क साधावा.

स्थळ - सांगोला
दिनांक - १५/०१/२०२६
शिक्का
सही/-
(डॉ. वैशाली साळवे)
तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका सांगोला, जिल्हा सोलापूर




सोलापूर : सालाबादप्रमाणे यंदाही श्री सिध्देश्वर यात्रेतील मानाच्या नागफणी सजावट नंदीध्वजाने भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.
छायाचित्र : केवल तिवारी







छायाचित्र : नागेश दंतकाळे

# करमुटगी धार्मिक विधीने उतरवली सिद्धरामेश्वरांची हळद

## ●अक्षता सोहळ्यानंतर योगदंडासह नंदीध्वजांना सिद्धेश्वर तलावातील पाण्यात घातले स्नान●

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी**

ग्रामदैवत श्रीसिद्धेश्वर यात्रेतील अक्षता सोहळ्यानंतर करमुटगी हा धार्मिक विधी पारंपारिक पद्धतीने श्रीसिध्देश्वर मंदिरात संपन्न झाला.

ग्रामदैवतशिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांच्या यात्रेच्या अक्षता सोहळ्याच्या नंतर हळद उतरविण्याचा धार्मिक विधी संपन्न करण्यात आला. विविध धार्मिक विधीपैकी एक असणारा करमुटगी हा धार्मिक विधी पारंपारिक पद्धतीने विधिवत पूजनेने बुधवारी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास संपन्न झाला. श्री सिध्देश्वर महाराजांच्या योगदंड आणि मानाच्या सात नंदीध्वजांना सिध्देश्वर तलावात स्नान घालून हळद उतरवली. त्यानंतर यात्रा प्रमुख हिरेहब्बू बंधूंनी मंदिरातील अमृत शिवलिंगाची मानकरी देशमुख परिवार यांच्या उपस्थितीत विधिवत पूजा करून मानाचे विडे दिले. तदनंतर आरती करण्यात आली.

दरम्यान याबाबत मानकरी सुदेश देशमुख यांनी या धार्मिक विधींचे महत्व विषद केले.यावेळी मानकरी देशमुख परिवारातील सर्व सदस्यांची उपस्थिती होती. दरम्यान, नववर्षातील पहिला सण असणाऱ्या मकर संक्रांतीनिमित्त ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर मंदिरात श्रींचे दर्शन घेण्यासाठी अबालवृद्ध भाविकांची पहाटेपासून मांदियाळी दिसून आली. संमती कट्ट्या जवळील शिवलिंगाचे दर्शन घेऊन भाविकांनी तिळगुळ अर्पण केले. यावेळी मंदिर परिसरात भाविकांची एकच गर्दी दिसून आली. त्याच पद्धतीने श्रींच्या शिवयोग समाधीस देखील विविध प्रकारचे धान्य बोर पेरू गाजर फळ गूळ बाजरी आणि ज्वारीचे कणीस अशा विविध खाद्यपदार्थांचा अन्नधान्यांचा भोग चढवण्यात आला होता. त्यामुळे सर्वत्र तेजोमय वातावरण पाहावयास मिळाले.

# सोन्या मारुती गणरायांना बाराबंदी फेटा; धोतर पोशाख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

सोलापूर शहरात ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांच्या यात्रेचा उत्सव सर्वत्र सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर शहरात आनंदाचे आणि भक्तीचे वातावरण आहे.



यात्रेच्या पार्श्वभूमीवर सोन्या मारुती चौकातील मानाचा सोन्या मारुती गणेशोत्सव मंडळांने सोन्या मारुती गणरायांना सिद्धरामेश्वर यात्रेत नंदीध्वजधारक परिधान करीत असलेले फेटा बाराबंदी धोतर मानाचा कागदी हार घालण्यात आल्याने सोन्या मारुती गणरायांचे रुप विलोभनीय दिसत आहे. दरम्यान, या मार्गावरून अक्षता सोहळा तसेच होम प्रदीपन आणि दारूकाम या धार्मिक विधीसाठी नंदीध्वजांची मिरवणूक मार्गस्थ होत असते. त्यामुळे भाविकांना सोन्या मारुतीचे आकर्षक विलोभनीय दर्शन पहावयास मिळाले आहे.

# सिध्दरामेश्वरांच्या जीवनावर आधारित 'ड्रोन शो' बाबत भक्तांची उत्सुकता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

ग्रामदैवत शिवयोगी श्री सिध्दरामेश्वर यांच्या यात्रेनिमित्त गुरूवार,१५ रोजी होम मैदानावर प्रथमच होत असलेला लेझर ड्रोन शो पाहण्यासाठी भक्तांची उत्सुकता वाढली आहे. गुरुवारी रात्री ८ ते १० या वेळेत होणाऱ्या या लेझर ड्रोन शोमध्ये, सुमारे ३०० ड्रोनच्या मदतीने शिवयोगी श्री सिध्दरामेश्वर यांच्या चरित्रावर आधारीत भव्य देखावे आकाशाच्या पडद्यावर सादर करण्यात येणार आहेत.

राजधानी दिल्लीजवळील गुरूग्राम येथील एअरबोटिक्स टेक्नॉलॉजी ही कंपनी ड्रोन लेझर शो सादर करणार आहे.गेल्या पाच वर्षापासून श्री



सिध्देश्वर देवस्थानच्यावतीने शोभेच्या दारूकामाच्या दिवशी लेझर शो, टुडी आणि थ्रीडी लेझर शो सारखे नव नवे उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमांना सिध्दरामेश्वर भक्तांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपल्या आराध्य दैवताचे चरित्र प्रत्यक्ष पाहणे हा अफलातून अनुभव असल्याची भक्तांची भावना आहे. यंदा होणाऱ्या ड्रोनशोमध्ये सिध्दरामेश्वरांचे चरित्र, त्यांनी केलेले लोककल्याणाचे कार्य, त्यांची वचने आणि सोन्नलगी-सोलापूरला भू कैलास बनवल्याची कथा सांगण्यात आली आहे. मल्लिकार्जुन आणि बालक सिध्दरामेश्वर यांच्या श्रीशैल पर्वतावरील भेटीचा 'कमरी कोळ्ळ' नावाने प्रसिध्द असलेल्या प्रसंगाच्या थ्रीडी शोला मागील वर्षी सिध्दरामेश्वर भक्तांचा मोठा प्रतिसाद लाभला होता.

या पार्श्वभूमिवर उद्या होणाऱ्या ड्रोन लेझर शोबद्दल भक्तांच्या मनातील उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.



# माजी जि.प. अध्यक्ष शिवानंद पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

**भाजपा सोडल्याने अक्कलकोटच्या राजकारणात खळबळ**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ जानेवारी-**

जिल्हा परिषद निवडणूक जाहीर होताच जिल्ह्यातील राजकारणाला वेग आला असून, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष शिवानंद पाटील यांनी भाजपला रामराम ठोकत राष्ट्रवादी अजित पवार गट मध्ये प्रवेश केल्याने अक्कलकोटच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.

मकर संक्रांतीच्या शुभमुहूर्तावर अक्कलकोटचे दिवंगत माजी आमदार कै. सिद्धारामप्पा पाटील यांचे चिरंजीव, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष व सहकार क्षेत्रातील प्रभावी नेतृत्व असलेले शिवानंद पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अधिकृत पक्षप्रवेश केला. त्यांच्या सोबत अक्कलकोट पंचायत समितीचे माजी सभापती संजय पाटील, तसेच दिलीप पाटील आणि इतर सहकाऱ्यांनीही राष्ट्रवादीत प्रवेश केला. शिवानंद पाटील हे जिल्हा परिषदेत प्रभावी नेतृत्व म्हणून ओळखले जातात. भाजप सोडण्यामागचे अधिकृत कारण जाहीर झाले नसले, तरी पक्षांतर्गत मतभेद आणि स्थानिक नेतृत्वाशी झालेल्या वैचारिक संघर्षामुळे त्यांनी हा निर्णय घेतल्याची चर्चा आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा सोलापूर दौरा आचार संहितेमुळे रद्द झाल्याने पक्षप्रवेशाचा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला होता पण आज जिल्हा अध्यक्ष उमेश पाटील, राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते बळीराम काका साठे यांच्या उपस्थितीत प्रवेश झाला.या पक्षप्रवेशामुळे सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या संघटनात्मक ताकदीत लक्षणीय वाढ झाल्याचे मानले जात असून, आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय समीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# निवडणूक कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना मतदानासाठी एक तासाची विशेष सवलत

**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अंतर्गत गुरुवारी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी महानगरपालिकेच्या विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवडणूक कामासाठी नियुक्ती करण्यात आली आहे.निवडणूक कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना मतदानासाठी एक तासाची विशेष सवलत

गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत शहरातील सर्व मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. निवडणूक कर्तव्य बजावत असताना कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याचा मतदानाचा हक्क वंचित राहू नये, तसेच लोकशाही प्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित व्हावा, या उद्देशाने आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

या निर्णयानुसार, निवडणूक कामासाठी नियुक्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान करण्यासाठी कर्तव्य कालावधीत एक तासाची विशेष सवलत देण्यात येणार आहे.

# समाज माध्यमावर पोलिसांची बदनामी करणारा व्हिडिओ पोस्ट केल्यामुळे दोघांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १४ जानेवारी-**

मिळालेली माहिती खरी असल्याची खातरजमा न करता दिशाभूल करणारी चुकीची माहिती सांगून, समाज माध्यमावर बनावटीकरण केलेला ऑडिओ, व्हिडीओ व्हायरल करून मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे व मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी यांच्या विरुद्ध असभ्य, अश्लील, अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून जाणीवपूर्वक प्रसारमाध्यमावर पोलिसांची बदनामी केल्याप्रकरणी संग्राम फाटे व हर्षु ठाकूर यांच्यावर दि. १३ रोजी रात्री उशीरा गुन्हा दाखल करण्यात आला.

दि. १० जानेवारी रोजी संग्राम फाटे रा. शेटफळ ता. मोहोळ, व हर्षु ठाकूर यांनी त्यांना मिळालेली माहिती खरी असल्याची खातरजमा न करता दुरुपयोग होऊन पो.नि. शेडगे यांच्याकडून कारवाई करण्यात यावी अशी दिशाभूल करणारी चुकीची माहिती सांगून, समाज माध्यमावर बनावटीकरण केलेला ऑडिओ, व्हिडीओ व्हायरल करून पो.नि शेडगे व मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी यांच्या विरुद्ध असभ्य,अश्लील, अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून जाणीवपूर्वक प्रसार माध्यमावर पोलिसांची बदनामी करण्याच्या उद्देशाने, तसेच पोलिसांना त्यांचे नियमित कर्तव्य बजावणी पासून परावृत्त करण्यासाठी धमकावून पोलीस दलाच्या लौकिकास बाधा आणून अप्रतिची भावना निर्माण केली आहे. तसेच जनमानसात पोलिसांची प्रतिमा मलीन करण्याचे उद्देशाने सदरचा बनावटीकरण केलेला ऑडिओ व व्हिडिओ दि. १० जानेवारी ते फिर्याद दाखल होईपर्यंतच्या वेळेत प्रसारमाध्यमावर जाणीवपूर्वक व्हायरल केला आहे म्हणून संग्राम फाटे व हर्षु ठाकूर यांच्या विरुद्ध पो. नि. हेमंत शेडगे यांनी मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सहा. पो. निरीक्षक अंजना फाळके करित आहेत.



# सत्ता कोणाची, महापौर कोण? आज मतदार ठरवणार!

## १०२ जागांसाठी ५६४ उमेदवार निवडणूक रिंगणात

## ९ लाख २४ हजार ७०६ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

## ३४९४ बॅलेट युनिट्स, १३६५ कंट्रोल युनिट्स उपलब्ध

## प्रभागानुसार तीन व चार मते; मतपत्रिकांचे रंग वेगवेगळे



**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

सोलापूर शहराच्या भवितव्याचा निर्णय घेणाऱ्या महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत १०२ जागांसाठी गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होणार आहे.

एकूण ५६४ उमेदवार निवडणूक मैदानात आहेत. शहरातील ९ लाख २४ हजार ७०६ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. प्रभागानुसार तीन व चार मते राहणार असून मतदान यंत्रावरील मतपत्रिकांचे रंग वेगवेगळे राहणार आहेत. शुक्रवारी दि. १६ जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे.

सोलापूर महापालिका आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, निवडणूक विभागाचे सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित यांच्या माध्यमातून या निवडणुकीची जय्यत तयारी करण्यात आली आहे. सोलापूर शहरातील २६ प्रभागांमध्ये १०२ जागांसाठी होणाऱ्या महापालिका निवडणुकीसाठी ३५३ इमारतींमध्ये एकूण १,०९१ मतदान केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे. या निवडणुकीत शहरातील ९ लाख २४ हजार ७०६ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

**मतदार यादीतील नाव व मतदान केंद्राचे नाव शोधण्यासाठी खालील क्युआर कोड स्कॅन करा!**

यंदा प्रत्येक जागेसाठी मतपत्रिकांचे रंग वेगवेगळे ठेवण्यात आले आहेत. 'अ' जागेसाठी पांढरा, 'ब' जागेसाठी फिका गुलाबी, 'क' जागेसाठी फिका पिवळा तर 'ड' जागेसाठी फिका निळा रंग असणार आहे. त्यामुळे मतदारांनी मतदान करताना रंगांकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. प्रभाग क्रमांक १ ते २४ मधील मतदारांना चार मते द्यावी लागणार आहेत. पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या जागेसाठी बटन दाबल्यानंतर उमेदवाराच्या नावासमोरील लाल दिवा लागेल, मात्र बीप आवाज येणार नाही. चौथ्या व शेवटच्या जागेसाठी मतदान केल्यानंतर दीर्घ बीप आवाज येईल. याच बीप आवाजानंतर मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्याचे समजावे.

प्रभाग क्रमांक २५ व २६ साठी तीन मते द्यायची असून पहिल्या दोन जागांसाठी बीप आवाज येणार नाही, तर तिसऱ्या व अंतिम मतानंतर दीर्घ बीप ऐकू येईल. तसेच कोणताही उमेदवार पसंत नसल्यास प्रत्येक जागेसाठी 'नोटा' पर्याय उपलब्ध आहे.

मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत राहणार आहे. यंदा 'एक मत' नव्हे तर प्रभागानुसार तीन किंवा चार मते द्यायची आहेत.

मतदान केंद्रांच्या संख्येच्या दृष्टीने प्रभाग क्रमांक १७ मध्ये सर्वाधिक २१ मतदान केंद्रे असून, त्याखालोखाल प्रभाग क्रमांक ९ मध्ये १८ मतदान केंद्रे आहेत. तसेच प्रभाग क्रमांक ८, १३, २२ आणि २४ या प्रभागांमध्येही तुलनेने अधिक मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. याउलट प्रभाग क्रमांक १ आणि २५ मध्ये सर्वात कमी, प्रत्येकी ९ मतदान केंद्रे ठेवण्यात आली असून, प्रभाग क्रमांक २, ११ आणि २६ मध्येही मतदान केंद्रांची संख्या मर्यादित आहे.

| मतपत्रिकांचे रंग असे | |
|---|---|
| अ जागा | पांढरा |
| ब जागा | फिका गुलाबी |
| क जागा | फिका पिवळा |
| ड जागा | फिका निळा |
| **प्रभाग क्रमांक १ ते २४** | |
| **एकूण ४ मते द्यायची** | |
| पहिली, दुसरी, तिसरी जागा | लाल लाईट, बीप नाही |
| चौथी (शेवटची) जागा | दीर्घ बीप आवाज |
| **प्रभाग क्रमांक २५ व २६** | |
| **एकूण ३ मते द्यायची** | |
| पहिली व दुसरी जागा | लाल लाईट, बीप नाही |
| तिसरी (शेवटची) जागा | दीर्घ बीप आवाज |
| **दीर्घ बीप आवाज म्हणजे मतदान प्रक्रिया पूर्ण** | |

### मतदानात सोलापूरकरांनी १०० टक्के सहभाग नोंदवावा : डॉ. ओम्बासे

सोलापूर महा निवडणुक मतदानासाठी महापालिकेने सर्व यंत्रणा सज्ज ठेवली आहे. नेटके नियोजन करण्यात आले आहे.मतदानाच्या दिवशी कोणतीही अडचण येऊ नये यासाठी प्रशासन सज्ज आहे. या सर्व नियोजनामुळे सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक शांततापूर्ण, निर्भय व यशस्वीरीत्या पार पडेल. गुरुवारी दि. १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होणाऱ्या मतदानात सोलापूरकरांनी शंभर टक्के सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयुक्त तथा मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

### ४६ मतदान केंद्रे संवेदनशील म्हणून घोषित

सोलापूर महा निवडणुक मतदानासाठी महापालिकेने सर्व यंत्रणा सज्ज ठेवली आहे. नेटके नियोजन करण्यात आले आहे.मतदानाच्या दिवशी कोणतीही अडचण येऊ नये यासाठी प्रशासन सज्ज आहे. या सर्व नियोजनामुळे सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक शांततापूर्ण, निर्भय व यशस्वीरीत्या पार पडेल. गुरुवारी दि. १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होणाऱ्या मतदानात सोलापूरकरांनी शंभर टक्के सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयुक्त तथा मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

### ३४९४ बॅलेट युनिट्स, १३६५ कंट्रोल युनिट्स

मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी निवडणूक प्रशासनाने ईव्हीएम व साहित्याची व्यापक तयारी केली आहे. यामध्ये ३ हजार ४९४ बॅलेट युनिट्स आणि १ हजार ३६५ कंट्रोल युनिट्स उपलब्ध करून देण्यात आले असून, मतदान केंद्रांच्या गरजेनुसार १ हजार २५० स्टेशनरी किट्स तसेच २ हजार ५०० बॅलेट युनिट कव्हर कंपार्टमेंट्सचा वापर करण्यात येत आहेत.

### किमान २ ते ४ बॅलेट युनिटचा उपयोग

प्रत्येक मतदान यंत्रास एक कंट्रोल युनिट व बॅलेट युनिट असे दोन भाग असतील. हे दोन भाग एकमेकांस जोडल्यानंतर हे मतदान यंत्र कार्यरत होते. एका बॅलेट युनिटवर १५ उमेदवारांसाठी मतदान करण्याची तरतूद आहे. एकास एक असे ४ बॅलेट युनिट जोडून ६० उमेदवारांच्या निवडणुकीचे मतदान घेता येते. दरम्यान, सोलापूर महापालिकेसाठी उमेदवारांच्या आवश्यक संख्येनुसार बॅलेट युनिट वापरण्यात येणार आहेत. विविध प्रभागात किमान २ ते ४ बॅलेट युनिटचा उपयोग करण्यात येणार आहे.

### प्रत्येक मतदान केंद्रावर इतके राहणार कर्मचारी

प्रत्येक मतदान केंद्रावर एक केंद्राध्यक्ष, तीन पोलिंग ऑफिसर, एक शिपाई व एक पोलीस कर्मचारी असा कर्मचारी वर्ग राहणार आहे. प्रत्येक कर्मचारी आपापली जबाबदारी आयोगाच्या निर्देशानुसार पार पाडणार आहे.

### प्रत्येक प्रभागात एक याप्रमाणे २६ 'आदर्श मतदान केंद्रे' सज्ज

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या वतीने मतदारांमध्ये मतदानाविषयी जनजागृती मोहीम राबविण्यात आली आहे. २६ 'आदर्श मतदान केंद्रे' सज्ज राहणार आहेत. महापालिका हद्दीतील प्रत्येक प्रभागात एक याप्रमाणे एकूण २६ मतदान केंद्रे 'आदर्श मतदान केंद्र' म्हणून विकसित केली जाणार असून यामध्ये पर्यावरणपूरक हरित मतदान केंद्रे व महिला मतदान केंद्रांचा समावेश आहे. ऑरनेट या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून ''मतदारांची शपथ'' हा उपक्रम शहरातील विविध भागांत राबविण्यात आला.

### एकूण २,७४१ पोलीस राहणार तैनात

कायदा व सुव्यवस्था व सुरक्षिततेसाठी एकूण २ हजार ७४१ पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून त्यामध्ये १५१ पोलीस अधिकारी, १६८० पोलीस हवालदार, तसेच एसआरपीएफ च्या २ कंपन्या यांचा समावेश आहे. महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आल्या आहेत.



## ४९८ पोस्टल मते प्राप्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणूक होत आहे. या निवडणूक प्रक्रियेत सहभागी असलेल्या कर्मचारी अधिकाऱ्यांपैकी काही जणांनी पोस्टल मतपत्रिकेद्वारे मतदान केले आहे. अशा पद्धतीने ४९८ पोस्टल मते निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे प्राप्त झाली आहेत.

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान तर शुक्रवार दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. ३५३ ठिकाणी १०९१ मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. या मतदान केंद्रांवर सुमारे ५ हजार ५०० कर्मचारी व अधिकारी कर्तव्यावर आहेत. त्यापैकी ४९८ संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांनी पोस्टल मतदान केले आहे. त्यांची पोस्टल मते सोलापूर महापालिका निवडणुकीतील संबंधित ७ निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे मंगळवार पर्यंत आली आहेत, अशी माहिती महापालिका सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांनी दिली.

## आचारसंहिता उल्लंघन तक्रारींसाठी प्रभागनिहाय संपर्क क्रमांक जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक अनुषंगाने लागू करण्यात आलेल्या आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन व्हावे तसेच निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखता यावी, यासाठी नागरिकांच्या तक्रारी, सूचना व माहिती तात्काळ प्राप्त होण्यासाठी विशेष संपर्क क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

निवडणूक कालावधीत कोणत्याही प्रकारचे आचारसंहिता उल्लंघन, बेकायदेशीर प्रचार, गैरप्रकार किंवा अन्य बाबींची माहिती नागरिकांना सहजपणे प्रशासनापर्यंत पोहोचवता यावी, यासाठी प्रभागनिहाय संपर्क व्यवस्था कार्यान्वित करण्यात आली आहे. प्रभाग क्रमांक १ ते १३ मधील नागरिकांनी आदर्श आचारसंहिता संदर्भातील तक्रार, सूचना अथवा माहिती देण्यासाठी ९६०७९८०१०० या क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच प्रभाग क्रमांक १४ ते २६ मधील नागरिकांसाठी ९६०७९८०२०० हा स्वतंत्र संपर्क क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे.

नागरिकांनी निवडणूक कालावधीत आदर्श आचारसंहितेचे कोणतेही उल्लंघन आढळल्यास तात्काळ संबंधित संपर्क क्रमांकावर माहिती देऊन प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

## पॅनल टू पॅनल मतदान झाल्यास महापालिकेवर भाजपाचाच झेंडा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

गतवेळच्या निवडणुकीत सोलापूर महापालिकेवर भाजपाचीच एकहाती सत्ता आली होती, तर यंदाच्या निवडणुकीतही भाजपाने कोणाशीही युती न करता स्वबळावरच महापालिका निवडणुकीच्या मैदानात उतरली आहे. सर्व २६ प्रभागात भाजपाने कमळाच्या चिन्हावर उमेदवार उभे केले असून पॅनल टू पॅनल मतदान झाल्यास महापालिकेवर भाजपाचाच झेंडा फडकेल अशी रणणिती भाजपाने आखली आहे.

महापालिकेत १०२ नगरसेवक संख्या असून गतवेळी भाजपा ४९, एकत्रित शिवसेना २१, कॉँग्रेस १४, एमआयएम ९, एकत्र राष्ट्रवादी ४, बसपा ४ आणि माकप एक असे पक्षीय बलाबल होते. यंदा मात्र भाजपाने महायुती न करता सर्व १०२ जागांवर कमळ चिन्हावर उमेदवार उभारले आहेत.

पॅनल टू पॅनल भाजपाला मतदानझाल्यासप्रभागातील कुमकुमवत उमेदवार देखील पॅनल मधील खमक्या उमेदवारामुळे विजयी होणार आहेत.

त्यामुळे भाजपाकडून कमळ हाच उमेदवार म्हणून मतदान करा, असा प्रचार सुरु आहे. भाजपाच्या विरोधात महायुतीतील मित्रपक्ष शिवसेना आणि राष्ट्रवादीने आव्हान उभे केले आहे तर महाविकास आघाडीतील कॉँग्रेस, शरद राष्ट्रवादी, उबाठा, माकप, वंचित यांनीही निवडणुकीत रंगत आणली आहे. एमआयएमने काही जागा राखण्याचा चंग बांधला आहे.

## तडीपार इसमांना मतदानाकरिता शहरात तात्पुरता प्रवेश मिळणार



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

महानगरपालिका निवडणूक २०२५-२६ अंतर्गत प्रत्येक पात्र नागरिकास मतदानाचा हक्क बजावता यावा, या उद्देशाने तडीपार कालावधीत असलेल्या इसमांना तात्पुरत्या स्वरूपात सोलापूर शहरात प्रवेशाची परवानगी देण्यात आली आहे. विजय कबाडे, पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ) यांनी हा आदेश जारी केला आहे.

त्यानुसार, तडीपार आदेश लागू असलेल्या इसमांना दि. १५ जानेवारी रोजी सकाळी ८ ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत सोलापूर शहरात हजर राहण्याची अटी व शर्तीसह परवानगी देण्यात आली आहे. सदर परवानगी केवळ मतदानाचा हक्क बजावण्यासाठी असून, संबंधित इसमांनी दिलेल्या वेळेच्या चौकटीतच शहरात प्रवेश करून मतदान करून त्वरित शहराबाहेर जाणे बंधनकारक राहणार आहे. तसेच, कायदा व सुव्यवस्थेचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. पोलीस प्रशासनाच्या या निर्णयामुळे तडीपार आदेश असलेल्या नागरिकांनाही लोकशाही प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळणार असून, मतदानाचा मूलभूत हक्क अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

## महापालिका मतदानासाठी कामगारांना पगारी सुट्टी, अन्यथा मालकांवर कारवाई

### कामगार आयुक्तांनी काढले आदेश : निवडणूक कार्यालयाचेही राहणार लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी खासगी आस्थापनाचालकांनी कामगारांना मतदानासाठी भरपगारी सुट्टी किंवा किमान दोन तासांची सवलत द्यावी, असे आवाहन सहायक कामगार आयुक्त मंगेश झोले यांनी केले आहे.

दि. १५ जानेवारी रोजी मतदानाच्या दिवशी संबंधित मतदान क्षेत्रात मतदार असलेल्या कामगारांना, ते प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणाहून बाहेर कार्यरत असले तरीही संबंधित मतदारांना मतदानाचा हक्क



बजावता यावा, यासाठी भर पगारी सुट्टी सवलत देणे बंधनकारक राहणार आहे. ही तरतूद खासगी कंपन्या, कारखाने, दुकाने, मॉल्स, आयटी कंपन्या, हॉटेल्ससह सर्व आस्थापनांना लागू राहील. सूचनांचे उल्लंघन झाल्यास कारवाई करण्यात येणार असून, तक्रारींसाठी सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात दक्षता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. निवडणुकीत महापालिका मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी राज्य शासनाने १५ जानेवारीला निवडणूक क्षेत्रात मतदार असलेल्यान अधिकारी, कर्मचारी व कामग भरपगारी सुटी जाहीर केली आईप सुटी खासगी आस्थापनांनाही लागू अअसे सहायक कामगार आधी कार्यालयाने स्पष्ट केले आहे. श्री सिद्धेश्वर यात्रा व महानगरपालिका निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी सोलापूर महापालिका हद्दीत मद्य विक्रीस मनाईचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जारी केले आहेत. १५ रोजी मतदानाच्या दिवशी आणि १६ रोजी मतमोजणीच्या दिवशी संपूर्ण व ताडी विक्री बंद राहणार आहे. याचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कडक करणर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

**लोकशाहीच्या उत्सवात सहभाग नोंदवा : चेंबर ऑफ कॉमर्स**

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार व महानगरपालिका आयुक्त व निवडणूक प्रमुख यांच्या निर्देशानुसार सर्व व्यापारी, उद्योजक, कारखानदार यांनी आपल्या अस्थापनेतील कर्मचाऱ्यांना मतदानासाठी १ दिवस सुटी देवून लोकशाहीच्या उत्सवात आपलाही सहभाग दर्शवावा, असे आवाहन सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी, सचिव धवल शहा यांनी केले आहे.

मतदान केल्याचे बोटावरील निशानी बघुनच आपले व्यवहार करावे किंवा नंतरच कामगारांना कामावर ठेवावे असेही आवाहन राठी यांनी केले आहे.

दरम्यान, ही सुट्टी महानगरपालिका निवडणूक क्षेत्रातील मतदारसंघाबाहेर कामानिमित्त असलेल्या मतदारांनाही लागू राहणार आहे. शहर-जिल्ह्यातील आपल्या आस्थापना मध्ये सदर नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे, अशीही विनंती राठी व शहा यांनी केली आहे.



## मतदानपूर्व तयारीची पाहणी

### मुख्य निवडणूक निरीक्षक नयना गुंडे, आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी दिल्या सूचना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५२६ अंतर्गत गुरुवार दि. १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानाच्या अनुषंगाने मुख्य निवडणूक निरीक्षक नयना गुंडे आणि निवडणूक निर्णय अधिकारी तथा आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी शहरातील मतदानपूर्व तयारीची पाहणी केली.

एस.आर.पी. कॅम्प, मेहता प्रशाला व शासकीय तंत्रनिकेतन येथील ईव्हीएम वितरण केंद्रे, स्ट्राँगरूम तसेच निवडणूक साहित्य वितरण प्रक्रियेची तपासणी करण्यात आली. मतदान प्रक्रिया पारदर्शक, सुरळीत व शांततेत पार पडावी यासाठी करण्यात आलेल्या व्यवस्थेबाबत अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली. मतदानासाठी सर्व सात निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावरील ठिकाणी ईव्हीएम व आवश्यक साहित्याचे वितरण पूर्ण झाले आहे. मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी महापालिकेने बसची स्वतंत्र व्यवस्था केली आहे. कायदा व सुव्यवस्था, सुरक्षा, वाहतूक व मूलभूत सुविधांची योग्य आखणी करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने काम करावे, अशा सूचना देण्यात आल्या. नागरिकांनी निर्भयपणे व उत्साहाने मतदानात सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी १३२७

**एऱ्हवीं तैंचि अर्जुना । होईजे ब्रम्हसंपन्ना ।**
**जैं या भूताकृती भिन्ना । दिसती एकी ।।**

क्षेत्र, ज्ञेय, ज्ञान आणि अज्ञान असे ब्रम्हाचे चार भाग करून, एका-एका भागचे स्पष्टीकरण भगवंतांनी अर्जुनाला करून दाखविले. हे भाग केवळ अर्जुनाल समजण्यासाठी पाडण्यात आल्याचेही भगवंत म्हणाले. भगवान श्रीकृष्ण सद्गुरूच असल्याने आपल्या शिष्याला कसे समजेल, याचा विचार त्यांना करावाच लागणार होता. म्हणून अर्जुनाला समजेल असे सांगण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. अर्जुनाने ब्रम्हसंपन्न व्हावे अशी भगवंतांची इच्छा आहे. ब्रम्हसंपन्न होण्यो तसे अवघड नाही. माणसाच्या मनाची तयारी झाली म्हणजे ही बाब साध्य होण्यासारखी आहे. या विश्वातील सर्व जीवपांची गोळाबेरीज म्हणजे विश्व होय. या विश्वातील भूतमात्रांत ज्याला भिन्नता दिसते, त्याला ब्रम्हसंपन्न होता येत नाही. मात्र सर्व भूतमात्र ज्याला समान दिसतात त्याला ब्रम्हसंपन्न होता येते हे सांगतांना भगवंत म्हणाले, एऱ्हवीं तैंचि अर्जुना । होईजे ब्रम्हसंपन्ना । जैं या भूताकृती भिन्ना । दिसती एकी ।। अर्थात, सहज विचार करता, माणसाला तेव्हाच ब्रम्हसंपन्न होता येता येईल, कि जेव्हा त्याला भिन्न-भिन्न भूताकार एक ब्रम्हरूप दिसतील, लाटा जशा पाण्यावर, परमांणुचे कण जसे पृथ्वीवर, किरणे जशी सुर्यमंडळावर किंवा देहाच्या ठिकाणी जसे अवयव किंवा मनाच्या ठिकाणी जशा सर्व कल्पना किंवा एका अग्नीच्या जशा सर्व ठिणग्या असतात. तसे प्राणिमात्र व ब्रम्हाचे आहे. अर्थात हे सर्व एकाच पाण्याचे, पृथ्वीचे, सुर्याचे, देहाचे, मनाचे किंवा अग्नीचे असते फक्त दिसते मात्र भिन्न. अगदी याप्रमाणे तुम्ही-आम्ही, प्राणीमात्र अर्थात हे सर्व भुताकार दिसायला भिन्न दिसत असले तरी ते एका ब्रम्हाचे आहेत, असे ज्याला समजते त्याला ब्रम्हसंपन्न होणे अवघड नसते.

जो ब्रम्हसंपन्न होतो किंवा ज्याला ब्रम्हस्वरूपाचे ज्ञान होते तो खरा ज्ञानी होय. असा ज्ञानी सदैव सुखी व आत्मानंदी असतो. जगात त्याला सर्वत्र समानता दिसत असल्याने त्याच्या वाट्याला दु:ख येण्याचे कारणच नसते. सुख दु:ख हे त्याच्या मनालाही शिवत नाहीत. सुख, दु:खातला, आपपर मधला हा ज्ञानी भेदच जाणत नसल्याने त्याला वेगवेगळी अनुभुती येण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. आज आपण पाहतो की आपल्या अवतीभोवती किती असमानता पसरलेली आहे. पावला-पावलाला भेदाची अनुभुती आपणाला येत असते. प्रत्येक जीवात आपण भेद करतो. हा लहान, हा मोठा, हा गरीब, हा श्रीमंत, ही स्त्री, हा पुरूष, हा उच्च, हा निच असा वेगवेगळा भेद आपण करतो. प्राणीमात्रात तर आपण भेद करतोच पण राष्ट्रपुरूषांत, संतमहात्म्यात, देव-देवतांतही भेद पाहत असतो. एवढा भेद पाहणाऱ्या या जीवाला ब्रम्हरूप कसे होता येईल? भेदाने भरलेले मन आत्मानंदी कसे होईल ? आपल्या मनांतुन भेद काढुन टाकण्यासाठी फक्त आपली मानसीक तयारी व सद्गुरूंची कृपा पाहिजे. माऊलींची कृपा आपल्यावर आहेच. आता फक्त आपल्या मनाची तयारी पाहिजे. आपण चोहीकडे समानता पाहुन, त्याप्रमाणे वागण्याची आपली सर्वस्वी तयारी करून प्रत्यक्ष वर्तनास प्रारंभ करू या, सद्गुरू कृपेने आपल्याला या सत्कार्यात यश मिळेलच, असे आम्हास वाटते. जय जय राम कृष्ण हरी.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - पौष. द्वादशी**
**ऋतु - हेमंत ।**
**नक्षत्र- ज्येष्ठा (२९.४७)**
**योग - वृध्दि (२०.३७)**
**करण - गरज (अहोरात्र)**
**राहू काल : गुरुवार दु. १.३० ते ३.००**

**दिनविशेष :**
**संक्रांत, करिदिन...**
**भारतीय लष्कर दिन जनरल के.एम. करिअप्पा यांनी भारतीय सैन्याची सूत्रे हाती घेतल्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा होतो.**
**१९७०: मुअम्मर गडाफी लिबियाचे सर्वेसर्वा बनले.**
**१९७३: जनरल गोपाळ गुरुनाथ बेवूर हे पहिले महाराष्ट्रीयन लष्करप्रमुख बनले.**

# ‘मिनी’ मंत्रालय निवडणूक; जिल्हाधिकारी ॲक्टिव्ह मोडवर

## अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या केल्या नियुक्त्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

राज्य निवडणूक आयोगाकडून राज्यातील ७३१ जिल्हा परिषद, १४६२ पंचायत समिती सदस्यांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनीही जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी लागणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची दुसऱ्याच दिवशी नियुक्त्या केल्या आहेत.

गेल्या चार वर्षापासून मुदत संपलेल्या राज्यातील १५ जिल्हा परिषद व १२५ पंचायत समिती निवडणूक कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाकडून जाहीर केला असून, १६ ते २१ जानेवारी उमेदवारी अर्ज भरता येणार आहे. तर ५ फेब्रुवारी रोजी मतदान आणि ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी



होणार आहे. तर दि. १० फेब्रुवारी रोजी निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन रात्रपत्रात प्रसिध्द करण्यात येणार आहेत. दरम्यान, १५ जिल्हा परिषदेसाठी ७३१ व १२५ पंचायत समितीसाठी १४६२ सदस्यांसाठी हे मतदान होणार आहे.

**जिल्ह्यात २४ लाख ५९ हजार मतदार करणार मतदान**

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी सोलापूर जिल्ह्यातून २४ लाख ५९ हजार २२७ मतदार मतदान करणार आहेत. यामध्ये एकूण मतदान केंद्रांची संख्या २ हजार ७५८ असून, पुरूष मतदार १२ लाख ७७ हजार ०६१ इतके आहेत तर यासाठी महिला मतदार ११ लाख ८२ हजार ०८३ आणि इतर ८३ मतदार आहेत.

**जिल्ह्यात ३८ हजार ९०९ दुबार मतदार**

दि. ०१/०७/२०२५ रोजी एकूण पुरुष मतदार १२ लाख ७७ हजार ०६१ तर महिला ११,८२,०८३ व इतर मतदार ८३ असे एकूण २४ लाख ५९ हजार २२७ एवढे मतदार आहेत. त्यापैकी ३८,९०९ इतके दुबार मतदार असून, त्यांच्याकडून कोणत्या मतदान केंद्रावरती मतदान करणार आहेत, याचे हमीपत्र घेण्यात आलेले आहे. एकूण २ हजार ७५८ मतदान केंद्रापैकी ५०% प्रमाणे १ हजार ३७९ मतदान केंद्रावर वेब कास्टिंगची व्यवस्था करणेत आलेली आहे.

**ईव्हीएमसाठी पोलिस बंदोबस्त**

सोलापूर जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीचे अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यासाठी मतदान प्रक्रिया राबविण्यासाठी एकूण ७५०० बीयु, ३३६६ सीयु इतक्या ईव्हीएमचे वाटप पोलिस बंदोबस्तात केले आहे आणि त्यासाठी पोलिस बंदोबस्तही वाढविला आहे.

**निवडणुकीसाठी अधिकाऱ्यांच्या केल्या नेमणुका**

जिल्ह्यातील ११ तालुक्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी २ हजार ७५८ केंद्रांवर सदस्यांची निवडणूक पार पडणार आहे. यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तसेच ईव्हीएमसाठी नोडल अधिकारी, सहाय्यक नोडल अधिकारी यांच्या नियुक्त्या आणि जबाबदार जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केल्या आहेत.

**महिलांसाठी पिंक मतदान केंद्रांची निर्मिती होणार**

मतदान केंद्रावर वीज, पाणी, सावली, स्वच्छतागृह सुविधा राहणार असून, दिव्यांगासाठी रॅपची सोय केली जाणार आहे. ज्या मतदान केंद्रावर महिला मतदार अधिक असतील या ठिकाणी पिंक मतदान केंद्र उभारले जाणार असून, यामध्ये सर्व कर्मचारी महिला राहणार आहेत. या निवडणुकीसाठी जिल्हा परिषदेसाठी ७.५० लाख तर पंचायत समितीसाठी ५.२५ लाख खर्चाची मर्यादा ठेवण्यात आली आहे. महानगरपालिका निवडणुकीनंतर आता जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीचा धुरळा उडणार असून, नेते मंडळी आणि इच्छुकांची धावपळ सुरू झाली आहे.

## अवैध हातभट्टीवर छापा; ३१ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

अवैध हातभट्टी निर्मीतीच्या ठिकाणी छापे टाकुन ३० लाख ९६ हजारांच्या किमतीचा मुद्देमाल पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण व राज्य उत्पादन शुल्क यांची संयुक्त कारवाईमधील नाश करण्यात आला.




अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर यांनी जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच नागरिकांच्या आरोग्यास व सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या अवैध हातभट्टी व्यवसायावर कठोर कारवाई करण्याबाबत सुचना तसेच आदेश दिले होते. त्या अनुषंगाने राहुल अत्राम (भा.पो.से.), परिविक्षाधीन सहायक पोलीस अधीक्षक यांच्या नेतृत्वाखालील पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण व राज्य उत्पादन शुल्क विभाग, सोलापूर यांचेकडील अधिकारी व अंमलदार यांनी संयुक्तपणे दिनांक १२ जानेवारी रोजी मौजे मुळेगाव तांडा, तालुका दक्षिण सोलापूर येथे अवैध हातभट्टी व्यवसायावर मोठी व प्रभावी कारवाई केली.

सदर कारवाई दरम्यान मुळेगाव तांडा येथे अवैधरित्या हातभट्टी निर्मितीसाठी वापरण्यात येणारे कच्चा माल गुळमिश्रीत रसायन, लोखंडी पिंपाच्या भट्टी तसेच हातभट्टी तयार करण्यासाठी आवश्यक इतर साहित्य असा ३० लाख ९६ हजारांच्या किमतीचा मुद्देमाल आढळून आला. त्या अनुषंगाने अवैध हातभटी तयार करण्याच्या उद्देशाने साहित्य बाळगल्याबाबत ०४ सराईत हातभट्टी व्यवसायिकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अवैध हातभट्टी व्यवसाय, बनावट दारू निर्मिती व विक्री करणाऱ्या विरुद्ध भविष्यातही अशाच प्रकारची कठोर कारवाई करण्यात येणार असून कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही व त्यांच्या विरुध्द प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.

सदरची कामगिरी ही अतुल वी. कुलकर्णी, पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण, भाग्यश्री जाधव, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर विभाग, प्रितम यावलकर, अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली, राहुल अत्राम, भा.पो.से., विजय शिंदे, सहा. पोलीस निरीक्षक, कुलदिप सोनटक्के, पोलीस उप निरीक्षक, ग्र. पो. सई श्रीकांत गायकवाड, सपोफौ प्रकाश कारटकर, पो.हे.कॉ. विजय भरले, पो.हे.कॉ. रवि माने, पो.हे.कॉ. धनराज गायकवाड, पो. कॉ. सुरज रामगुडे, मनोज राठोड, यश देवकते, समर्थ गाजरे, योगेश जाधव, ने. स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर यांनी तसेच राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर विभागाकडील निरीक्षक घाडगे, निरीक्षक, चौरे, निरीक्षक पाटील, व सिध, शेळके व इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या पथकाने संयुक्तरित्या कामगीरी केली आहे.

## शनिवारी गडीनाडू कन्नड साहित्य संस्कृती उत्सव

### किरिटेश्वर मठात १७ जानेवारीला आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

कर्नाटक बॉर्डर एरिया डेव्हलपमेंट अथॉरिटी, बंगळूरू आणि श्री किरीटेश्वर संस्थान मठ यांच्या संयुक्त विद्यमाने गडीनाडू कन्नड साहित्य संस्कृती उत्सव - २०२६ या सांस्कृतिक व साहित्यिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उत्सव शनिवार, दि. १७ जानेवारी रोजी किरीटेश्वर संस्थान मठ, भवानी पेठ येथे होणार आहे, अशी प्रा. रविकुमार सोलापुरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कर्नाटक राज्य स्थापनेच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने कर्नाटक शासनाच्या बारिसू कन्नड दिंडिमव उपक्रमांतर्गत होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शरण श्रीधर मुरले (शरण साहित्य विचारवंत व अध्यात्मिक साधक) असतील. कार्यक्रमास कर्नाटक बॉर्डर एरिया डेव्हलपमेंट अथॉरिटीचे अध्यक्ष सोमन्ना बेविनमारद हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

सकाळी ९ वाजता बसवेश्वर चौक ते किरिटेश्वर मठ या मार्गावर देवी कन्नड भुवनेश्वरीच्या भव्य मिरवणुकीने कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. त्यानंतर उद्घाटन समारंभ, भाषणे, विशेष व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम, ग्रंथप्रकाशन तसेच विविध क्षेत्रातील कन्नड साहित्य, संस्कृती आणि समाजसेवेत योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे. या उत्सवात लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक, पत्रकार, कलाकार व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

मत्ते हडितु कोगिले या ग्रंथाचे प्रकाशन तसेच कन्नड संस्कृतीचे वैभव दर्शविणारे भजन, वाचन, नृत्य व संगीताचे कार्यक्रम हे उत्सवाचे विशेष आकर्षण असणार आहेत. या महोत्सवाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेला रेणुका बागलकोटी, डॉ. गीता डिग्गे, शिवानंद बागलकोटी, प्राध्यापक राजश्री लोकापुरे आदी उपस्थित होते.

## छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेक दिनानिमित्त उद्या कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेक सोहळा समिति सोलापूरतर्फे छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३४५ व्या राज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून शुक्रवार, दि. १६ जानेवारी रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती शिरीष जगदाळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जुना पुना नाका येथील छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याजवळ हे कार्यक्रम होणार आहेत. सकाळी साडेआठ वाजता ध्वजवंदन उपस्थित भगिनींच्या हस्ते होणार आहे. सकाळी नऊ ते दुपारी चार या वेळेत रक्तदान शिबिर होणार आहे.

या कार्यक्रमात पत्रकार प्रमोद बोडके, विशाल भांगे यांचा शिवश्री सन्मान देऊन सत्कार करण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस गोवर्धन गुंड, श्याम कदम, संभाजी भोसले, प्रकाश ननवरे, शेखर भोसले आदी उपस्थित होते.



## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे राजमाता जिजाऊ जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शहर शाखेत सभा झाली. या सभेत राजमाता जिजाऊ यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

सभेनंतर समितीच्या ज्येष्ठ कार्याध्यक्ष रामलिंग गायकवाड, सचिव सुजित हावळे, व्ही. डी. गायकवाड, दीपक पांडगळे, निनाद शहा, उषा शहा, मधुरा सलवारू यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयाला भेट देऊन निवेदन सादर केले. निवेदनात बोरामणी तालुका, सोलापूर येथील गवताळ सफारी जवळील प्राचीन दगडी चक्रव्यूह (लॅबिरिंथ) च्या संवर्धनाची मागणी करण्यात आली आहे. या ऐतिहासिक स्थळाखाली गुप्त धन आहे असा गैरसमज पसरवून समाजकंटकांनी खोदकाम करून दगड काढले असून, चक्रव्यूहाची अखंडता धोक्यात आली आहे. यामुळे अंधश्रद्धा वाढवली जात असून, लोकांना वेठीस धरून पैसे उकळले जात आहेत.

समितीने जिल्हाधिकारी महोदयांना या चक्रव्यूहाचे तात्काळ संवर्धन, अंधश्रद्धेविरोधी कारवाई आणि स्थानिक प्रशासनाला सतर्क करण्याची नम्र विनंती केली आहे.

## होम मैदान येथे गाडीची डिक्की फोडून पॅकेट लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

होम मैदान परिसरात पार्क केलेल्या गाडीच्या डिक्कीतून पॅकेट चोरल्याची घटना घडली आहे. ही घटना १३ जानेवारी रोजी सकाळी ११ ते १२ वाजण्याच्या सुमारास होम मैदान परिसरात घडली.दिनेश लक्ष्मण शिवपुरे वय ४९, रा. प्लॉट नं. ७१०, किमीया स्वप्नपूर्ती, इंदिरानगर, सोलापूर यांनी याबाबत सादर बझार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. फिर्यादी यांनी आपली गाडी होम मैदान येथे पार्क केली असताना अज्ञात चोरट्याने बनावट चावीच्या सहाय्याने गाडीची डिक्की उघडून त्यामधील पॅकेट लंपास केले.चोरट्याने पॅकेटमध्ये असलेली विविध भारतीय चलनातील ५ हजार २०० रुपये रोख रक्कम तसेच आधार कार्ड व पॅन कार्ड अशी महत्त्वाची कागदपत्रे असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार जमादार करत आहेत.

## माघ महिना : पावित्र्य, भक्ती आणि समाजप्रबोधनाचा त्रिवेणी संगम

माघ महिना हा भारतीय पंचांगातील ११ वा महिना असून, तो आध्यात्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीने अत्यंत पवित्र मानला जातो. माघ या शब्दाचा उगम 'मघा' नक्षत्रावरून झाला आहे. थंडीचा कडाका आणि उत्तरायणाचा काळ अशा वातावरणात येणारा हा महिना मानवी जीवनात चैतन्य आणि शुद्धता घेऊन येतो. भारतीय संस्कृती ही निसर्गाशी आणि ऋतूचक्राशी घट्ट जोडलेली आहे. माघ महिना हा शिशिर ऋतूचा उत्तरार्ध आणि वसंत ऋतूची चाहूल देणारा काळ असतो. पौराणिक ग्रंथांमध्ये माघ महिन्याला 'माधवाचा महिना' म्हटले आहे. या महिन्याचे महत्त्व सांगताना म्हटले जाते की, माघ मास: सर्व मासेषु श्रेष्ठ:. 'स्नान, दान आणि ध्यान' या त्रिसूत्रीच्या माध्यमातून माघ महिना मानवाला अधिक समृद्ध आणि संवेदनशील बनवतो. या महिन्यात आपण आपल्यातील दुर्गुणांचा त्याग करून सूर्याप्रमाणे तेजस्वी आणि गणेशाप्रमाणे बुद्धिमान होण्याचा संकल्प करायला हवा.

**आत्मशुद्धीचा काळ**

माघ महिन्याचे आध्यात्मिक महत्त्व प्रामुख्याने 'स्नान' आणि 'दान' याभोवती केंद्रित आहे. माघ महिन्यात सूर्योदयापूर्वी पवित्र नद्यांमध्ये स्नान करण्याला मोठे महत्त्व आहे. प्रयागराज येथे होणारा 'माघ मेळा' हे याचे सर्वात मोठे उदाहरण आहे. या महिन्यात नद्यांचे पाणी अधिक गुणकारी आणि पवित्र असल्याचे मानले जाते. आध्यात्मिक भाषेत, पहाटेचे थंड स्नान हे इंद्रियांवर नियंत्रण मिळवण्याचे आणि मन एकाग्र करण्याचे साधन आहे. माघ महिन्यात सूर्याची उपासना केली जाते. उत्तरायणात सूर्याचे तेज वाढत जाते, जे बुद्धीचे प्रतीक आहे. या महिन्यात 'तीळ' वापरण्याला महत्त्व आहे. तीळ हे सात्त्विक ऊर्जा प्रदान करतात. 'तिळगुळ घ्या, गोड बोला' हा संदेश देऊन माणसाने मनातील कटुता काढून टाकून ईश्वराशी जोडावे, हा या मागचा आध्यात्मिक हेतू आहे.

**गणेशजयंती आणि महाशिवरात्री**

माघ महिन्यात 'गणेश जयंती' येते, जी ज्ञानाच्या देवतेचा जन्मोत्सव आहे. तसेच, माघ वद्य चतुर्दशीला 'महाशिवरात्री' येते. शिवाचे ध्यान आणि रात्रीचे जागरण हे आत्मिक प्रबोधनाचे प्रतीक आहे.

**लोकसंग्रह आणि ऐक्याचा संदेश**

माघ महिना हा समाजाला एकत्र आणणारा काळ आहे. या काळात येणारे सण सामाजिक भिंती तोडण्याचे काम करतात. जरी मकर संक्रांत अनेकदा पौष महिन्यात येते, तरी तिचा प्रभाव आणि माघ महिन्यातील 'रथसप्तमी' पर्यंत चालणारे हळदी-कुंकू कार्यक्रम स्त्रियांना एकत्र आणतात. यामुळे सामाजिक संपर्क वाढतो आणि एकमेकांबद्दल जिव्हाळा निर्माण होतो. माघ महिन्यात देशाच्या कानाकोपऱ्यातून लोक तीर्थक्षेत्री एकत्र येतात. इथे कोणताही जातिभेद किंवा प्रांतवाद नसतो. ही 'विविधतेतून एकता' भारतीय समाजाचे बलस्थान आहे. कल्पवास (नदीकाठी राहून केलेली साधना) करणारे लोक महिनाभर साधे जीवन जगून सामाजिक समतेचा धडा देतात. माघ महिन्यात अन्नदान, वस्त्रदान आणि पात्रादान (पाण्याचे भांडे) करण्याचे विशेष महत्त्व सांगितले आहे. समाजातील वंचित घटकांना मदत करण्याची ही एक धार्मिक रीत आहे, ज्यामुळे सामाजिक समतोल राखला जातो.

**कला आणि निसर्गाचा उत्सव**

माघ शुद्ध पंचमीला 'वसंत पंचमी' साजरी केली जाते. हा दिवस विद्या आणि कलेची देवता 'माता सरस्वती' हिचा उत्सव आहे. वारकरी सांप्रदायाच्या दृष्टीने हा दिवस महत्वाचा आहे. यादिवशी जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचा जन्म झाला. आम्ही वैकुंठवासी । आलो याची कारणासी । बोलिले जे ऋषी । साच भावे वर्ताया ।। असा स्पष्ट निर्वाळा देणारे संत तुकाराम महाराज महाराष्ट्रभूमीला एका ऊंच शिखरावर नेणारे ठरले.

महाराष्ट्रात माघ महिन्यात अनेक ग्रामदेवतांच्या जत्रा भरतात. खंडोबाची जेजुरी असो किंवा अन्य ग्रामीण देवालये, तिथे होणारी लोकगीते, भारूड आणि तमाशा यांमधून सांस्कृतिक वारसा जिवंत ठेवला जातो. माघ महिन्यात बाजरीची भाकरी, लोणी, पालेभाज्या आणि तिळाचे पदार्थ आवर्जून खाल्ले जातात. हा आहार केवळ आरोग्यासाठीच नाही, तर आपल्या भौगोलिक परिस्थितीशी जुळणारा सांस्कृतिक ठेवा आहे.



**धर्म-संस्कृती**
**प्रमोद (श्याम) जोशी**
**मो.7447788349**

**माघ महिन्यातील सण आणि त्यांचे महत्त्व**

**गणेश जयंती :** माघ शुद्ध चतुर्थी विद्येच्या देवतेचा प्रकट दिन, बुद्धीची उपासना.

**वसंत पंचमी :** माघ शुद्ध पंचमी सरस्वती पूजन, निसर्गातील नवचैतन्याचे स्वागत.

**रथसप्तमी :** माघ शुद्ध सप्तमी सूर्याचा रथात बसून प्रवास सुरू होतो, आरोग्याची प्रार्थना.

**भीष्म अष्टमी :** माघ शुद्ध अष्टमी इच्छामरणी भीष्म पितामहांचे स्मरण, धैर्याचे प्रतीक.

**महाशिवरात्री :** माघ वद्य चतुर्दशी उपवास आणि जागरातून शिवतत्त्वाची अनुभूती.

**निसर्ग आणि विज्ञान**

माघ महिन्याचे वैज्ञानिक महत्त्वही नाकारता येत नाही. थंडी संपून उष्णता वाढण्याचा हा संधिकाळ आहे. यावेळी सूर्यस्नान घेतल्याने शरीराला 'व्हिटॅमिन डी' मिळते. नद्यांच्या प्रवाहातील बदल आणि पहाटेचे स्नान यामुळे श्वसनसंस्थेची प्रतिकारशक्ती वाढते. निसर्गात झाडांना नवीन पालवी फुटण्यास सुरुवात होते, जे जुने सोडून नवीन स्वीकारण्याचे शिक्षण देते. माघ महिना हा केवळ एक महिना नाही, तर तो शुद्धीकरणाचा उत्सव आहे. आध्यात्मिक दृष्ट्या तो मनाला निर्मळ करतो. या महिन्यात स्नान, दान व ध्यानाला विशेष महत्व आहे.

# सोमवारी पं.कृष्णेंद्र वाडीकरांची ‘संगीत संध्या’

### नाट्यकर्मी विजयकुमार साळुंके व शशिकांत बटाणे यांचा होणार गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

स्व. सिद्धा पाटील स्मृती समिती आणि नाट्य आराधना, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, १९ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात 'संगीत संध्या' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात हुबळी येथील सुप्रसिद्ध हिंदुस्थानी शास्त्रीय गायक पंडित कृष्णेंद्र वाडीकर यांच्या सुमधुर गायनाचा त्रिवेणी संगम सोलापूरकरांना अनुभवता येणार आहेत.

बालगंधर्वांचे निस्सिम चाहते कै. सिद्धा (एस.एम.) पाटील यांची यंदा २८ वी पुण्यतिथी असून, २०२६ हे त्यांचे जन्म शताब्दी वर्ष आहे. गेली २७ वर्षे पाटील परिवारातर्फे संगीत आणि नाट्य क्षेत्रातील विविध दर्जेदार कार्यक्रम सादर करून त्यांना श्रद्धांजली वाहिली जाते. या जन्म शताब्दी वर्षाचे औचित्य साधून यंदा विशेष सांगितिक मेजवानीचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी कै. सिद्धा पाटील यांचे जुने स्नेही तथा अ.भा. मराठी नाट्य परिषद उपनगरीय शाखेचे अध्यक्ष, निर्माते विजयकुमार साळुंके आणि ज्येष्ठ नाट्यकलाकार व प्रकाश योजनाकार शशिकांत बटाणे यांचा विशेष गौरव होणार आहे. ज्येष्ठ नाट्यकलाकार व संवादिनी वादक प्रफुल्लचंद्र आहेरकर यांच्या अध्यक्षतेखाली



आणि त्यांच्या हस्ते हा सत्कार सोहळा संपन्न होईल.

**शास्त्रीय संगीताची मेजवानी**

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण असलेले पंडित कृष्णेंद्र वाडीकर हे भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांचे ज्येष्ठ शिष्य कै. पं. श्रीपती पाडिगार यांचे शिष्य आहेत. किराणा घराण्याच्या गायकीचा वारसा जपणाया वाडीकर यांनी देश-विदेशातील अनेक महोत्सवात आपल्या गायनाने रसिक प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. या 'संगीत संध्या' कार्यक्रमात ते संतवाणी, अभंग, नाट्यसंगीत आणि ठुमरी सादर करणार आहेत. त्यांना ओंकार पाठक (अक्कलकोट) हे संवादिनीवर, तर नितीन दिवाकर तबल्यावर साथसंगत करणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व निवेदन मंजुषा गाडगीळ करणार आहेत. हा कार्यक्रम सर्व रसिकांसाठी विनामूल्य व खुला असून, जास्तीत जास्त संगीतप्रेमींनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ॲड. आर. एस. तथा बाबू पाटील यांनी केले आहे.

## महत्वाचे...



### वखारिया विद्यालयात राजमाता जिजाऊ, विवेकानंद जयंती साजरी

**बार्शी, दि. १४ जानेवारी-**

तालुक्यातील उपळे दुमाला येथील वखारिया विद्यालयात राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यालयातील शिक्षक शंकर शिंदे यांच्या हस्ते कर्मवीर मामासाहेब जगदाळे, राजमाता जिजाऊ माँसाहेब, स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी इयत्ता पाचवीतील ईश्वरी नाईकवाडी, प्रांजली या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात संस्थांर्गत विज्ञान प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या साहित्यास तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या राधिका पवार व कार्तिकी बुरगुटे या विद्यार्थिनींचा आणि मार्गदर्शक शिक्षक मकरंद जगदाळे, रेवणसिद्ध दुलंगे यांचा शंकर शिंदे यांनी प्रमाणपत्र, गुलाब पुष्प देवून सत्कार केला. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक प्रशांत काशीद, डी.डी. राऊत, अनिल वैद्य, एन.एन महाले, दादासाहेब धनके, सेवक वाघ, सुरवसे उपस्थित होते.



### चैतन्य पतसंस्थेच्या वतीने संजय रोकडे यांचा सन्मान

**पिलीव, दि. १४ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील वृतपत्र विक्रेते संजय अनंत रोकडे यांची पिलीव पत्रकार संघाच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल चैतन्य पतसंस्थेच्या वतीने त्यांचा चेअरमन नानासाहेब देशमुख यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी नागरी आघाडीचे अध्यक्ष आरिफखान पठाण, उपाध्यक्ष डॉ. मिलिंद गुळभिले, संचालक तुकाराम पडळकर, कल्याण जावळे, कुमार भैस, अशोक राजमाने, पतसंस्थेचे सचिव रघुनाथ नरळे, दामोदर लोखंडे, विठ्ठल जाधव, गणेश ढेकळे उपस्थित होते.



### 'जिजाऊ' मध्ये सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ जयंती साजरी

**बार्शी, दि. १४ जानेवारी-**

जिजाऊ गुरुकुल येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीचे औचित्य साधून शैक्षणिक, बौद्धिक, सांस्कृतिक व सामाजिक अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देत महापुरुषांच्या विचारांचा जागर करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत प्रश्नमंजुषा, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा तसेच वार्षिक क्रीडा महोत्सव अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. देवा चव्हाण यांनी ऐकावं ते नवलच या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. ॲड. विक्रम सावळे यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअरच्या विविध संधी, स्पर्धा परीक्षा आणि योग्य नियोजनाबाबत मार्गदर्शन केले. तसेच कविता अंधारे व डॉ. तनुजा चिकणे यांनी राजमाता जिजाऊ माँसाहेब व आधुनिक जिजा यांच्यातील संवादाच्या माध्यमातून आजच्या समाजातील ज्वलंत विषयांवर प्रभावी प्रकाश टाकला. या थोर मातांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे जिजाऊ गुरुकुलच्या शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचे दर्शन घडविणाऱ्या वार्षिक कॅलेंडरचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरात ५५ रक्त पिशव्या संकलित करण्यात आल्या. कार्यक्रमास रोटरी क्लब बार्शीचे अध्यक्ष संजय हिंगमिरे, उद्योगपती चिंतामणी अण्णा, हनुमंत मोरे, पालक-शिक्षक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष येमेश कुऱ्हाडे, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संभाजी गाडगे, सचिव वर्षा गाडगे, प्रशासकीय अधिकारी किशोर कदम, डायरेक्टर संदेश कदम, फिजिकल कोच जे. बी. शिंदे उपस्थित होते. सूत्रसंचालन मनीषा मोठे आणि वैष्णवी क्षीरसागर यांनी केले.



### सोलंकरवाडी शाळेस योगेश पाटील यांच्याकडून २५ हजारांची देणगी

**मोडनिंब, दि. १४ जानेवारी-**

सोलंकरवाडी (ता. माढा) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त कै. सुरेश पाटील यांच्या स्मरणार्थ तालुकाध्यक्ष योगेश पाटील यांनी शाळेचे मुख्याध्यापक रामकृष्ण केदार व तत्कालीन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष वामन यादव यांच्याकडे २५ हजार रुपयांच्या देणगीचा धनादेश सुपूर्द केला. यावेळी बोलताना सरपंच योगेश पाटील यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या माध्यमातून जन सुविधा योजनेतून सोलंकरवाडी-पडसाळी रस्त्यासाठी ८ लाख रुपये व पडसाळी ते सोलंकरवाडी शिव रस्त्यासाठी ९ लाख रुपये मंजूर करून घेऊन सोलंकरवाडी गावच्या विकासात भर टाकली असल्याचे सांगितले. यावेळी डॉ. अनिल गोळवलकर, डॉ. प्रशांत कोल्हे, डॉ. संतोष दळवी, रोटरीचे अध्यक्ष निलेश गिड्डे, औदुंबर पाटील, ज्योती कुलकर्णी, निलेश पाटील, राजा भांगिरे, अतुल माळी, माजी सरपंच अनंता गलांडे, संदीप गलांडे, अर्जुन भांगिरे, बाळासाहेब माळी, गोपाळ माळी, आजिनाथ शेंडगे उपस्थित होते. सूत्रसंचालन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शहाजी यादव यांनी केले.

# अक्कलकोटमध्ये भाजपा पुन्हा 'एकला चलो'च्या भूमिकेत

## जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी हालचालींना वेग; तिरंगी लढतीची शक्यता

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ जानेवारी-**



नगरपालिका निवडणुकीत भाजपाने स्वबळावर मोठे यश मिळविल्याने जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजपाचा आत्मविश्वास वाढला आहे. त्यामुळे भाजपा तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीसाठी पुन्हा 'एकला चलो रे'च्या भूमिकेत आहे. माजी आमदार स्व. सिद्रामप्पा पाटील गट राष्ट्रवादी अजित पवार गटामध्ये प्रवेश करण्याच्या हालचाली असल्याने शिंदे सेना आणि अजित पवार राष्ट्रवादी एकत्रित निवडणूक लढविण्याची शक्यता आहे. काँग्रेस स्वबळावर लढणार की शिंदेसेनेसोबत युती करणार याबाबत अद्याप निर्णय नाही. एकंदरीत तालुक्यात पुन्हा राजकारण तापणार असून नगरपालिकेप्रमाणेच तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे.

जिल्हा परिषद निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याने सर्व राजकीय पक्षांनी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. अक्कलकोट तालुक्यात पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या निवडणूकीत सर्वच पक्षांच्या बैठका सध्या सुरू असून वरिष्ठ नेते कार्यकर्त्यांना जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीसाठी कामाला लागा असे सांगत आहेत. नगरपालिका निवडणुकामध्ये आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोट व मैंदर्गी नगरपालिका ताब्यात घेत आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले. माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी प्रथमच शिंदे सेनेच्या चिन्हावर निवडणूक लढवित अक्कलकोटमध्ये एक जागा जिंकत दुधनी नगरपालिकेत एकतर्फी विजय मिळविला आहे. याउलट काँग्रेसने तिन्ही ठिकाणी निवडणूक लढून दुधनी व मैंदर्गी येथे एकही जागा जिंकली नाही. अक्कलकोट शहरात फक्त दोन जागांवर विजय मिळवला आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत काँग्रेस स्वतंत्र लढणार की शिवसेनेचे सोबत युती करणार याबाबत लवकरच निर्णय समोर येईल. आतापर्यंत तालुक्यात पारंपरिक विरोधक भाजप व काँग्रेस यांच्यातच सरळ लढत होत होती. काँग्रेसमधून माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे शिवसेनेत गेले असून माजी आमदार स्व. सिद्रामप्पा पाटील गट अजित पवार राष्ट्रवादी पक्षात जाणार असल्याची चर्चा आहे. अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शिंदेसेना सोबत युती करण्याची शक्यता आहे. काँग्रेस सोबत येणार की नाही याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. ठाकरे सेना, रासप, वंचित, शरद पवार राष्ट्रवादी आदी पक्ष निवडणूक लढविण्याची तयारी करीत असून त्यांची भूमिकाही महत्वाची आहे. एकंदरीत निवडणुकीचे चित्र काय असेल, हे सध्या सांगणे कठीण आहे.

अक्कलकोट तालुक्यात ६ जिल्हा परिषद गट व १२ पंचायत समिती गण आहे. सर्वच पक्षांनी निवडून येऊ शकणारा, सक्षम व स्वच्छ प्रतिमेचा उमेदवार शोधण्यास सुरुवात केली असून बैठका, गोपनीय चर्चा, जातीय समीकरणांचा अभ्यास करीत आहे. भाजपचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील यांच्याकडे उमेदवारीचा अधिकार राहणार आहे.

येथील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका तब्बल सात वर्षापेक्षा उशिराने होत आहेत. जिल्हा परिषदसाठी ६ आणि पंचायत समितीसाठी १२ असे १८ जणांना उमेदवारी मिळणार आहे. मात्र इच्छुकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. भाजपाकडे इच्छुकांची संख्या सर्वाधिक आहे. प्रत्येक पक्षातील नेत्यांकडे कार्यकर्ते आस लावून बसले आहेत. शंभरहून अधिक इच्छुक आहेत. काहीजण उमेदवारीसाठी राजकीय पक्ष बदलताना दिसत असून आज एका पक्षात तर उद्या दुसऱ्याच पक्षात दिसत आहेत.

## माळशिरस तालुक्यात अनेकांचा भाजपामध्ये प्रवेश

### भाजपाला अच्छे दिन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १४ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यात भाजपने आपले पाय भक्कम रोवण्यास सुरुवात केली आहे. तालुक्यातील अनेक गावातील सरपंचासह सदस्य, सोसायटी चेअरमन व कार्यकर्ते भाजपात प्रवेश करीत आहेत.

लोकसभा व विधानसभा निवडणुकीपासूनच याची सुरूवात झाली आहे. विधानसभेवेळी मोहीते-पाटील व जानकर गट एकत्र आल्याने जानकर हे आमदार झाले. मात्र हे जनतेला रुचलेले नसल्याचे दिसत आहे. मोहिते-पाटील खासदार झाले व जानकर आमदार झाले असले तरी देशात व राज्यात भाजपाचे सरकार सत्तेत असल्याने माढा लोकसभा व माळशिरस विधानसभा मतदारसंघात विकासकामांना काही प्रमाणात ब्रेक लागल्याची भावना आहे. त्यामुळेच तर गावगाडयातील पुढारी तसेच सर्वसामान्य जनता माजी आमदार राम सातपुते यांच्या नेतृत्वावर तसेच कामावर विश्वास ठेवुन भाजपमध्ये प्रवेश करीत आहेत. माजी आमदार सातपुते यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे किंवा मंत्रीमंडळातील कोणीही मंत्री कामासाठी अडवत नाहीत. त्यांचे काम प्राधान्याने होत आहे.

माजी आमदार सातपुते यांनी विधानसभा निवडणुकीत लाखावर मते घेतली. अगदी अल्पशा मताने त्यांचा पराभव झाला पण आपला झालेला पराभव त्यांनी विसरुन गावगाडयातील प्रत्येक घटकांना सोबत घेत त्यांच्या अडीअडचणी सोडविणे, विकास कामे असतील शेतकऱ्यांना डिपी, आरोग्य सेवेद्वारे मोठी ऑपरेशन यासह मतदारसंघातील कामे करण्याचा धडाका सुरुच आहे. खरेतर त्यांच्याकडे येणारा व्यक्ती कोणत्या पक्षाचा आहे असे न विचारता त्यांची अडचण सोडविणे यासाठी गावातील कोणत्याही पुढाऱ्यांची शिफारशींची सुद्धा आवश्यकता नाही. नुकत्याच झालेल्या अकलूज नगरपरिषदेची निवडणुक पाहीली तर भाजप महायुतीचे सर्व ठिकाणी उमेदवार उभा करुन त्यांनी मोठे आव्हान निर्माण केले. ज्याठिकाणी विरोधकांना आजवर उभे राहण्यास उमेदवार मिळत नव्हते. त्याठिकाणी भाजपचे चार नगरसेवक निवडुन आणले. तर थोडे अल्प मताने पराभूत झाले. यामुळे खरेतर मोहीते-पाटील यांच्या बालेकिल्ल्यात निर्माण केलेले आव्हान सोपे नव्हते. सध्या याचमुळे तालुक्यातील मोहीते-पाटील व उत्तमराव जानकर गटातील अनेक गावातील विद्यमान तसेच माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांची भाजपमध्ये प्रवेशासाठी अक्षरश रिघ लागली आहे. मनमोकळेपणाने ते भाजपमध्ये काम करीत आहेत. यामुळे तालुक्यातील अनेक गावे सध्या भाजपमय झाली असुन पाच फेब्रुवारीला होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजप तालुक्यात जोरदार मुसंडी मारेल अशी चर्चा सध्या तालुक्यातील राजकीय जाणकारातून आहे.

## 'जंजिरा'वर छापा: चारजण अटकेत

### तीन महिलांची सुटका

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभूर्णी, दि. १४ जानेवारी-**



स्वराज्य जननी राजमाता जिजाऊंच्या जयंतीदिनी महिलांच्या सन्मानाचा दणक्यात संदेश देत टेंभुर्णी पोलिसांनी जंजिरा हॉटेल फॅमिली गार्डन अँड लॉजिंगवर धडक मारली. रात्रंदिवस चाललेला देहव्यापाराचा काळोख उघडकीस आणत चार सौदागरांना अटक केली, एक सौदागर फरार; तर तीन पीडित महिलांची सुखरूप सुटका करून त्यांना पुनर्वसनासाठी सोलापूर महिला सुधारगृहात दाखल केले.

टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे निरीक्षक नारायण पवार यांना १२ जानेवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता गोपनीय सूत्राने धक्कादायक माहिती मिळाली. जंजिरा लॉजचे मालक, मॅनेजर आणि कर्मचारी संगनमताने विविध जिल्ह्यांतून व इतर राज्यांतून महिलांना आणून आर्थिक फायद्यासाठी देहव्यापार करत असल्याचे सांगितले.

रात्री ११.३० वाजता पहिल्या मजल्यावरील रूम नंबर १०३ मध्ये धडक मारताच चार पुरुष आरोपी आणि तीन महिला सापडल्या. चौकशीत हे सौदागर हा महिलांकडून पैसे उकळत असल्याचे निष्पन्न झाले. कारवाईत चार न वापरलेले कंडोम, डमी ग्राहककाडून दिलेले १,५०० रुपये रोख आणि १८ ग्रॅम गांजा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. महिला पोलीस उपनिरीक्षक स्वाती सुरवसे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा क्रमांक १४/२०२६ दाखल आरोपींविरुद्ध अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ३,४,५,६; भारतीय न्याय संहिता २०२३ चे १४३(२),१४३(३),३(५); आणि एनडीपीएस कायदा १९८५ चे कलम ८(क),२७ लावले. सौदागर हणुमंत क्षिरसागर हा फरार असून लहु उर्फ डॉन क्षिरसागर (दोघे रा. शिडसिंगे, ता. माढा), तुशार अशोक मिसाळ (२२, रा. वाघोली, ता. माळशिरस), राहुल बाबासाहेब जाधव (२९, रा. सातमाने, रावळगाव, ता. मालेगाव, नाशिक).तर गांजा व देह व्यापाऱ्यांचे पैसे घेणारा सौदागर क्षिरसागर याच शोध सुरू असल्याचे पो. नि नारायण पवार यांनी सांगितले.पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर एसपी प्रीतम यावलकर व करमाळा उपविभागाच्या एसपी अंजना कृष्णा व्ही. एस. यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

## बंकलगी येथे आधार प्रतिष्ठानतर्फे वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

आधार प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने बंकलगी येथील जिल्हा परिषद शाळेत राधानगरीचे माजी सहायक गटविकास अधिकारी मल्हारी बनसोडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी ग्रामपंचायतीच्या वतीने शाळेस प्रोजेक्टर, साऊंड सिस्टीम, बँड संच व पाण्याची टाकी आदी साहित्य भेट देण्यात आले. कार्यक्रमासाठी बीट विस्तार अधिकारी सैपन आळगी, केंद्रप्रमुख नागनाथ स्वामी, सरपंच चंद्राम सगरे, मुख्याध्यापक काशिनाथ कोणदे, राजशेखर सगरे, बसवराज गुरव, के.डी. शिंदे , डॉ. रणजित देशमुख, जगन्नाथ रुपनुरे, लक्ष्मण मदभावी, आप्पाराव काळे, जगदिश देशमुख, रंगराव जगताप, सुभाष मदभावी, मल्लिकार्जुन धुळखेडे, पिंटू बनसोडे, सत्यप्पा पिरगोंडे, मल्लिकार्जुन कुरे, राहूल शेतसंदी, जेवप्पा जेऊरे, पिंटू माने, केशव बनसोडे, नागनाथ गायकवाड, नागदेव मोटे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष मल्लिकार्जुन फुलारी, उपाध्यक्षा भाग्यश्री कुंभार, आप्पासाहेब कोळी व दिनेश कुलकर्णी उपस्थित होते. सूत्रसंचालन शंकर नळे यांनी केले, तर आभार सुलोचना निकते यांनी मानले.

## लक्ष्मी-आनंद विद्यामंदिरात जिजाऊ व विवेकानंद जयंती साजरी

**टेंभुर्णी, दि. १४ जानेवारी-**

लक्ष्मी-आनंद विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज, टेंभुर्णी येथे स्वराज्य प्रेरिका राजमाता जिजाऊ आणि युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर सामूहिकरित्या जिजाऊ वंदना घेण्यात आली.

यावेळी शिक्षक प्रतिनिधी म्हणून भाग्यश्री चिंतामण यांनी मनोगत व्यक्त केले. संस्थेच्या सचिवा सुरजा बोबडे यांनी भाषण केले. या कार्यक्रमप्रसंगी टेंभुर्णी ग्रामपंचायतीच्या वतीने राबविण्यात आलेल्या मोफत ब्युटी पार्लर कोर्सचे प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. या उपक्रमाचा ५०० हून अधिक महिलांनी लाभ घेतला असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. कार्यक्रमास योगेश बोबडे, सुरजा बोबडे, शाहिदा पठाण, प्राचार्य विकास करळे, सागर खुळे उपस्थित होते.

## कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाचे चित्रकला ग्रेड परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १४ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी चित्रकला ग्रेड परीक्षा२०२५-२६ मध्ये झालेल्या एलिमेंटरी व इंटरमिजीएट या परीक्षेत दैदीप्यमान यश संपादन केले.

एलिमेंटरी परीक्षेस विद्यालयातील ८२ विद्यार्थी बसले होते त्यामध्ये अ श्रेणीत ८ विद्यार्थी, ब श्रेणीत ९ विद्यार्थी, क श्रेणीत ६३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून निकाल ९७.५६ टक्के लागला आहे. तर इंटरमिजीएट परीक्षेस ५० विद्यार्थी बसले होते त्यापैकी श्रेणीत १३ विद्यार्थी, ब श्रेणीत १० विद्यार्थी तर क श्रेणीत २५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शेकडा निकाल ९६ टक्के लागला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक बागल, पर्यवेक्षक रमेश किरगत, वरीष्ठ लेखनिक भोरकडे, विभागप्रमुख ऐवळे, सहाय्यक विभागप्रमुख झाडे यांनी अभिनंदन केले.



## उमा महाविद्यालयात समर्पण दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ जानेवारी-**

भारतातील युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद तसेच स्वराज्य संकल्पक राजमाता जिजाऊ यांची जयंती समर्पण दिवस म्हणून साजरी करण्यात आली. याप्रसंगी राजमाता जिजाऊ तसेच स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा. देशपांडे यांनी सर्वांचे स्वागत केले. प्रांत सहसचिव दीपक इरकल यांनी राजमाता जिजाऊ तसेच स्वामी विवेकानंद यांचे जीवन चरित्र आणि ग्राहक चळवळीचा सिद्धांत याविषयी मार्गदर्शन केले. प्रांत सदस्य विनोद भरते यांनी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे कार्यपद्धती आणि आजच्या काळात या चळवळीची गरज या विषयावर मार्गदर्शन केले. उमा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड यांनी अध्यक्षीय भाषण केले. अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हा सचिव सुहास निकते, तालुका अध्यक्ष नंदकुमार देशपांडे, तालुका सहसचिव आझाद अल्लापुरकर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. अविनाश देशपांडे यांनी केले.



## सहकार ज्योतीचे माळशिरस शहरात स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १४ जानेवारी-**

शिवरत्न बंगला येथून निघालेल्या कै. शंकरराव मोहिते-पाटील यांच्या ज्योतीचे व प्रतिमेचे माळशिरस शहरात स्वागत करण्यात आला.

कै. शंकरराव मोहिते-पाटील यांची ज्योत व प्रतिमा सदाशिवनगर कारखाना येथे नेण्याची परंपरा अनेक वर्षांपासून असून शिवरत्न बंगला येथून दुपारी निघालेल्या ज्योतीचे व प्रतिमेचे स्वागत माळशिरस येथील गणेश चौकात रामदास काळे, अमीर पठाण यांनी केले.

त्यानंतर गोपाळराव देव प्रशालेजवळ कारखान्याचे व्हाइस चेअरमन मिलिंद कुलकर्णी, संचालक सुरेश पाटील, एम. पी.कुलकर्णी, रामभाऊ दोशी, संतोष कुलकर्णी, धोंडीराम मस्के, नंदकुमार घाडगे, धनंजय केसकर, नितीन थिटे, रामचंद्र शेंडगे, शिवाजी कोळेकर, जानकर यांनी स्वागत केले. त्यानंतर ज्योत सदाशिवनगरकडे मार्गस्थ झाली.

## डॉ. आंबेडकर सामाजिक पुरस्कार मच्छिंद्र काळे यांना प्रदान

**अक्कलकोट, दि. १४ जानेवारी-**

समाजातील समता, सामाजिक न्याय, मानवता व लोकहितासाठी सातत्याने कार्य करणारे मच्छिंद्र काळे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला आहे. हा प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्कार फेमस पिपल इंडिया वर्ल्ड या संस्थेमार्फत दिला जातो. समाजात शिक्षणाद्वारे परिवर्तन, समानता, बंधुता, वंचित व दुर्बल घटकांचे सक्षमीकरण तसेच समावेशक व न्याय्य समाजनिर्मिती या मूल्यांसाठी प्रत्यक्ष कृतीतून योगदान देणाऱ्या व्यक्तींचा या पुरस्काराद्वारे सन्मान केला जातो.

## सुब्रमणिया शर्मा यांची विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीस पाच लाखांची देणगी

**पंढरपूर, दि. १४ जानेवारी-**



येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीस तामिळनाडूच्या कोईम्बतूर येथील रहिवासी असलेल्या सुब्रमणिया शर्मा यांनी भक्तीभावाने पाच लाख रुपये इतकी देणगी अर्पण केली. सदर देणगी समितीकडे सुपुत करण्यात आली आहे. याप्रसंगी देणगीदार सुब्रमणिया शर्मा यांचा सत्कार मंदिर समितीच्या सदस्या श्रीमती शकुंतला नडगिरे यांच्या हस्ते करण्यात आला. मंदिराच्या पवित्र कार्यासाठी दिलेल्या या उदार देणगीबद्दल मंदिर समितीच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## माळशिरस शहर व परिसरात मकर संक्रांत उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १४ जानेवारी-**

माळशिरस शहर व परिसरात हिंदू संस्कृती मधील महत्वाचा मकर संक्रांतीचा सण महिलांच्या सहभागाने उत्साहात साजरा करण्यात आला.

वाणवसा करण्याचा मुहर्त दुपारी तीननंतर असल्याने येथील सर्वच मंदिरात दुपारी तीन नंतर महिलांनी प्रचंड गर्दी केली होती. दुपारनंतर सर्व रस्ते महिलांनी फुलुन गेले होते. महिला अनेक अलंकार घालून नवीन साड्या परिधान करून वाणवसा घेऊन मंदिरात आल्या होत्या. देवदर्शनानंतर एकमेकीना हळदी कुंकू लावून वाणवसा देत होत्या व तिळगुळ देऊन मकर संक्रांतीच्या शुभेच्छा देत होत्या.

तसेच पुरुष वर्ग लहानांना तिळगुळ देऊन आशीर्वाद देत होते. आजपासून रथसप्तमी पर्यंत महिलांना घरी बोलवून हळदी कुंकु लावुन आपआपल्या इच्छेनुसार भेट वस्तु देत असतात ही हिंदू संस्कृतीची परंपरा आजही टिकून आहे.





## महत्त्वाचे



### एलिमेंटरी इंटरमिजिएट परीक्षेत वखारिया विद्यालय उपळे दुमाला या केंद्राचे यश

**बार्शी दि.१४ जानेवारी-**

तालुक्यातील उपळे दुमाला येथील वखारिया विद्यालयात महाराष्ट्र शासन कला संचालनालय यांच्या अंतर्गत घेण्यात आलेल्या एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेसाठी वखारिया विद्यालय उपळे दुमाला या केंद्राचा ९५.६२ टक्के निकाल लागला. या केंद्रांतर्गत संत ज्ञानेश्वर विद्यालय भातंबरे, नागनाथ प्रशाला जामगाव, मित्र विद्यालय माळेगाव, आदर्श विद्यालय रातंजन, माध्यमिक हायस्कूल हळदुगे, जय हनुमान प्रशाला झरेगाव, वखारिया विद्यालय उपळे दुमाला या शाळा सहभागी झाल्या होत्या. परीक्षेला केंद्रामध्ये एकूण ४०७ विद्यार्थ्यांनी एलिमेंट्री ए ग्रेड-३१, बी ग्रेड-९२, सी ग्रेड -७३ व इंटरमिजिएट ए ग्रेड-१६, बी ग्रेड-७५, सी ग्रेड-८४ मिळवून उत्तीर्ण झाले. या परीक्षेसाठी प्रशालेचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर व केंद्र समन्वयक एन.एन. महाले यांनी परिश्रम घेतले. यशामुळे उपळे दुमाला, परिसरात कौतुक होत आहे.



### श्रीपूरचे भाऊसाहेब कुलकर्णी सामाजीक सेवा पुरस्काराने सन्माननीत

**श्रीपूर, दि.१४ जानेवारी-**

येथील सामाजिक कार्यकर्ते श्रीपाद ऊर्फ भाऊसाहेब कुलकर्णी यांना नाशिक येथील रेडक्रॉस स्वस्तिक सोसायटी या मानवतावादी संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्धापन दिनानिमित्त सामाजिक सेवा पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात आले. मुंबईचे सह पोलीस महासंचालक भूषणकुमार उपाध्याय यांच्या हस्ते मानचिन्ह प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी रेडक्रॉस स्वस्तिक सोसायटीचे संस्थापक पोलिस महासंचालक डॉ. पी. एस. भाल, रेडक्रॉस सोसायटीचे अध्यक्ष सुरेश कोते, स्वस्तीक इंडिया कंपनीचे प्रोजेक्ट डायरेक्टर संतोष राजगुरू उपस्थित होते . रेड क्रॉस सोसायटीच्या माध्यमातून जगद्गुरु संत श्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात दरवर्षी आषाढी वारी मध्ये मानवतेच्या दृष्टिकोनातून वारकऱ्यां साठी मोफत वैद्यकीय सेवा पुरवली जाते. रेड क्रॉस स्वस्तिक सोसायटी चे वैद्यकीय पथक वारीच्या वाटेवर दरवर्षी श्रीपूर मध्ये मुक्कामी असते त्यांची भोजन, फराळ, चहा पाणी व निवासाची सोय श्रीपाद ऊर्फ भाऊसाहेब कुलकर्णी हे अव्याहत पणे गेली पंचवीस वर्षे सेवा म्हणून कार्य करतात. भाऊसाहेब कुलकर्णी यांच्या या सामाजिककार्याची दखल घेत सदर रेड क्रॉस स्वस्तिक सोसायटीने रौप्यमहोत्सवी वर्धापन दिनाचे औचित्य साधत त्यांना सन्मानित केले आहे. भाऊसाहेब कुलकर्णी यांना हा पुरस्कार मिळाल्या बद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.



### बार्शीत फुलला बालचमुंचा आनंद बाजार; २१ हजार ४५६ रूपयांची उलाढाल

**बार्शी, दि.१४ जानेवारी-**

दिलीपराव सोपल प्रशाला व दत्त प्राथमिक विद्यामंदिर बार्शी या दोन्ही शाळेच्या विद्यमाने सोपल प्रशाला बार्शी येथे भव्य बाल आनंद बाजार दिमाखात मंगळवारी संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती क्रीडा,शिक्षण व समाजसेवी संस्था, उपळाई (ठोंगे) या संस्थेचे अध्यक्ष मोहनआण्णा ठोंगे, सचिव तेजस्विनीताई ठोंगे व प्रमुख पाहुणे नानासाहेब चौधरी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन व बाल आनंद बाजारचे फीत कापून उदघाटन झाले. भविष्यात मुलांना सेल्स मार्केटिंग या व्यवसायाची गुणात्मक बौद्धिक वृद्धी व्हावी म्हणून हा स्तुत्य उपक्रम आहे, असे मत चौधरी यांनी मांडले. आनंद बाजारमध्ये मुलांनी ७५ स्टॉल मांडून भाजीपाला, स्टेशनरी समान, भेळ, भजी, कटलरी समान, विविध फळे, इमिटेशन ज्वेलरी, किराणा सामान, गृहउपयोगी सामान इत्यादी मांडून त्यांची विक्री केली. या आनंद बाजारात २१ हजार ४५६ रुपयांची उलाढाल झाली. लोखंडे सरांनी सूत्रसंचालन केले. श्रीकांत कुंभारे, युवराज जगताप, सुनिल लंगोटे, मंगेश मोरे, सचिन काळे, चंद्रकांत लोखंडे, संतोष ठोंबरे, राहुल ठोंगे, संगीता काळे, अरुणा मठपती, शितल पाटील, ललिता चव्हाण, प्रेरणा कसबे तसेच सेवक संदीप भोरे, श्रीकांत चव्हाण यांनी परिश्रम घेतले.

### छत्रपती ब्रिगेडच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ जयंती साजरी

**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांची ४२८ वी जयंती छत्रपती ब्रिगेडच्या वतीने जुळे सोलापूर भागातील छत्रपती ब्रिगेडच्या संपर्क कार्यालयामध्ये जिजाऊंच्या प्रतिमेस महिलांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून साजरी करण्यात आली. यावेळी अध्यक्ष शाम कदम, जिल्हाध्यक्ष अरविंद शेळके, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मोनाली धुमाळ, जिल्हा कार्याध्यक्ष मनिषा कोळी, प्रियंका शेळके, राजनंदिनी धुमाळ, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष धर्मा माने, प्रवीण लकशेट्टी, महेश तेल्लूर, देविदास शिवसिंगवाले, धर्मा होनमाने आदी उपस्थित होते.

# सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांची जयंती विविध उपक्रमाने साजरी

**माळशिरस तालुक्यातील विविध संस्थांतर्फे अभिवादन**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१४ जानेवारी-**

सोलापूर जिल्ह्याचे भाग्यविधाते व माळशिरस तालुक्यातील सहकारी संस्थांचे संस्थापक स. म.शंकरराव मोहिते-पाटील यांची जयंती विविध उपक्रमाने साजरी झाली. त्यांच्या १०८ व्या जयंती निमित्त शिवरत्न बंगला येथील सहकार महर्षी यांच्या समाधीस्थळाचे विधिवत पूजन करून मोहिते-पाटील कुटुंबीयांच्या वतीने दर्शन घेण्यात आले. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्यासह विविध सहकारी व शिक्षण संस्थांचे पदाधिकारी, कामगार यांनी दर्शन घेत अभिवादन केले. यावेळी खासदार धैर्यशील मोहिते पाटील, कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील, आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, अकलूजचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील, कारखान्याच्या संचालिका स्वरूपाराणी मोहिते-पाटील व कुटुंबिय उपस्थित होते.



शंकरनगर अकलुज येथील सहकार महर्षी सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर स.म.शंकरराव मोहिते-पाटील यांच्या पुतळ्यास व्हा.चेअरमन ॲड. शंकरराव माने-देशमुख यांच्या हस्ते पुष्पहार व पुष्पचक्र अर्पण करण्यात येवुन अभिवादन करण्यात आले. यावेळी संचालक , लक्ष्मण शिंदे, सतीश शेंडगे, नानासाहेब मुंडफणे, ॲड.विजयकुमार पवार, रावसाहेब मगर, रामचंद्र सिद, विराज निंबाळकर, रावसाहेब पराडे, महादेव क्षिरसागर, डॉ. सुभाष कटके, रामचंद्र ठवरे, तज्ञ संचालक ॲड. प्रकाशराव पाटील, रामचंद्रराव सावंत-पाटील, संचालिका सुजाता शिंदे, माजी संचालक सुरेश मेहेर, महादेव घाडगे, विजय हेगडे, राजेंद्र मोहिते, चांगदेव घोगरे, रामचंद्र चव्हाण, मोहनराव लोंढे, महादेवराव चव्हाण, सुभाष पताळे व शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडीया लेजर शो कमिटी संचालक पांडूरंग एकतपुरे, दत्तात्रय चव्हाण, धनंजय सावंत, अनिलराव कोकाटे, हर्षाली निंबाळकर तसेच कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले, विजय गणेशोत्सव मंडळ ट्रस्टचे ट्रस्टी चंद्रकांत कुंभार, कार्यलक्षी कामगार संचालक जयवंत माने-देशमुख व विविध संस्थांचे पदाधिकारी खाते प्रमुख, अधिकारी, कामगार व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले यांच्यासह सर्व संचालक, खातेप्रमुख, कामगार प्रतिनिधी व कामगार उपस्थित होते. विजयचौक येथील सहकार महर्षी यांच्या पुतळ्यास अकलूजच्या नगराध्यक्षा रेश्मा अडगळे, उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील, उप मुख्याधिकारी जयसिंग खुळे यांच्या हस्ते पुष्पहार व पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी माजी सरपंच किशोरसिंह माने-पाटील, नगरसेवक क्रांतीसिंह माने-पाटील, सयाजीराजे मोहिते-पाटील सर्व नगरसेवक उपस्थित होते.

विजयनगर विझोरी येथे शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघाच्या कार्यस्थळावर सहकारमहर्षी यांच्या पुतळ्यास व्हा. चेअरमन दत्तात्रय भिलारे यांच्या हस्ते पुष्पहार, पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. यावेळी सर्व संचालक मंडळ,कार्य. संचालक रविराज इनामदार यांच्यासह सर्व खातेप्रमुख, कामगार उपस्थित होते.

अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील सहकार महर्षींच्या पुर्णाकृती पुतळ्यास बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उपसभापती मामासाहेब पांढरे, सचिव राजेंद्र काकडे, संचालक व कामगार उपस्थित होते. सदाशिवनगर येथे श्री शंकर सहकारी साखर कारखान्याच्या वतीने महर्षी ज्योतीचे आयोजन करण्यात आले होते . शंकनगर येथील समाधी स्थळावर राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील व नंदिनीदेवी मोहिते पाटील यांच्या हस्ते महर्षी ज्योतीचे पूजन करण्यात आले. सांगता सदाशिवनगर येथे विश्वतेजसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी चेअरमन आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, सत्यप्रभादेवी मोहिते पाटील, व्हा. चेअरमन ॲड. मिलींद कुलकर्णी, माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते-पाटील, वैष्णवीदेवी मोहिते-पाटील, कार्यकारी संचालक स्वरुप देशमुख, सेक्रेटरी रवीराज जगताप, संचालक मंडळ, अधिकारी व कामगार उपस्थित होते. शिक्षण प्रसारक मंडळ, शिवरत्न शिक्षण संस्था, शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील चॅरिटेबल ट्रस्ट, शिवशंकर बझार, सुमित्रा पतसंस्था, शंकरराव मोहिते-पाटील पतसंस्था, अकलूज विकास सोसायटी, शंकरनगर विकास सोसायटी यांचे ई-सेवा केंद्राचे उदघाटनही आज झाले, शंकरनगर ग्राम पंचायत वतीने पुष्पहार अर्पण करुन सहकार महर्षीना अभिवादन करण्यात आले.

## डॉ. शुभम थळपतींचे एम.एस. परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१४ जानेवारी-**

बार्शीच्या शैक्षणिक व वैद्यकीय परंपरेला उजाळा देणारी कामगिरी करत येथील सुपुत्र डॉ. शुभम विश्वनाथ थळपती यांनी एम.एस. (मास्टर इन जनरल सर्जरी) ही पदव्युत्तर वैद्यकीय परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल बार्शी शहरासह वैद्यकीय क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



डॉ. शुभम थळपती यांचे प्राथमिक शिक्षण सोजर इंग्लिश स्कूल, बार्शी आणि संजीवनी पब्लिक स्कूल, पन्हाळा येथे झाले. त्यानंतर त्यांनी मॉडेल स्कूल, सोलापूर येथून अकरावी व बारावीचे शिक्षण पूर्ण केले. गुणवत्तेच्या बळावर त्यांना वैशंपायन मेडिकल कॉलेज, सोलापूर येथे प्रवेश मिळाला असून तेथून त्यांनी एमबीबीएस ही पदवी संपादन केली. कोरोना महामारीच्या कठीण काळात डॉ. शुभम थळपती यांनी बार्शी शहरात रुग्णसेवेसाठी स्वतःला झोकून देत उल्लेखनीय कामगिरी बजावली होती. पुढील उच्च शिक्षणासाठी त्यांनी वेदांत इन्स्टिट्यूट, पालघर येथे प्रवेश घेऊन एम.एस. (जनरल सर्जरी) ही पदव्युत्तर पदवी यशस्वीरित्या पूर्ण केली. या यशामुळे बार्शीच्या वैद्यकीय क्षेत्रात आणखी एक कुशल, आधुनिक शल्यचिकित्सक उपलब्ध झाला असून त्यांच्या पुढील वैद्यकीय वाटचालीसाठी विविध स्तरांतून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

### 'प्रजापिता'तर्फे पत्रकार स्नेहमिलन कार्यक्रम

**बार्शी, दि. १४ जानेवारी-**

पत्रकार दिनानिमित्त प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या बार्शी सेवाकेंद्रातर्फे आयोजित स्नेहमिलन कार्यक्रम राजयोग भवनात संपन्न झाला.

सेवाकेंद्र संचालिका राजयोगिनी संगीता यांनी मार्गदर्शन करताना म्हणाल्या, हा ईश्वरीय दरबार असून, येथे शांती आणि शक्तीचा खजिना मिळतो. प्रसारमाध्यमांचा समाजकार्यातील वाटा अमूल्य आहे. त्यांनी बार्शी पत्रकारांच्या सकारात्मक योगदानाचे माउंट आबू आणि इतर केंद्रांवर होणारे कौतुक नमूद केले. केअरटेकर मोहन यांनी सेवाकेंद्राचा इतिहास सांगितला. अनिता करवा यांनी यावेळी मार्गदर्शन केले. पत्रकार सचिन अपसिंगकर यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. प्रणोती कोकाटे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी ३५ पत्रकार उपस्थित होते.



## सहकार महर्षींच्या विचारांचा केला जागर

**महर्षी संकुलात पारितोषिक वितरण उत्साहात**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१४ जानेवारी-**

सहकार क्षेत्रातील उत्तुंग व्यक्तीमत्व आणि आधुनिक माळशिरस तालुक्याचे भाग्यविधाते सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील यांची १०८ वी जयंती महर्षि संकुल यशवंतनगर येथे अत्यंत उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. या दिनाचे औचित्य साधून प्रशालेतील पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या दिमाखात पार पडला.

कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी अकलूजच्या शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक रामचंद्र गायकवाड, संग्रामनगरचे त्वचारोग तज्ञ डॉ. सुरज पवार, प्रमुख व्याख्याते साहित्यिक डॉ. प्रेमनाथ रामदासी, प्रशाला समिती सभापती ॲड नितीनराव खराडे लाभले होते. सर्व प्रमुख मान्यवरांचे स्वागत महर्षि बाल वाद्यवृंदांच्या बालचमूंमार्फत स्वागत गीताने करण्यात आले.

मुख्याध्यापक संजय गळीतकर यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख अतिथींच्या हस्ते सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. संकुलातील विद्यार्थिनी भूमिका कारमकर व श्रावणी मोहिते यांनी काकासाहेबांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला. महर्षी द्वैवार्षिक अंकाचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. प्रमुख व्याख्याते डॉ. रामदासी यांनी विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता सहकार महर्षिंच्या जीवनातून जिद्द आणि कष्टाचे धडे गिरवले पाहिजेत असा विचार व्यक्त केला. शैक्षणिक वर्षभरात विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये व राज्यस्तरीय लेझीम स्पर्धेमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान यावेळी करण्यात आला. जिल्हा शिक्षक पतसंस्थेचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल सहशिक्षिका रचना रणनवरे, आदर्श प्रयोगशाळा सहाय्यक पुरस्कारप्राप्त प्रकाश गवळी यांचाही सन्मान करण्यात आला.

राज्यस्तरीय लेझीम स्पर्धेतील उत्कृष्ट लेझीम प्रशिक्षक पुरस्कारप्राप्त सहशिक्षक इलाही बागवान यांचाही सन्मान करण्यात आला. प्रमुख अतिथी डॉ. पवार यांनी विद्यार्थ्यांना सहकार महर्षिंच्या ठायी असणाऱ्या गुणांचे अवलोकन करून यशाचे उत्तुंग शिखर गाठण्याचे आवाहन केले. मान्यवरांच्या हस्ते मकर संक्रांतीनिमित्त प्रातिनिधिक स्वरूपात विद्यार्थ्यांना तिळगुळ वाटप करण्यात आले. प्रशाला समिती सदस्य नवनाथ पांढरे, कैलास चौधरी ,अनिल जाधव, विनोद जाधव, नितीन इंगवले देशमुख, जया गायकवाड, मुख्याध्यापक शिवाजी पारसे, मुख्याध्यापिका अनिता पवार, उपमुख्याध्यापक आसिफ झारेकरी उपस्थित होते. नागेश सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. पर्यवेक्षक उमेश बोरावके यांनी आभार मानले. सारे जहाँ से अच्छा या समूहगीताने सांगता झाली.

## करकंबमध्ये वाणवसा करण्यासाठी सुवासिनींची गर्दी

**करकंब,दि.१४ जानेवारी-**

करकंब (ता.पंढरपूर) येथे नवीन वर्षाच्या सुरुवातीस येणारा मकर संक्रांत हा सण सुवासिनींनी परिसरातील श्री.चौंडेश्वरी, श्रीसंत सावता माळी, श्रीराम मंदिरांमध्ये मोठ्या संख्येने एकत्र येत मोठ्या उत्साहाने साजरा केला.

हिंदू धर्मामध्ये सूर्य जेव्हा मकर राशीत प्रवेश करतो तेव्हा मकर संक्रांतीचा उत्सव साजरा केला जातो. मकर संक्रांतीच्या दिवशी गंगा स्नान, दान आणि सूर्यदेवांची उपासना करणे अत्यंत पुण्यदायी मानले जाते. आज हरभरे, बोरे, ऊस, गव्हाच्या ओंब्या, तीळ अशा गोष्टी सुगडात घालून त्या देवीदेवतांना अर्पण करण्यात आल्या. सुवासिनींनी एकमेकींना हळदी, कुंकू लावून तिळगुळ घ्या गोड बोला म्हणत एकमेकींना तिळगुळ, वाण, भेटवस्तू दिल्या. जे सौभाग्य,समृद्धी आणि सौंहार्यदेचे प्रतीक मानले जाते. मकर संक्रांतीचा सोहळा हा नवीन वर्षाची सुरुवात व सकारात्मक ऊर्जेचा काळ मानला जातो. मकर संक्रांतीचे हळदी, कुंकू सोहळा रथसप्तमीपर्यंत चालतो. या सणानिमित्त महिला एकत्र आल्याने त्यांच्यातील संवाद वाढण्यास मदत झाली.



## मकरसंक्रांतीनिमित्त विठुल-रुक्मिणी मंदिरात फुलांची आरास

### रूक्मिणीमातेला पारंपारिक अलंकार; वाणवशासाठी महिलांची गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ जानेवारी-**

प्रतिवर्षीप्रमाणे दि १३ ते १५ जानेवारी या कालावधीत भोगी, मकरसंक्रांत व किंक्रांत संपन्न होत असून, या सणानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होते. येणाऱ्या भाविकांना सुलभ व जलद दर्शन व्हावे यासाठी मंदिर समितीकडून आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध केल्या आहेत.

सर्व प्रथा व परंपरेचे पालन करून मंदिरात रंगीबेरंगी फुलांची आरास करण्यात आली असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. मकरसंक्रांत निमित्त बुधवारी (दि.१४) श्री रूक्मिणी मातेला पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आले. त्यामध्ये सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, जवेच्या माळा, तांबडी चिंचपेटी, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, जवमणी पदक, हायकोल, सरी, कंबरकट्टा, लक्ष्मीहार इत्यादी अलंकाराचा समावेश आहे.





मकरसंक्रांतीनिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात रंगीबेरंगी फुलांची आरास करण्यात आली होती. त्यामध्ये गाभारा, चारखांबी, नामदेव पायरी येथील भाग सजावटीने आकर्षक व मनमोहक दिसत होता. सदरची सजावट पुणेचे अमोल शेरे यांनी सेवाभावी तत्त्वावर मोफत केली आहे. त्यासाठी २ हजार शेवंती, १०० गुलाब गड्डी, बेंगलोर शेवंती १०, ऑर्किड १०, ग्रीनरी ३०, कामिनी ३००, भगवा झेंडू १०० किलो, पिवळा झेंडू १०० किलो व पांढरी शेवंती ५० किलो इत्यादीचा वापर केला. सजावटीसाठी सुमारे ५० कामगारांनी परिश्रम घेतले. दर्शनासाठी पहाटेपासूनच भाविकांनी मंदिरात गर्दी केली आहे. भाविकांची गर्दी विचारात घेऊन, सुलभ व जलद दर्शन होण्याच्या दृष्टीने टोकन दर्शन पास बुकिंग व्यवस्था बंद ठेवण्यात आली आहे. तसेच थेट दर्शनावर निर्बंध, पुजेची संख्या कमी करणे, महिला सुरक्षा रक्षकांची नेमणूक व आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या. श्री रुक्मिणी मातेला सुवासिनींनी ताटात हळद, कुंकू, तिळगुळ, ऊस, बोर, गाजर, हुरडा अर्पण केले. फुलांची सजावट, सोई सुविधा, स्वच्छता, दर्शन व्यवस्थेने भाविकांनी समाधान व्यक्त केल्याचे यावेळी प्र. व्यवस्थापक संदेश भोसले यांनी सांगितले.